॥ श्रीगुरु देवदत्त प्रसन्न ॥

श्रीक्षेत्र वाई–वर्णन.

लेखक व प्रकाशक,

गोविंद विनायक आपटे

मुक्काम वाई

मुद्रक

केशव रावजी गोंधळेकर जगद्धितेच्छु प्रेस पुणे.

मि० पौष वद्य १२ शके १८३२ सन १९११ जानेवारी.

किंमत आठ आणे.



श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव देशमुख.

अर्पण पत्रिका.

श्रीमंत सरदार

गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव

देशमुख–देशपांडे सरकानगो

मुक्काम सावदा,

पूर्व–खानदेश.

यांचे

स्वधर्माभिमान, दातृत्व, परोपकार बुद्धी,

दयालुत्व, ईश्वरभक्तिपरायणता,

निरभिमानता इत्यादि

बहु गुणांवर लुब्ध

होऊन

हें पुस्तक

अर्पण केलें आहे.

गो. वि. आपटे.

श्री

प्रस्तावना.

हल्लीं आपल्या देशांत जिकडे तिकडे देशोन्नति करण्याचें काम झपाट्यानें चालू आहे. देशोन्नति करण्याचे सर्व मार्ग योग्यच आहेत कीं, अयोग्य आहेत याबद्दल येथें विचार करण्याचें कारण नाहीं. मराठी वाङ्मयाची सुधारणा करून त्यायोगें देशोन्नति करण्याचें काम सुरू आहे व त्यासच यथाशक्ति हातभार लावावा या हेतूनें रा. गोविंद विनायक आपटे यांनीं हें पुस्तक लिहिलें आहे. या पुस्तकांतील विषय पुस्तकाच्या नांवावरून व्यक्त होत आहे. " भद्रंभद्रा " सारखीं टाकाऊ पुस्तकें प्रसिद्ध होत असून वाई सारख्या पुराण-प्रसिद्ध क्षेत्राचें वर्णन आजपर्यंत झालें नाहीं, ही गोष्ट शोचनीय होय. असो. रा. आपटे यांनीं फक्त घाट, देवालयें वगैरेंचेंच वर्णन न लिहितां, वाईची पौराणिक कालीन स्थिति व महत्त्व ऐतिहासिक कालीन स्थिति, वाईच्या उन्नतीस अंशतः कारणीभूत झालेल्या कांहीं प्रसिद्ध घराण्यांची त्रोटक माहिती, त्याचप्रमाणें वेद शास्त्र पारंगत अशा सुप्रसिद्ध नररत्नांची त्रोटक माहिती, देवालयें व घाट यांची बिनचूक मोजणी व त्याचप्रमाणें घाटांची सौंदर्य निदर्शक अशीं छायाचित्रें, वाईच्या जवळील रमणीय व प्रसिद्ध स्थळांची माहिती वगैरे दिली असल्यामुळें हें पुस्तक बरेंच सुंदर झालें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. रा. आपटे हे फार कार्यदक्ष व निस्पृह आहेत. यांनीं बरेच दिवस परिश्रम करून हें पुस्तक तयार केलें

1910

आहे. यांचा समाजांशीं " निर्मळ क्षेत्र वर्णन " " कै. विष्णुपंत छत्रे यांचें चारित्र " वगैरे पुस्तकांनीं परिचय झालाच आहे. तो नव्यानें करून देण्याची जरूरी नाहीं. असो. रा. आपटे यांनीं या पुस्तकास प्रस्तावना लिहिण्याची संधि मला आणून दिल्याबद्दल त्यांचे शिष्टजन संमत आभार मानून हा प्रस्तावना लेख संपवितों.

मि० पौष वद्य ८ शके १८३२ मु० पुणें. } B. M. Sathe.

श्रीक्षेत्र वाई येथील सर्व माहिती मिळवून पुस्तक रूपानें प्रसिद्ध करण्याची स्फूर्ति ४।५ वर्षापूर्वींच झाली होती. परंतु सर्व बाजूंनीं अनुकूलता न मिळाल्यामुळें इतके दिवस लागले. विशेषतः श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव ऊर्फ आण्णासाहेब गंभीरराव देशमुख यांनीं आगाऊ ११० रुपयांची देणगी दिल्यामुळें, हें क्षेत्र वर्णन लवकर प्रसिद्ध झाल्याचें सर्व श्रेय त्यांचेकडेच आहे. मुंबईतील रा. रा. विष्णु कृष्ण भाटवडेकर बी. ए. एल्. एल्. बी. व गंगाराम बाप्सोबा रेळे बी. ए. एल्. एल्. बी. यांनीं ओरिजनल कॉपी पाहून उत्तेजन दिलें. तसेंच येथील श्रीमंत बाळासाहेब साठे व राव. भाऊराव पाटणकर वकील म्युनिसिपल प्रेसिडेंट यांनीं ही उत्तेजन दिलें याबद्दल मीं सर्वांचा फार फार आभारी आहे.

*पुस्तकांत ज्या दोन आंकड्यांमध्यें डॅश् आहे, ते आंकडे फूट व इंच समजावें.

लेखकः—गो. वि. आपटे.

पांच.

हें पुस्तक छापण्याचे पूर्वी ज्यांनीं माझ्या विनंतीस मान देऊन द्रव्यद्वारें आगाऊ सहाय्य करून उत्तेजन दिलें; त्या आश्रयदात्यांचीं नांवें:—

श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव देशमुख ११० रु; श्रीमंत के. आर. गाडगीळ ५ रु; श्रीमंत के. व्ही. पंत ५ रु; श्रीमंत बी. एम्. साठे प्रतीदोन ५ रु; श्रीमंत विष्णु कृष्ण भाटवडेकर ५ रु; श्रीमंत सौ. माणकबाई कोठारे ५ रु; "क्ष" ३ रु; गंगाराम बाप्सोबा रेळे २ रु; वासुदेव बळवंत सोमण २ रु; "क" दोनप्रती. एक रुपाया दिलेले—जी. के. गाडगीळ; जी. एन्. मोघे; बी. एम्. पंडित; एम्. व्ही. भट; जे. के. परुळकर; भाऊराव पाटणकर वकील; व खटावकर वकील.

श्रीक्षेत्र वाई येथील श्रीमंत बाळासाहेब (गोशाळे) यांनीं मदत करण्याचें आश्वासन दिलें आहे. त्याचप्रमाणें येथील इतर क्षेत्राभिमानी सद्‌गृहस्थांकडून व नबाब गुलाब जिलाणीसाहेब यांचे कडूनही योग्य मदत होईल अशी उमेद आहे.

वरील आश्रयदात्यांकडून मला पुस्तकें छापण्याकरितां असाच वारंवार आश्रय मिळत जावा अशी विनंति आहे.

लेखकः—गो. वि. आपटे.

श्रीक्षेत्र वाईवर्णन.

पौराणिक कालीनं वैराज क्षेत्र.

फार प्राचीन काळीं हल्लीं वाई या नांवानें प्रसिद्ध असलेल्या **वैराज** क्षेत्राचे ठिकाणीं निबिड अरण्य होतें. हा भाग लतावेलींनीं व अनेक फुलझाडांनीं सुशोभित असल्या कारणानें फारच रमणीय होता. त्यांतून या अरण्यामधून श्रीकृष्णानदीचा सुंदर प्रवाह जात असल्यामुळें तर या भागास विशेषच शोभा आलेली होती. आज याच अरण्याच्या एका भागांत वाई शहर वसलेलें आहे. याच **वैराज** ऊर्फ **वाई** क्षेत्राचें वर्णन देण्याचा आमचा विचार आहे. या क्षेत्रास क्षेत्रत्व आणणारी जी कृष्णानदी तिचा मूळ उगम सह्याद्रीपासून झाला आहे. या नदीला कृष्णा हें नांव पडण्याचें कारण खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

कृष्णाच दृष्टा कृष्णेन भुवं नीताच या दिवः ।
सर्वं कर्षतिचाघौघं तेन कृष्णा प्रकीर्तिता ॥ ५५ ॥

स्कंदपुरा० कृ० मा० अध्याय २ रा.

श्री ब्रम्हदेवांनीं ज्या वेळेस सर्व जगत् निर्माण केलें, त्यावेळेस श्रीविष्णूंनीं कृष्णाबाई निर्माण केली; हें खालील श्लोकावरून सिद्ध होत आहे:—

मातरं सर्व तीर्थानां नदीनामग्रजात्वहं ।
स्रक्ष्यामि पूर्ववत् कृष्णां मन्मयीं जगतःस्थितेः ॥१२॥

स्कं० पु० कृ० मा० अ० १ ला.

श्रीकृष्णाबाईचा महिमा फार अगाध आहे. प्रत्यक्ष श्रीविष्णूंनीं–कृष्णायाश्चापि सांनिध्यात् पापं नैव भविष्यति–या श्लोकार्धानें तिचा महिमा वर्णन केलेला आहे.

श्रीविष्णूंनीं कृष्णा उत्पन्न केल्यावर सर्व देवांना व ऋषींना तिला स्थापन कोठें करावी याचा विचार पडला, म्हणून ते प्रत्येक ठिकाण शोधीत चालले. तों सह्याद्री पर्वतावर एके ठिकाणीं एक ऋषी आसनस्थ बसलेला दृष्टीस पडला. त्यास विचारतां "मी कृष्णेचीच आराधना करीत आहें व माझें नांव सह्यगिरी असें सांगितलें." तेव्हां "श्रीकृष्णाबाईनीं तुझे ठिकाणीं मी उगम पावतें" असा आशीर्वाद दिला. ते वेळीं सर्व देव आपल्या धामास चालते झाले. तेव्हांपासून श्रीकृष्णा "सह्यजा" हें अभिधान पावली. श्रीकृष्णा त्या ठिकाणीं स्थापन झाल्यावर श्रीजनार्दनांस फार आनंद होऊन ते अश्वत्थ रूपानें तेथें वास्तव्य करूं लागले. त्याच विष्णुरूपी अश्वत्थापासून श्रीकृष्णाबाईचा सर्वाघौघनाशी, सर्वानंददायीं व पुण्य असा प्रवाह निघाला.

ही सर्व कथा श्री शंकरांनीं सर्व देवांस व स्कंदास सांगितली. ती पुढें विस्तारानें श्रीकार्तिकेयांनीं सर्व देवांस खालीं लिहिल्याप्रमाणें क्रमाक्रमानें सांगितली.

जेथून कृष्णाप्रवाह निघाला तेथें "विष्णुतीर्थ" झालें. ब्रम्हगिरीच्या व वेदगिरीच्या मध्यें "आमलकतीर्थ" झालें. वेणा व कृष्णा संगमाचेंही मोठें महात्म्य आहे. कृष्णा कुकुद्मती (कोयना) संगमाचेंही मोठें महात्म्य आहे. तेथून पुढें "विहंगतीर्थ आहे. कृष्णा व वेदगंगा संगमावर "धूर्जटिलिंग" आहे. गोकर्ण ज्याच्या योगानें मोक्ष पावला. असें "रुद्रतीर्थ" आहे.

कमंडलु नदी ब्रम्हपुत्राचे मानसपुत्र जे नरनारायण त्यांच्या कमंडलूपासून उत्पन्न झाली आहे. गौतमाची पत्नी सिंहोदरी गौतमाच्या निधनानंतर गणिका झाली, तिच्या पुत्राची व तिची ओळख न पटून एकशय्या झाली. व पुढें ओळख पटल्यावर तिला व त्याला दोघांनाही उपरति होऊन तीं दोघें तपास निघालीं. तिनें जेथें तप केलें तेथें शिवकृपेनें "गणिका तीर्थ" झालें. गणिकेश्वर या नांवानें उपलब्ध आहे. याचें महात्म्य खालील श्लोकाप्रमाणें आहे:—

ब्रह्मघ्नोथ सुरापोवा मातृगो गुरुतल्पगः ।
अस्मिन्माघव्रतं कृत्वा मुक्तो भवतु तत्क्षणात् ॥७४॥

स्कं० कृ० अ० ९ वा.

कृष्णा व कमंडलु संगमावर "कवितीर्थ" झालें. तेथून दक्षिणेस "पितृतीर्थ" झालें. तेथून पूर्वेस "देवतीर्थ" झालें. धौम्यमहर्षींना त्यांच्या कामांत सिद्धि लवकरच प्राप्त झाल्यामुळें "सिद्धेश्वर तीर्थ" झालें. सिंहोदरीचा मुलगा सुदामा धूत पाप झाल्यामुळें "धूतपाप" तीर्थ झालें. तपन ब्राम्हणाला सत्य व वेद असे दोन मुलगे होते. सत्यानें जेथें तप केलें तेथें "सत्यतीर्थ" झालें. तपनानें व वेदानें तप केल्यामुळें "वेदगिरी" व "तपनेश्वर" हीं स्थानें झालीं. जेथें अश्वत्थ रूपानें नरहरी वास करीत आहे तेथें "विष्णुतीर्थ" झालें.

वरील सर्व तीर्थें वाईक्षेत्राचे बाहेरील झालीं. आतां श्रीक्षेत्र वाईतील तीर्थें देतों:—"अग्नितीर्थ":—ब्रम्हदेवाचा मानसपुत्र जो भृगुऋषि तो याच भागामध्यें रहात होता. त्याच्या पत्नीचें नांव दांता. एकदां भृगुमुनी माध्यान्ह संध्येला गंगेवर गेले असतां

' शूल ' नांवाच्या राक्षसानें द्विजरूप घेऊन आश्रमामध्यें प्रवेश केला. तो कामशरांनीं विद्ध झाल्यामुळें, त्यानें सुस्वरूप अशा त्या भृगुपत्नीला हांक मारली व तुझ्या पित्यानें तुला प्रथम मला द्यावयाचें कबूल केलें होतें असें सांगितलें. त्या वेळेस त्या धर्मभीरू भृगुपत्नीनें गृह्याग्नीला खरी हकीकत विचारली असतां त्या अ-ग्नीनें ' शूलासुराच्याच ' म्हणण्याला अनुमोदन दिलें. शूलासुर ज्या वेळेस भृगुपत्नीला नेऊं लागला त्या वेळेस भृगुपत्नीनें गर्भांत असलेल्या बालकाला हांक मारली त्याबरोबर तो गर्भस्थित बालक बाहेर आला व त्यानें हुंकारानें व आपल्या तेजानें त्या पापी असुराचें भस्म करून टाकिलें. हें सर्व भृगुमुनीस कळल्यावर त्यांनीं अग्नीस शाप दिला. तेव्हां अग्नीनें सागरांत प्रवेश केला. त्या वेळीं सर्व जगतावर व स्वर्गांत हाहाःकार उडाला. मग अ-ग्नीस सर्व देवांनीं तपश्चर्येकरितां जेथें पाठविले तेथें " सिद्धेश्वर " व " अग्नितीर्थ " झालें. या तीर्थाचें महात्म्य खालीं लिहिल्या-प्रमाणें आहे:—

तस्मिन्तीर्थे महापुण्ये तिलांज्ययः प्रयच्छति ।
ब्राह्मणेभ्यो द्विजश्रेष्ठाः पुनात्यासप्तमं कुलं ।। ७५ ।।
यः सोमश्रवणेस्नात्वा सिद्धेशंचावलोकयेत् ।
प्रदोषे द्विजशार्दूल अग्निलोकं समश्नुते ।। ७७ ।।

स्कं० कृ० अ० ९ वा.

वरील तीर्थाचा उल्लेख वैराज क्षेत्रांत नाहीं. परंतु हल्लीं वाई सदरहु तीर्थाचीही वर बसली असल्यामुळें आतां वाई क्षेत्रांत सदरहु तीर्थाचा समावेश होतो.

अतः परं महापुण्यं वैराज क्षेत्रमुत्तमं ।
यस्य संस्मरणादेव सर्व पापैः प्रमुच्यते ॥ १ ॥

स्कं. कृ. अ. १० वा.

अशा श्लोकांनीं वर्णिलेल्या वैराज उर्फ वाई क्षेत्राचें महात्म्य व वर्णन लिहिण्याचें काम ईश्वरी प्रेरणेनें आम्हीं हातीं घेतलें आहे. सिद्धीस नेणार ' श्री ' समर्थ आहेत.

ज्या वैराज क्षेत्राचें उर्फ वाईचें महात्म्य ' कृष्णामहात्म्यांत ' विदित केलें आहे. ते मूळ संस्कृतांतील अध्याय १०।११ व १२ या तिन्ही अध्यायांचें सर्व भाषांतर करणें आम्हीं विस्तार-भयास्तव रहित केलें. परंतु प्रत्येकाचा सारांश मात्र देण्याचा विचार केला आहे.

अध्याय १० वा—महापुण्य असें जें वैराज क्षेत्र येथें ब्रह्म-देवानें द्वादशाब्द सत्र केलें. ब्रह्मदेवानेंच तो यज्ञ केला तेव्हां अ-र्थातच सर्व यज्ञ-पात्रें सुवर्णाचीं व उपकरणें कल्पवृक्षाचीं होतीं. तेथें सर्व देव, ऋषी, गंधर्व व अप्सरा जमल्या होत्या. परंतु श्रीविश्वेश्वराची व श्रीमाधवाची स्वारी नसल्यामुळें कोणीही स्था-नापन्न होईना. त्या वेळेस वायूस ब्रह्मदेवानें श्रीक्षेत्र वाराणसीस जाऊन सर्व देवतांना आणण्यास सांगितलें. वायूनें श्रीविश्वेश्वर व श्रीमाधव वगैरे देवतांची प्रार्थना केल्याबरोबर श्रीउमा-महेश्वर, श्रीलक्ष्मीमाधव, दंडपाणि, कालभैरव, कलावती, पद्ममालिनी व मालती वगैरे विद्याधरीही निघाल्या. भरद्वाज, देवल, महर्षि-व्यास वगैरे सर्व ऋषीही या समारंभाकरितां निघाले. श्रीस्वयं-भूनें सर्वांस सामोरे जाऊन मोठ्या समारंभानें त्यांस यज्ञमंड-पांत आणिलें. ऋत्विजाची निवड करावयाचे वेळेस ब्रह्मदेव व

त्याची पत्नी सावित्री या दोघांनींही सर्व ऋषींचा व ऋषिपत्न्यांचा सन्मान केला. परंतु ब्रह्मदेवाची द्वितीय पत्नी गायत्री तेथें नसल्यामुळें श्रीसरस्वतीनें शांडिल्यास गायत्रीस आणण्यास सांगितलें. त्याप्रमाणें गायत्री आल्यावर सवतीमत्सरानें सावित्री गुप्त झाली.ती सह्याद्रीपासून प्रवाह रूपानें निघून पश्चिमेकडे समुद्रास जाऊन मिळाली. तेथें मोठें तीर्थ झालें. इकडे सावित्री गुप्त झाल्यामुळें ब्रह्मदेव मूर्च्छित झाला. तेवढी संधी साधून यज्ञांत विघ्न करण्याकरितां एक महापापी दैत्य आला. त्याला मारण्याकरितां श्रीशंकरांनीं त्रिशूल फेंकला. परंतु तो कृष्णा प्रवाहांत गुप्त झाला. त्रिशूल फेंकला त्या जागीं "त्रिशूलेश्वर" व "त्रिशूल तीर्थ" झालें. श्रीशंकरांनीं विष्णूपासून सुदर्शनचक्र मागून घेतलें व त्या दैत्यावर फेंकून त्याचा नाश केला. तेथें "चक्रेश्वर" व चक्रतीर्थ" झालें. चक्रतीर्थाचे पुढें "काळेश्वर" व "भैरवतीर्थ" झालें. चक्रतीर्थ व भैरवतीर्थ यांचेमध्यें "हरिहरेश्वर" व हरिहरतीर्थ" आहे. हरिहरेश्वर हल्लीं कौंतेश्वर या नांवानें उपलब्ध आहे. विशालाक्षी श्रीभवानीचें व श्रीकालभैरवाचें अशीं देवालयें आहेत. या सर्व तीर्थांचा महिमा अगाध आहे.

अध्याय ११ वा—श्रीदशरथपुत्र रामचंद्राचे द्वारीं जयशर्मा ब्राह्मणानें आपल्या प्रिय ब्रह्मचारी पुत्राचें शव एके दिवशीं आणून टाकलें व "अकालीं मृत्यु येणें हा राजाचा दोष आहे याकरितां माझ्या पुत्राच्या मरणास तूंच कारण आहेस. तेव्हां मी आतां तुझ्या द्वारीं प्राण देतों," असें म्हणाला. श्रीरामचंद्रांनीं त्यास थांबवून आपण अधर्माचरण कोठें होत आहे त्याच्या

शोधास निघाले. त्यास एक शूद्र तप करीत असलेला दृष्टीस पडला. त्या तापसाचा श्रीरामचंद्रानीं वध केल्याबरोबर त्या जयशर्माचे पुत्राचें शव जिवंत झालें. पुढें तापसवधाचे क्षालनार्थ ते श्रीकृष्णातटाकीं राहिले. तेथें त्यांनीं स्नानाला धनुष्यानें कुंड खणिलें. तेंच रामकुंड हाल्लीं " रामडोह " या नांवानें प्रसिद्ध आहे. याचाही महिमा अगाध आहे.

अध्याय १२ वा.--पौलस्त्य मुनींना भीम नांवाचा मुलगा होता. हा फार बुद्धिमान् होता. तरी फार गर्विष्ट होता एके दिवशीं भीम उपमन्यूला सभेमध्यें कांहीं टाकून बोलला. त्याबरोबर उपमन्यूनें त्यास " तूं कोल्हा होशील " असा शाप दिला. त्या शापापासून मुक्त होण्याकरितां तो कृष्णातटाकीं राहिला. पौलस्त्यमुनि श्रीजान्हवीची भक्ति करीत असत, त्यांस पुत्रवियोग झाल्यामुळें ते त्याच्या शोधास निघाले. तों भीम पूर्वरूप प्राप्त झालेला त्यांस दृष्टीस पडला. त्यांनीं या कृपेबद्दल जान्हवीची स्तुति केली. त्याबरोबर तेथें जान्हवी उत्पन्न झाली. ती कृष्णेस मिळाली तेथेंच " जान्हवीतीर्थ " व " भीमाशंकर " व " भीमकुंडतीर्थ " अशीं तीर्थें झालीं. इकडे ब्रह्मदेव सावध झाल्यावर त्यानें गायत्रीसह यज्ञ पूर्ण केला. त्या वेळेस अग्नीनें त्यांस ' अमृतपात्र ' दिलें. तेथें ब्रह्मदेवानें लिंग स्थापिलें. त्याचें नांव ' ब्रह्मामृतानंद ' असें पडलें. ऋषींनीं अवभृथ स्नानाकरितां सरस्वतीस पाचारण केलें. तेव्हां ती कृष्णेस येऊन मिळाली. (ही सरस्वती हल्लीं कीचक ओढा अथवा किवरा या नांवानें प्रसिद्ध आहे.) हिचा व कृष्णेचा संगम अग्निकुंडाचे पुढें जवळच झाला आहे. ब्रह्मामृतानंदाचे पश्चिमेस विष्णुकुंड. नैऋत्येस ब्रह्मकुंड व दक्षिणेस शिवकुंड

अशीं आहेत. (हीं हल्लीं दृश्यमान नाहींत.) या ब्रह्मामृतानंदाचें त्रेतायुगीं ' अमृतेश ' असें नांव पडलें. द्वापारयुगीं ' सत्यधर्मेश ' म्हणूं लागले. व कलियुगीं हा ब्रह्मामृतानंद " भद्रेश्वर " या नांवानें प्रसिद्ध झाला.

याप्रमाणें तिन्हीं अध्यायांतील सारांश दिला. तेराव्या अध्यायांत वरील ब्रह्मामृतानंदाचीं निरनिराळीं नांवें कां झालीं याबद्दल ऋषींनीं प्रश्न केला त्याचें उत्तरः—

कृतयुगीं—ब्रह्मामृतानंद नांव पडण्याचें कारण वर दिलेंच आहे.

त्रेतायुगीं— श्रीशिवांनीं कंटकासुरापासून सर्व देवांचें रक्षण केलें म्हणून " अमृतेश " नांव पडलें.

द्वापारयुगीं:—कालगतीनें धर्मलोप झाला तो श्रींशिवांनीं स्थापन केला म्हणून " सत्यधर्मेश " नांव पडलें.

कलियुगीं—कुंतीपुत्र व माद्रीपुत्र असे जे पांच पांडव यांनीं राजसूययज्ञ समाप्त केल्यावर भयंकर उत्पात वगैरे होऊं लागले. त्या वेळेस अरिष्ट निरसनार्थ व्यासांनीं त्यांस तीर्थाटन करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें पांडवांनीं द्यूताचें मिष करून अकरा वर्षें तीर्थाटन केलें व बारावे वर्षीं सत्यधर्मेशाच्या जवळ येऊन कृष्णातटाकीं राहिले. त्या वर्षीं कन्यागत होता. त्यांचा अज्ञातवास संपल्यावर त्यांचें भद्र (कल्याण) झालें. म्हणून यास 'भद्रेश्वर' असें नांव पडलें.

कन्यागतीं श्रीभागीरथी कृष्णेला भेटण्याचें कारण स्कंदपुराणांतर्गत कृष्णा महात्म्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें सांगितलें आहे.

दिवोदासो नृपो राज्यं प्रशासति यदा द्विजाः ।
ऋषयो देवताः सर्वाः काशीं त्यक्त्वा यदा गताः ॥ ३५

विश्वेशे मंदरं याते ऋषयश्च तपोधनाः ।
तीर्थयात्राप्रसंगेन दक्षिणां दिशमादरात् ॥ ३६ ॥
गोदावरीं समायाताः केचित्तत्रैवतस्थिरे ।
पर्यटंतः सुतीर्थानि गौतमाद्याश्च सुव्रताः ॥ ३७ ॥
जनस्थाने स्थिता नित्यं तपःकर्तुं समुद्यताः ।
व्यासश्च याज्ञवल्क्यश्च मांडव्यः सुतपास्तथा ॥ ३८ ॥
शौनको जैमिनिश्चैव मार्कंडेयोथदेवलः ।
पराशरो भरद्वाजो वसिष्ठः कौशिकस्तथा ॥ ३९ ॥
कश्यपो जमदग्निश्च सहपुत्रश्च वीर्यवान् ।
दत्तात्रेयो महायोगी कपिलोन्येचयोगिनः ॥ ४० ॥
तीर्थानि चैनसोघ्नानि पर्यटंतोथसह्यजां ।
कृष्णावेणीं समालोक्य विश्रंभं प्राप्नुयुर्मुदा ॥ ४१ ॥
परस्परं भाषयंतो धन्येयं भोमुनीश्वराः ।
कृष्णातीरं समासाद्य आश्रमांश्चक्ररूद्यताः ॥ ४२ ॥
सह्याद्र्यंतिकमायाताः कृष्णां द्रष्टुं समुत्सुकाः ।
सर्वे मिलित्वा ऋषयो जान्हवी स्तोतुमुद्यताः ॥ ४३ ॥
आगमिष्यति चेत्गंगा त्रैलोक्ये मुक्तिदायिनी ।
तपसा साध्यते सर्वं तपएवहि कारणं ॥ ४४ ॥
एकाग्रचित्ता अभवन्योगमार्गेण योगिनः ।
नारायणो दयावांश्च आगत्य मुनयोंतिकं ॥ ४५ ॥

वृणीध्वं मुनयो यूयं वरान् वैमनसेप्सितान् ।
देवानामपि यल्लोके दुर्लभान् प्रददामि वः ॥ ४६ ॥
योगिन ऊचुः—
भवच्चरणयुगास्य दर्शनात्कृतकृत्यतां ।
वयं प्राप्तास्तथापीश परोपकृतये गुरौ ॥ ४७ ॥
प्रार्थयामो वरं कंचिच्छेवधिः सर्वकर्मणां ।
त्वत्पादांबुजसंभूता भित्वा ब्रह्मांडमुद्गता ॥ ४८ ॥
ब्रह्मणोंतिकमासाद्य ततो राज्ञावतारिता ।
सदाशिवजटोद्भूता गंगा त्रिपथगामिनी ॥ ४९ ॥
स्वामिन्दयानिधे त्वं च कृष्णवेणीं तु पावनीं ।
आनीतव्या त्वया देव कारुण्यान्मदनुग्रहात् ॥ ५० ॥
कन्यागते देवगुरौ मूढान् संतारयिष्यति ।
नारायण उवाचः—
शृणुध्वं मुनयः सर्वे भवतां कांक्षितंमया ॥ ५१ ॥
कर्तव्यं सर्वथा नित्यं एकाग्रेण युगे युगे ।
तदा स्मृता जान्हवीच त्रैलोक्यगुरुणांजसा ॥ ५२ ॥
समायाता विष्णुपदी हरेराज्ञाकरी तदा ।
गुरौ कन्यागते यामित्यवश्यं वचसा तव ॥ ५३ ॥
नियमश्च कृतोमात्रा यावद्भूरविवायवः ।
तावद्यास्यामि भो स्वामिन् द्वादशाब्दे तु सद्गुरो ॥५४॥

इति श्रुत्वाथ मुनयो संतोषं लेभिरे ततः ।
अंतर्धानं गतो देवो जान्हवी यत्रसंस्थिता ॥ ५५ ॥

स्कं. कृ. अ. १३

सारांश—दिवोदास राजा राज्य करीत असतां सर्व देव व ऋषी काशी सोडून चालले. श्रीविश्वेश्वर मंदराचळीं गेले. कित्येक ऋषी गोदावरीतीरीं राहिले. व्यासादि ऋषि कृष्णातीरीं येऊन तपश्चर्या करीत राहिले. त्यास नारायण प्रसन्न झाले व वर माग ह्मणून आज्ञा केली. सर्व ऋषींनीं "गुरु कन्या राशीस आला असतांना श्रीभागीरथीनें कृष्णाबाईस भेटावें" असा वर मागितला. त्याप्रमाणें नारायणांनीं वर दिल्यावर नारायण अंतर्धान पावले. कन्यागतीं श्राद्ध करण्याचें महत्व केवढें आहे व त्यांत श्रीभद्रेश्वरासांनिध करण्यांत किती जास्त महत्व आहे. हें खालील श्लोकावरून दिसून येत आहे.

करिष्यंति नरा भक्त्या पितनुध्दारयंतिते ।
कन्यागते गुरौ यस्तु तीर्थ श्राद्धं करोति वै ॥६०॥
कन्यागते गुरौ विप्राः स्नात्वा भद्रेश संनिधौ ।
यो ददाति द्विजोग्रेभ्यो वृत्तिमात्रां वसुंधरां ॥६७॥
मध्यक्षेत्रां सुकृष्णांच यव गोधूम शालिनीं ।
सर्व पाप विशुत्धात्मा सर्वभोग समन्वितः ॥६८॥
तदंते सागरांतायां राजा भवति धार्मिकः ।
ज्ञानध्यान समायुक्त स्तदंते शिवमाप्नुयात् ॥६९॥
प्रीणंती पितरस्तस्य ऋषयोपि सनातनाः ।
देवताश्चापि तुष्ट।स्युः कृष्णायां श्राद्ध पिंडतः ॥७०॥

स्कं. कृ. अ. १३ वा.

वाई क्षेत्रापासून दोन कोसांवर " गोष्पदतीर्थ व हाटकेश्वर " आहेत. याची कथा अशी आहे कीं, वासुकि नांवाचा सर्पांचा राजा होता. त्याला शतपुत्र होते. एके दिवशीं नंदीवर आरूढ होऊन पार्वती हाटकेश्वरीं स्नानास आली. तिचें रूप पाहून ते शतपुत्र कामातुर झाले. त्यावेळीं नंदीनें त्यांना " तुमचें वंशच्छेदन होईल " असा शाप दिला. पुढें वासुकीनें मुलगे मृत झाल्यामुळें त्यांस जिवंत करण्यास काय उपाय करावा असें हाटकेश्वरास प्रसन्न करून घेऊन विचारलें. त्यावर कामधेनु आण असें श्री हाटकेश्वरांनीं सांगितलें. नंतर वासुकीने ब्रह्मदेवाकडे जाऊन सुवर्णाच्या कामधेनु आणिल्या. त्यांनीं नदींत अमृतस्राव केल्याबरोबर शतपुत्र जिवंत झाले. कामधेनु जेथें स्थिर झाल्या तेंच " गोष्पद तीर्थ " होय. याचाही महिमा खालील श्लोकावरून फार मोठा आहे असें सिद्ध होत आहे.

हिरण्येन तुयः श्राध्दं कुरुते गोष्पदे नरः ।
पितृंस्तस्थोपतिष्ठत्तत्क्षीरसर्पिर्मधूदकं ।। ४३ ।।

गवादिकं च यो दद्यात् तीर्थश्रेष्ठ तु गोष्पदे ।
गोहत्यादि कृतं पापं तत्क्षणादेव नश्यति ।। ४५ ।।

दीपोत्सवं तु कार्तिक्यां सुवर्णेशं करोति यः ।
आसप्तमकुले तस्य दारिद्र्यं नैवजायते ।। ४६ ।।

भगवद्भ्यस्तपस्विभ्यः शर्कराघृतपायसं ।
गोष्पदे यः प्रयच्छेत ब्रह्मलोकं स गच्छति ।। ४७ ।।

स्कं. कृ. अ. १४

याप्रमाणें स्कंदपुराणांतर्गत कृष्णामहात्म्यांतील तीर्थांच। आह्मांस पाहिजे तेवढ्यांचाच उल्लेख केलेला आहे. वैराज ऊर्फ वाईक्षेत्रांतील व त्याच्या जवळील तीर्थें व पवित्र स्थानें बहुतेक दृश्यमान आहेत व कांहीं कालगतीनें लोपलीं आहेत.

पुराणकालीन वैराज ऊर्फ वाईक्षेत्राचें वर्णन संपलें. आतां ऐतिहासिक कालाचें वर्णन देतों:—परंतु हें वर्णन देण्याचे आधीं सातारा ग्याझिटियरचा उतारा येथें देऊन नंतर ऐतिहासिककालीन माहिती देण्याचा विचार आहे.

सातारा ग्याझीटीयर मधील वाईसंबंधीं संक्षिप्त माहिती—वाई हें गांव श्रीकृष्णेच्या डावे बाजूस आहे. सन १८५९ त म्युनिसिपालिटी स्थापन झाली. सन १८७२ त लोकसंख्या ११०६२ होती, त्यांत १०१२६ हिंदु व ९३६ मुसलमान होते. सन १८८१ त लोकसंख्या ११६७६ होती, त्यांत १०६९८ हिंदु, ९६३ मुसलमान व १५ इतर. वाईपासून पुणें ५६ मैलांवर आहे. वाईचे पूर्वेस सात मैलांवर सुरुर आहे. श्रीकृष्णेच्या कांठीं, सर्व क्षेत्रांत हें क्षेत्र ब्राह्मण वस्तीनें जास्त आहे. वाईचे पश्चिम टोंकास गणपतीचे देवळापासून १५० फूट अंतरावर धरण आहे. त्याचे पलीकडे डोह आहे. सर्व मिळून अर्धा मैल घाट आहेत. पसरणी व पांडवगड मधून नदी वाहते. पश्चिमेच्या बाजूस सह्याद्रि दिसतो, म्युनिसिपालिटीची शिल्लक२६३० सन १८८२।८३ सालीं उत्पन्न ६४९० होतें, खर्च ७०४० झाला, येथें सुमारें सावकार व व्यापारी १५० होते. त्यांत बहुतेक ब्राह्मण जास्ती.

वाडा, घाट आणि देऊळ गंगापुरीचा घाट १२ पायऱ्यांचा २०० फूट लांबीचा गंगाधरराव रास्ते यांनीं सन १७८९ त बांधिला, भाऊ जोशी यांनीं सन १७९६ त ७६ फूट जास्त वाढविला. पुढें दुसरे बाजिराव पेशवे यांनीं १८१७ त ८० फूट वाढविला, एकंदर घाटाची लांबी ३५६ फूट आहे, कमानीचे आंत गेल्यावर डावे हातास वाडा व उजवे हातास श्रीउमामहेश्वरपंचायतनाचें देऊळ, १७८४ त गंगाधरराव रास्ते यांनीं देऊळ बांधिलें, उंची ४० फूट. चार देवळें चारी बाजूस विष्णु, लक्ष्मी, गणपती व सूर्य, धाकटेश्वर महादेवाचें देऊळ नंदी व पिंडी पांढरे पाषाणाची आहे, गंगारामेश्वराचें देऊळ १७८० त गंगाधरराव रास्ते यांनीं बांधिलें, गणपतराव भिकाजी रास्ते यांनीं श्री गणपतीचें देऊळ १७८० बांधिलें, खर्च दीड लाख रुपये झाला, ज्या घाटावर हें देऊळ आहे तो घाट यांचे बंधु आनंदराव रास्ते यांनीं बांधिला, लांबी १६३ फूट, मंडपाची लांबी ६० फूट, रुंदी ३० फूट, शिखराची उंची ७० फूट आहे.

श्रीकाशीविश्वेश्वर देऊळ--सभोंवार तट आहे. तटाची लांबी २१६ फूट; रुंदी ९५ फूट; आनंदराव यांनीं १७५७ त हें देऊळ बांधिलें. कुंड मंडप ४० फूट चौरस. खांब १६ व्यास १॥ फूट; १५ फूट उंच आहे. दिपमाळी दोन आहेत. नंदी काळा पाषाणाचा उत्तम नकशीदार पालिस केलें आहे. श्रीमहालक्ष्मीचें देऊळ आनंदराव रास्ते यांनीं १७७८ त बांधिलें. खर्च २७५६३० रुपये लागला; सभामंडप व गाभारा आहे;७० फूट लांबी यांत एक चोरवाट आहे. शिखराची उंची ५६ फूट असावी. श्रीविष्णु मंदीर हें देऊळ आनंदराव रास्ते यांनीं १७७४ त

बांधिलें. खर्च २१६२९० रु. लागला. ४८ फूट लांब व १८ फूट रुंद शिखराची उंची ३९ फूट आहे. ८ महादेवाची देवळें, एक विठोबाचें देऊळ, दत्तात्रयाचें देऊळ विनायक बोवांनीं १८६१ त बांधिलें. ज्या घाटावर आहे तो घाट आनंदराव भिकाजी यांनीं १७८९ त बांधिला. ताईसाहेब भोरकर यांची पणजी, यांनीं विठोबाचें देऊळ बांधिलें. नव्या पुलापासून १०० यार्डावर पेशवे यांचा जुना पूल. रास्ते यांचा मोतीबाग व बंगला आहे. पालपेश्वर कोरीव लेणी, २०० यार्ड एक विहार आहे. पिंडीचें माप ६-४ उंच व ८ फूट व्यास आहे. मोतिबागेंतला वाडा १७८९ त बांधिला. आनंदराव यांनींच बांधिला. खर्च १०२००० रु. लागला. वाईला विराट नगरी असें म्हणतात. १४२९ त दौलताबादच्या बाहामणी बादशहाचा सुभेदार 'मलिकउलतुजा' यानें खटाव आणि महादेवाचा डोंगर येथील रामोशी वगैरे लोकांना—त्यांचें वर्चस्व नाहींसें करून घालवून दिलें व पुढें वाई येथें १४२९ त आला. नंतर १४५३ ते १४८० चे दरम्यान वाई बाहामणी बादशहाचे लष्कराचें ठिकाण होतें. १४६४ च्या सुमारास महंमुदगवान वजीर कोंकण मध्यें स्वारीला गेला होता; तेव्हां येथील लष्करास त्याला जाऊन मिळण्यास हुकूम आला होता.

१६४८ त वाई हें विजापूर येथील मुकासदार यांचे रहाण्याचें मुख्य ठिकाण होतें. १६५९ त प्रतापगड येथें शिवाजीनें अफझुलखानाचा वध केला, त्याचे अगोदर अफझुलखानाच्या लष्कराचा तळ वाई येथें होता. १६५९ नंतर वाई हें श्री शिवाजीचे ताब्यांत आलें. १६८७ त वाईवर विजापूरचा सेना-

ती शिरजेखान यानें हल्ला केला. परंतु हंबीरराव मोहिते या नांवाच्या सरदारानें त्याचा पराभव केला.

राजारामाचे कारकीर्दींत १६९० त मोंगलांनीं वाई हें पुन्हां हस्तगत करून घेतलें. परंतु संताजी घोरपडे (कापशीच्या घोरपड्यांचा मूळपुरुष) यानें पुन्हां मोगलांपासून वाई परत घेतली. रामचंद्रपंत अमात्य यांनीं सुचविलेल्या युक्तीनें वाईचे फौजदारावर छापा घालून त्याला कैद केलें व मराठे लोकांचे ठाणें बसविलें. रामचंद्रपंताचा कारकून शंकराजी नारायण याचे ताब्यांत वाई हें दिलें. त्यानें भोर संस्थानांतील राजगड नांवाचा किल्ला मोंगलांपासून परत घेतला. १७७४ त श्रीमंतांचें खुनाचे वेळीं पुण्याचे न्यायाधीश ' रामशास्त्री ' हे वाईचे नजीक एकांतस्थानीं राहिले होते. १७९६ त नानाफडणवीस वाईला निघून आले. हरीपंत फडके चार हजार स्वारांनिशीं नेण्याकरितां आले. परंतु नाना कोंकणांत पळून गेले.

लेडी फॉकलंड या युरोपियन बाईनें म्हटलें आहे कीं-- "वाईसारखी सुंदर जागा माझे पाहण्यांत नाहीं. मी पुष्कळ वेळा वाई येथें आलें आहें व जेव्हां जेव्हां मी येतें तेव्हां तेव्हां नवीनच शोभा दिसते. येथील सृष्टीसौंदर्य फारच रमणीय आहे. व येथें मनाला आनंद देणारीं एकांत स्थानें आहेत." ट्रायव्हलर्स बँगलो मधून फार सुंदर देखावा दिसतो. बावधन वाईपासून तीन मैलांवर आहे.

वरील प्रमाणें सातारा ग्याझीटीयरचा उतारा आहे. आतां वरील उताऱ्यावरून व इतर माहितीवरून ऐतिहासिक माहिती थोडक्यांत देतों.

इ. स. १४२९ त दौलताबादच्या बाहामणी राजाचा सुभेदार ' मलिकउलतुजा ' यानें वाई घेतली. जवळ जवळ वीस वर्षे बाहामणी राजाचा येथें अम्मल होता. पुढें १६४८ पासून १६५९ पर्यंत वाई येथें विजापूरच्या बादशहाचा अम्मल होता. १६५९ मध्यें विजापूरकरांचा सरदार अफ़्जुलखान याचा प्रतापगडाचे पायथ्याशीं श्रीशिवाजीराजे यांनीं वध केला. तेव्हांपासून वाई-प्रांतावर शिवाजीमहाराजांचा अम्मल सुरू झाला. या वधाचे वेळीं गोपीनाथपंत बोकील यांनीं महत्वाची कामगिरी केली. त्याबद्दल बोकील यांस हिवरें हा गांव श्रीशिवाजीमहाराज यांनीं इनाम करून दिला. हा गांव हल्लीं बोकील यांचे वंशजांकडे आहे. बोकील यांचें घर येथें ब्राह्मणशाईत आहे. महाराजांचें मृत्यूनंतर सन १६९० मध्यें मोंगलांनीं वाईवर चाल केली होती. परंतु, संताजी घोरपडे यांनीं तो हल्ला परतविला. त्यानंतर शाहुराजे सन १७०८ मध्यें दिल्लीहून सुटून आले, त्या वेळेस त्यांस राज्यावर बसविण्याचे कामीं येथील प्रसिद्ध शेखमिरे यांनीं मदत केली. हें मनास आणून शाहूमहाराज यांनीं पसरणी गांव इनाम दिला. वगैरे सर्व हकिकत शेखमिरे यांच्या या पुस्तकांत दिलेल्या हकिगतींत आहेच. शाहूमहाराज यांचे कारकीर्दींत रामाजी दामोदर गाडगीळ व भिकाजी शामजी रास्ते वाईस आले. दोघेही महाराजांचे पदरचे असून मर्जींतले होते. भिकाजी शामजी रास्ते वाईस आल्यावर एक लहानसा वाडा बांधून त्यांत राहूं लागले. तो वाडा हाल्लीं धर्मपुरींत आहे. यांची मुलगी गोपिकाबाई श्रीमंत नानासाहेब पेशवे यांस दिल्यामुळें यांचा उर्जितकाळ झाला. यांचे पुत्र मल्हाराव यांनीं श्रीमंताकडून सरदारी मिळविली.

दुसरे पुत्र आनंदराव भिकाजी यांची कन्या साठे यांस दिली. या साठे यांची सर्व हकीगत व रास्ते यांची हकीगत यांत पुढें दिली आहे. याच वेळीं रामाजी दामोदर यांस अक्कलकोटची दिवाणगिरी मिळाली; व याच सुमारास येथील हक्कदार मोरो भिकाजी देशपांडे हे होते. या पांचही घराण्याचा उदय कसा झाला व ती कशी महत्वास वाढली ती सर्व हकीकत या पुस्तकांत दिलीच आहे.

पूर्वी सातारा हा इलाखा होता. परंतु हल्लीं सातारा जिल्हा झाला आहे. या जिल्ह्यापैकीं वाई हा तालुका आहे. या तालुक्याची चतु:सिमा पूर्वेस चार मैलावर ओझर्डें, दक्षिणेस सोनजाईचा डोंगर व बावधन (सोनजाईचे डोंगरापर्यंत एक कोस पायथा व अदमासें एक मैल चढाव आहे. व बावधन वाई पासून तीन मैल आहे.) पश्चिमेस एक मैल मेणवली व तेथून चार मैल धोम आहे. आणि उत्तरेस मोतिबाग, एक कोस बोपर्डी, एक मैल सुलतान टेकडी, व पांच मैलावर पालपेश्वरची लेणी आहेत.

आतां येथील मोठमोठालीं देवालयें व घाट यांचें वर्णन पश्चिमेकडून पूर्वेकडे म्हणजे अनुक्रमें प्रथम गंगापुरीपासून देतों——

गंगापुरींतील वर्णनः——श्री कृष्णाबाई पश्चिम-पूर्व वाहिनी आहे. सर्व घाटांत गंगाधरराव रास्ते यांचा घाट मोठा आहे. याची लांबी ३७५ फुट व रुंदी ५०--६ आहे. याला बारा पायऱ्या आहेत. या घाटास लागूनच पश्चिम दिशेस श्रीमंत दुसरे बाजीराव पेशवे यांचा घाट ८० फूट लांबीचा आहे. याला चार पायऱ्या आहेत. हा घाट चौथऱ्या सारखा आहे. कारण ७ फूट उंच पायऱ्यावर असून त्यावर इतरांनीं देवालयें बांधीलीं आहेत.



"गंगापुरीच्या घाटाचा देखावा."

भाऊ यज्ञेश्वर देवकुळे यांनीं " यज्ञेश्वर सांब " चें लहानसें देऊळ बांधिलें आहे. याचे मागें एक लहानसे मारुतीचे देऊळ आहे. या दोन्हींच मधून खालच्या पायऱ्यावर जाण्यास, या चौथऱ्यास लहानशा आठ पायऱ्या आहेत. शिवाय या चौथऱ्यावर गंगाधर बाळकृष्ण मराठे यांनीं लहानसें " काशीविश्वेश्वराचें " देऊळ बांधिलें आहे. याचे समोर चार खणाचा सोपा आहे. श्रीमारुतीचे पुढें अश्वथ्याचा वृक्ष फार मोठा व जुनाट आहे. देवकुळे व मराठे यांचे वंशज हल्लीं येथें आहेत. रास्ते यांचे घाटास लागूनच पूर्वदिशेस भानूंचा घाट ५२--२ लांबीचा आहे. या घाटास लहानसे दोन बुरुज असून बहुतेक या बुरुजाजवळ नेहमीं पाणी असतें. या घाटास लागून पूर्व-दिशेस भाऊ जोशी यांचा घाट २८--९ लांबीचा आहे. या घाटास लागूनच उत्तरेस एक भानूंचा व एक दामल्यांचा असे दोन पार आहेत. हे पार पूर्वीं, हल्लीं जेथें नवें पटांगण केलें आहे, तेथें होते. या पाराजवळच आळींतील नाला सोडिला आहे. येथें दक्षिणाभिमुख एक मोठी वेश आहे. हिची उंची अदमासें १५--१६ फूट, रुंदी १०--१०॥ असून भिंतीची रुंदी ९ फूट आहे. या वेशीला लागूनच अनगळ यांचा वाडा आहे म्हणून हिला ' अनगळ वेश ' असें म्हणतात. भानू यांचे घाटाचे फरशीला लागूनच अलीकडे ६।७ वर्षांत मोठें पटांगण व सिंहासन बांधिलें आहे. हें सिंहासन २--१० उंचीचें असून १७ फूट रुंद व १९ फूट लांब आहे. ह्या सिंहासनावर पूर्वाभिमुख कोरीव लिहिलेला मजकूर " श्री कृष्णाबाई चरणीं तत्पर लक्ष्मण मोरेश्वर शास्त्री हळवे आणि मंडळी गंगापुरी शके १८२५ " असा

आहे.या सिंहासनावर कृष्णाबाईचे उत्साहांत श्रीकृष्णाबाईची मूर्ती बसवितात. याचे पुढील पटांगणाचे योगानें या घाटास फारच शोभा आली आहे. पटांगणाची लांबी ८२--२ व रुंदी ९३--१ आहे. सिंहासनाचें मागें श्रीमारुतीचें देऊळ आहे. सिंहासनाचे उत्तरेस जवळच एक मोठी वेश आहे. या वेशीचे दोन्ही बाजूस बुरुज आहेत. त्यांतील अंतर १७--६ आहे. वेशीची रुंदी १-६ व उंची १५।१६ फूट अजमासें होईल. भिंतीची रुंदी १०।६ आहे. या वेशींतून आंत गेलें असतां, डावे हातास श्री उमामहेश्वर पंचायतनाचें देऊळ व उजवे हातास भानू यांचा वाडा, ज्या भानूंनीं घाट बांधिला त्यांचाच हा वाडा होय. हा रस्ता पुढें खांबोळ्याचे वेशीकडे गेला आहे.

श्रीउमामहेश्वराचें देऊळः--हें गंगाधरराव भिकाजी यांनींच बांधिलें. देवालय पूर्वाभिमुख आहे. गाभारा ११--५॥ चौरस आहे. गाभाऱ्यापुढील सभामंडप १७--३ चौरस आहे. गाभारा व सभामंडपामधील भिंतींची रुंदी ४--५ आहे. गाभारा व सभामंडप ज्या चौथऱ्यावर आहे त्या चौथऱ्याची उंची ३ फूट, लांबी ४३--९ व रुंदी २७--९ आहे. या देवालयाचे चारी कोपऱ्यांत लहान देवालयें आहेत. नैऋत्येस श्रीगणपती, वायव्येस श्रीलक्ष्मी, ईशान्येस श्रीविष्णु, व आग्नेयेस श्रीसूर्य; म्हणून याला पंचायतनाचें देऊळ असेंही म्हणतात. सभामंडपाचे समोर एका चौथऱ्यावर नंदी आहे. त्यावर चौफेर कमानी आहेत. उंची ७--११ आहे. नंदीचा चौथरा ७--७॥ चौरस आहे. उंची १--९ आहे. या पांचही देवालयाखालील फरशी ८७--५ लांब व ६८--८ रुंद आहे. देवालयाचे सभोंवार साधारण तट

असून लांबी ११६--२॥ व रुंदी ८४--१० आहे. तटास चारी बाजूस दरवाजे आहेत पैकीं पूर्वाभिमुख मुख्य दरवाजा आहे. पश्चिमदरवाज्याबाहेरील जागा येथील प्रसिद्ध वकील शंभूराव करंदीकर यांची आहे. यांनीं या जागेंत स्नान-संध्येकरितां एक मठ बांधिला आहे याच मठांत (परांजपे) प्रज्ञानंद स्वामींची समाधी आहे. श्री उमामहेश्वराचें देऊळ सर्व काळ्या पाषाणाचें आहे. पूजा वगैरे व्यवस्था, गंगाधरराव रास्ते यांचे वंशज हल्लींचे अज्ञान रावसाहेब फर्स्टक्लास सरदार रास्ते यांचेकडे आहे. गंगाधरराव रास्ते यांचे घाटावरून यांचे वाड्याकडे जाण्यास एक वेश लागते, ह्या वेशींतून आंत गेल्यावर उजवे हातास ' राममंदीर ' आहे, याला 'काळ्या रामाचें मंदीर' असें ह्मणतात. याचें कारण श्रीराम काळ्या पाषाणाचे आहेत. श्रीलक्ष्मण व श्रीसीता संगमरवरी पाषाणाचीं आहेत. मूर्ती फारच सुंदर आहेत. हें मंदीर साने यानीं बांधून मूर्ती स्थापन केल्या. नंतर जरा पुढें गेलें असतां डावे हातास श्री मुरलीधराची मूर्ती एका लहानशा दगडी गाभाऱ्यांत आहे. ही मूर्ती १--१०उंच संगमरवरी पाषाणाची असून सुबक आहे. येथून जरा पुढें गेलें असतां एक मोठा तटबंदी वाडा लागतो. हाच गंगाधरराव रास्ते यांनीं स्वतःकरितां बांधिलेला वाडा होय. हा वाडा पूर्वाभिमुख आहे. येथील कमेटी नंबर ९१ मुख्य दरवाजावर आहे. वाड्याचे सभोंवार मजबूत उत्तम बांधणीचा तट आहे त्याची पूर्वपश्चिम लांबी २३०--६, रुंदी दक्षिण उत्तर ९०--४, तटाचे भिंतीची रुंदी ४--८ व उंची २७ फुट आहे. तटाचे चारी बाजूस लहान बुरुज आहेत. तटावरून फिरण्याची वाट ३--९ रुंदीची

आहे. शत्रूवर गोळीबार करण्याकरितां चौफेर तटास लहान लहान भोकें आहेत. तटाचे मुख्य दरवाजाची उंची १० फूट व रुंदी९–८॥ आहे. दर्शनी दोन कट्टे आहेत. यांची उंची ३ फूट व रुंदी ३–७॥ आहे. ह्या दरवाज्यांतून आंत गेल्याबरोबर समोर वाड्याचा दरवाजा दिसतो. या दरवाजाची उंची ९ फूट व रुंदी ९-४॥आहे. वाड्याला दोन चौक आहेत. हा वाडा जुन्या पद्धतीचा असून मजबूत व उत्तम नकशीदार आहे. वाड्यांतील दोन्ही चौक २८–९ चौरस आहेत. हा वाडा सबजज्ज कोर्टास भाड्यानें दिला आहे. पुढील चौकांत सबजज्ज कोर्ट व मागील चौकांत सबजज्ज साहेब रहातात. पुढील चौकांत खालीं कचेरी व माडीवर कोर्ट बसतें. हा वाडा दुमजली असून फार मजबूत आहे, ज्या माडीवर कोर्ट बसतें तो पूर्वींचा दिवाणखाना होय. हा बराच उंच असून याला कमानी आहेत. नऊ खणाचा दिवाणखाना असून पांच लहान व दोन मोठ्या अशा कमानी आहेत. याची लांबी ५२–५ व रुंदी १७—११ आहे. कमानीची उंची १०—७ व रुंदी ४–१० आहे. दोन मोठ्या कमानीची रुंदी ९–८ व उंची १०–७आहे. याच चौकांतील दुसरा दिवाणखाना दोन सोप्याचा आहे. ह्याची लांबी ५१–५ व रुंदी २६–४ आहे. दोन्ही सोप्यास पुढील दिवाणखान्याप्रमाणेंच कमानी आहेत. मात्र कमानीची रुंदी ४–९ व उंची ८–७ आहे. ह्या दिवाणखान्याची उंची पुढील दिवाणखान्यापेक्षां बरीच कमी आहे. परंतु ह्या दिवाणखान्यांतील लांकडी छतावरील नकशी काम फारच उत्तम आहे. पुढील सोप्यांत कारंजा आहे. मागील सोप्यांत दोन्ही कोपऱ्यांत दोन दोन खणाच्या खोल्या आहेत. वाड्याचे सभोंवतीं तटाचे आंत बरीच

मोकळी जागा आहे. दक्षिण बाजूस एक विहीर गोलाकार असून मोठी आहे. तटास दक्षिण–उत्तर व पश्चिम असे लहान दरवाजे आहेत. तटावर जाण्यास चारी बाजूच्या भिंतींतून जिने आहेत. ह्या वाड्याचे दक्षिण तटापासून अदमासें १२९ फूटावर श्री कृष्णाबाई आहे. ह्या वाड्यावरून जो रस्ता उत्तरेकडे जातो तो थेट द्वारकेपर्यंत जाऊन पुढें पूर्वेकडे जातो.गंगापुरीमधून पश्चिमेकडे एक रस्ता गेला आहे हा रस्ता मेणवली, धोम वगैरेकडे जातो. या रस्त्याला गांव संपतो तेथें एक मोठी वेश आहे. या वेशीला 'मेणवलीची वेश'असें म्हणतात. या वेशीची रुंदी १७-३॥ व उंची गच्चीपर्यंत ३१ फूट आहे. यावेशीवरील गच्चीवर जाण्यास उत्तरेच्या बाजूनें जिना आहे. या जिन्यास २-३ रुंदीच्या २४ पायऱ्या आहेत. गच्ची ३९--२ लांब व १४--१० रुंद आहे. मेणवलीवेश, अनगळवेश, पंचायतनवेश, वाड्याची वेश आणि फडक्यांची वेश–(फडक्यांचे वाड्याजवळ असल्यामुळें फडक्यांची वेश असें नांव पडलें आहे.) मधले आळीचे धर्मशाळेजवळील असलेली ' कमानरहित वेश ' इत्यादि सर्व गंगाधरराव रास्ते यांनींच बांधिल्या आहेत. **द्वारकासंबंधी माहिती**:–वे. रामभट गद्रे द्वारकेस गेले होते. तिकडून येतांना एक देवीची मूर्ती आणिली. हल्लीं ज्या ठिकाणास द्वारका म्हणतात तेथेंच देवीची मूर्ती स्थापन केली होती. रामभट गद्रे यांचे स्नेही आपटे यांनीं रामभटास मुरलीधराची मूर्ती दिली, आणि तुम्ही द्वारकेहून आलां आहांत तेव्हां ही मुरलीधराची मूर्ती, तुमच्या देवीच्या मूर्तीजवळ स्थापन करा, आणि 'द्वारका' हेंच नांव या देवालयास ठेवा. तेव्हांपासून हें स्थान द्वारका नामाभीधान पावलें. आपटे यांचेकडून त्यावेळीं नैवेद्य वगैरे

व्यवस्था होती. याच आपट्यांचे वंशज हल्लीं " नाट्यकला प्रवर्तक संगीत नाटक मंडळीचे चीफ म्यानेजर गोविंद रघुनाथ आपटे हे होत. यांचें घर याच आळींत आहे." पुढें कांहीं वर्षांनीं गद्रे यांच्यांत भाऊबंदकी सुरू झाली. त्यांत श्री देवीची मूर्ती ज्यांचे हिश्शास गेली, त्यांनीं आपले घराजवळ ती बसविली. रास्ते यांचे वाड्याचे उत्तरेस थोड्या अंतरावर पत्र्यानें आच्छादित केलेल्या लहानशा जागेंत बसविली आहे. ही देवी चतुर्भुजा असून संगमरवरी पाषाणाची आहे. हिची उंची ३–२॥ आहे. मूर्ती सुरेख आहे. इकडे द्वारकेंतील मुरलीधर एकाएकीं भंगल्यामुळें, धर्मपुरींतील श्री. बाबासाहेब साठे यांनीं मुरलीधराची मूर्ती दिली. हीच श्री मुरलीधराची मूर्ती येथें हल्लीं आहे. ही मूर्ती लहान असून फारच मनोहर आहे. या देवालयास उत्पन्न वगैरे कांहीं नाहीं. गाभारा दगडी चौथऱ्यावर आहे. हें देवालय सर्व लांकडी आहे. या देवालयाचा जिर्णोद्धार, येथें रा. मामासाहेब भाटे या नावांचे एक सुखवस्तु गृहस्थ होते त्यांनीं केला. या शिवाय मेणवलीवेशीचे बाहेरील 'श्री सटवाई' व घांटावरील 'काळाराम' या दोन्हीं देवळांचाही रा. मामासाहेब भाटे यांनींच जिर्णोद्धार केला. आणि घाटावरील मारुतीचे देवालयावरील मठ व पेशवे यांचे घाटावरील चार खणाचा सोपाही यांनींच बांधिला. या शिवाय रा. मामासाहेब भाटे यांनीं या आळींतील एक घर व गणपतीआळींतील एक घर अशीं दोन घरें ब्राह्मणांस दान दिलीं आहेत. **श्रीबहिरोबाचें देऊळ**—हें लाकडी आहे. येथें दोन मूर्ती काळ्या पाषाणाच्या आहेत. या देवालयास लागूनच पूर्व दिशेस एक मोठी विहिर उत्तम बांधकाम केलेली आहे. आंत उतरण्यास

पायऱ्या आहेत. हें लहानसें देऊळ व ही विहिर आणि श्री सट-वाईचें देऊळ, हीं गंगाधरराव रास्ते यांनींच बांधिलीं.

श्री दत्तमंदिर—हें मंदिर नारो गोविंद जव्हेरी यांनीं बांधिलें. मंदिर दुसरे मजल्यावर आहे. याला लागूनच सहा खणाची माडी आहे. हें मंदिर उत्तराभिमुख आहे. मंदिराचे खालीं दगडी कमान ७–४ उंचीची आहे. मंदिर दगडी षट्कोनी आहे. प्रत्येक कोनामधील अंतर ३--१० आहे. मंदिराची उंची ६ फूट आहे. या उंचीचे मानानेंच लहानसें शिखर आहे. श्रीदत्तात्रयाची मूर्ती तीनमुखी असून अदमासें २ फूट उंचीची आहे. मूर्ती संगमरवरी पाषाणाची आहे. नारो गोविंद हे मुंबईला जवाहिराचा व्यापार करीत असत म्हणून त्यांस जव्हेरी असें म्हणत. परंतु यांचें आडनांव जोशी असें आहे. हल्लीं यांचे कुटुंबाकडेच देवाची सर्व व्यवस्था आहे.

या आळींत मुसलमानांचा निमजगा आहे. या निमजग्यापासून जवळच मधले आळींतील ‘ पट्टाधीशाचें ’ देउळ आहे. घाटावरील सिंहासनाचे खर्चाबद्दल हळवेशास्त्री यांनीं ३०० रुपये दिल्याचें समजतें. या आळींतील नानासाहेब रिसबूड यांनीं सिंहासन व पटांगण बांधण्याचे वेळीं नानातऱ्हेचीं संकटें आलीं असतांनाही न डगमगतां मोठ्या करारानें सदरहु बांधकाम पूर्ण केलें. यामूळें पूर्वींपेक्षां हल्लीं घाटावरील उत्साहास विशेष शोभा येते. याचें सर्व श्रेय रा. नानासाहेब रिसबुड यांचेकडेच आहे.

मधल्या आळींतील माहिती—कटिंजनाचा घाट ९८–१० लांब व ३९–३॥ रुंद आहे. हा घाट पाडळीचे गाडगीळ यांनीं बांधिला. या घाटावरील पट्टांगण ७७–२ लांब व २४–१॥ रुंद

आहे. येथें स्नानसंध्या करण्याकरितां तीन खणाची दुमजली इमारत, हल्लीं पुण्यास असलेले रा. माधवराव गजानन दिक्षित—पट-वर्धन यांचे पूर्वजांनीं बांधिली आहे. या इमारतीचे उत्तरेस यांचे पूर्वजांची एक समाधी आहे. ही समाधी चिरेबंदी सुरेख बांधली आहे. सदरहु इमारतींत श्रीगणपती, श्रीविष्णु आणि श्री महिषासुरमर्दनी अशा मूर्ती आहेत. श्री गणपतीशिवाय बाकीच्या मूर्ती संगमरवरी पाषाणाच्या असून अगदीं लहान आहेत. या इमारतीसमोर थोड्या अंतरावर संकेश्वर मठाधिपती श्रीविद्यानरसिंह भारती यांची समाधीची जागा आहे. [समाधी बांधावयाची आहे.]

या घाटास लागूनच पूर्व—पश्चिम १३९—७ लांबीचा दुसरा घाट आहे. या घाटावर ' श्री ओंकारेश्वर ' देवालय रा.कोंडोपंत नाना गाडगीळ यांनीं बांधिलें आहे. या देवालयासमोरील पटांगण ७९—८ लांब व ४७—८ रुंद असें आहे. या पटांगणावर ८—६॥ उंचीचे चौथऱ्यावर ' **धर्मशाळा** ' आहे. या धर्मशाळेस लहानसे बुरुज आहेत. पटांगणावरून बारा पायऱ्या चढून धर्मशाळेंत जाण्यास दक्षिणाभिमुख लहानसा दरवाजा आहे. ' श्री-ओंकारेश्वराचें ' देऊळ ३ फूट उंच, १९—१ रुंद व १९—९ लांब अशा चौथऱ्यावर आहे. गाभारा ८—११ चौरस आहे. देऊळ पूर्वाभिमुख आहे. देवळाची उंची ९—११ आहे. शिवाय लहानसें शिखर आहे. धर्मशाळेंतील चौक ४९—११ चौरस आहे. धर्मशाळेची लांबी ९७—११ आहे. ही धर्मशाळा दुमजली आहे. धर्मशाळेच्या दक्षिण सोप्यांत पुण्याचे ' दातार ' यांनीं श्री काशीविश्वेश्वराची स्थापना केली आहे. याची पूजा वगैरे व्यवस्थेशीर होत असते. ही धर्मशाळा वर्गणी जमवून बां-

धिली गेली आहे. या आळीचें मूळ नाव **सत्यनाथपुरी** असें होतें. धर्मशाळेचे पूर्वाभिमुख दरवाजाबाहेर दक्षिण कोपऱ्यांत जी तीन खणाची जागा लोखंडी जाळीनें बंद केली आहे त्या जागेंत ' क्रियाकर्मांतर ' करण्यांत येतें. तसेंच उत्तर कोपऱ्यांत इचलकरंजीचे रा.देवधर यांनीं मठ बांधिला आहे, हा मठ यती, ब्रह्मचारी अथवा विरक्त कर्ममार्गी अशांना राहण्याकरितांच बांधिला अ.हे, या धर्मशाळेंत होम हवनादिक कर्में, नाटकें, कुस्त्या व ब्राह्मणभोजनें होतात. सदरहु वरील कारणाकरितां ही धर्मशाळा भाड्यानें मिळते, धर्मशाळेचें जें भाडें जमतें तें धर्मशाळेच्याच उपयोगीं खर्च करितात, भाडें अमुक दिवसास किती घेणें वगैरे सर्व माहिती या आळींतील पंचांना विचारल्यास समजते. गेल्या सालीं ' कोटीलिंगार्चन ' याच धर्मशाळेंत झालें. धर्मशाळेचे उत्तर-दिशेस पटवर्धन यांनीं आपल्या घरांत एक लहानसें ' विष्णुमंदिर ' बांधिलें आहे. याचे समोर ' श्री काशीविश्वेश्वराचें ' देऊळ आहे. हें देऊळ दगडी असून सभामंडप लांकडी आहे. हें देवालय पश्चिमाभिमुख आहे. देवळांत गेल्याबरोबर डावे हातास एक आड आहे. हें देऊळ काशी डाळवालीनें बांधिलें. या देवाची पूजा वगैरे व्यवस्थेशीर होत असते. पटवर्धन यांचे घरास लागूनच श्रीगणपतीचें लाकडी देऊळ आहे. हें देऊळ येथिल प्रसिद्ध गाडगीळ यांनीं बांधिलें. याशिवाय या आळींत खरे यांचे घरांत श्रीगणपती मंदीर आहे. धर्मशाळेचे मागें श्री पट्टाधीश उर्फ राममंदीर आहे. या ठिकाणी " रामानंदस्वामींची " समाधी आहे. रामानंदस्वामी ह्या नांवापेक्षां ते वेणीमाधव या नांवानेंच विशेष प्रसिद्ध होते. हे वेणीमाधव, विष्णु लक्ष्मण शास्त्री

पुरोहित यांचे आजे होत. हे वेणीमाधव मोठे सत्पुरुष होऊन गेले; यांचे संबंधीं अशी एक हकीकत प्रसिद्ध आहे कीं, धर्मपुरी-घाटाचे पश्चिमेस प्रवाहांत दक्षिण-उत्तर जो बांध आहे. त्या बांधावरून वेणीमाधव पलीकडे जात होते. तितक्यांत पलीकडून लिवार्नर साहेबांची स्वारीही त्याच बांधावरून अलिकडे येत होती. साहेब बहादुर बांधावरून येणेचे वेळेस बांधावर कोणीही असूं नये अशी व्यवस्था होती. परंतु सदरहु हुकुम सत्पुरुष वेणीमाधव यांना काय माहित ? वेणीमाधव बांधावरून खालीं पहात चालले होते. पुढें साहेबांची स्वारी येत आहे हें यांचे गांवींही नाहीं. तिकडून साहेबांची स्वारीही मोठ्या झोंकांत येत होती. दोघेही जवळ येतात तोंच साहेब बहादुर यांनीं एकदम बांधाखालीं उडी मारिली. असो. यावरून इतकेंच सिद्ध होतें कीं, ब्राह्मण जर सदाचारसंपन्न असून, तपोबलानें सतेज रहातील तर सर्वांना वंदनीयच होतील. वेणीमाधव यांचे चिरंजीव लक्ष्मण शास्त्री यांनीं, पट्टाधीश, भरतशत्रुघ्न, लक्ष्मण व मारुती इतक्या मूर्ती आदमासें शके १८०८ मध्यें स्थापन केल्या. श्रीपट्टाधीश मध्यें, बाजूस भरत शत्रुघ्न असे पहिल्या पायरीवर, लक्ष्मण व मारुती दुसऱ्या पायरीवर व त्याचे खालीं तिसऱ्यापायरीवर मधोमध वेणीमाधव यांची समाधी आहे. वरील सर्व मूर्ती संगमरवरी पाषाणाच्या असून अतिशय सुरेख आहेत. श्रीपट्टाधीशाची उंची २–१० भरत-शत्रुघ्न २–४, लक्ष्मण २–१ व मारुती २ फूट येणेंप्रमाणें आहे. हें मंदीर सर्व लांकडी आहे. फक्त ३–३ उंच १९–१ लांब व १३–२ रुंद अशा दगडी चौथऱ्यावर गाभारा व लहानशी पडवी आहे. हें मंदिर पूर्वाभिमुख आहे. ह्या मंदि-

राचे उत्तरेस फडक्याचे वेशीकडे, पश्चिमेस गंगापुरींत व पूर्वेस गणपती आळींत असे रस्ते गेले आहेत. या मंदिरावरून कटिंजनाचे घाटावर जाण्यास रस्ता आहे.

गणपतीआळींतील माहिती—या आळीचा घाट पूर्व-पश्चिम लांबी ४०१—७ असून याला लागूनच पुढें ३।४ पायऱ्याचा २३०--६ लांबीचा घाट आहे. व रुंदी १३७--६॥ आहे या घाटाला लागूनच पश्चिम दिशेस ६९--६ लांब व ५१--३ रुंदीचा पांच पायऱ्यांचा घाट आहे. या घाटास बगीचा घाट असें म्हणतात. या घाटाचे व श्रीगंगारामेश्वराचे मध्यें एक पटांगण आहे. हें पटांगण या आळींतील गाडगीळ यांनीं बांधिलें. ह्याची लांबी ११२—५ व रुंदी ३५—७ आहे. या पटांगणास तीन लहान व दोन मोठ्या अशा पांच पायऱ्या आहेत. या पटांगणावर एक चौथरा आहे. त्याची उंची ११ इंच असून १२—७॥ चौरस आहे. श्री गंगारामेश्वराचे मागें या पटांगणावर जाण्यास तीन पायऱ्या आहेत श्रीगंगारामेश्वराचे उत्तरेस २—९॥ रुंदीची व ४८—२ लांबीची फरसबंदी वाट आहे.

श्रीगंगारामेश्वराचें देऊळ श्री. गंगाधरराव भिकाजी रास्ते यांनीं बांधिलें. ३—३॥ उंच, २७—११॥ लांब व २४—११ रुंद अशा चौथऱ्यावर हें देवालय पूर्वाभिमुख आहे. दर्शनी तीन कमानी आहेत. कमानींतील रुंदी ४—१॥ व उंची ८—५ आहे. गाभारा १० फूट चौरस आहे. गाभाऱ्याचा दरवाजा २—१रुंद व ५—७ उंच आहे. पिंडींत एक तांबूस रंगाचा बाण बसविला आहे. या देवालयास तीन पायऱ्या आहेत. देवालयासमोर चौफेर कमानींत नंदी आहे. हें देवालय दगडी आहे. या देवालयाचे

दक्षिणेस २२–२ लांबीवर भावनेश्वराचें देवालय आहे. हें देवालय या आळींतील भावे यांचे पूर्वजांनीं बांधिलें ११–६॥ चौरस असून ११ फूट उंच आहे, शिवाय लहानसें शिखर आहे. देवालय दगडी असून पूर्वाभिमुख आहे.

श्री गणपतीचें देवालय—श्री गणपती ज्या चौथऱ्यावर आहेत तो चौथरा १–४। उंच, १२–८॥ लांब व ११–११ रुंद असा आहे. श्री गणपती ज्या प्रभावळीस टेंकून बसले आहेत ती दगडी आहे. प्रभावळ १०–२ उंच व १–५ रुंद अशी आहे. हें देवालय पूर्वाभिमुख आहे. श्री गणपतीची उंची ७ फूट व रुंदी ६ फूट आहे. या देवालयाचा गाभारा ३० फूट चौरस आहे. गाभाऱ्यास पूर्वाभिमुख तीन दरवाजे आणि दक्षिण उत्तर दोन मिळून पांच दरवाजे आहेत. पुर्वाभिमुख मुख्य दरवाजाची उंची ९–३ व रुंदी ७–५॥ आहे. दुसरे दोन दरवाजे उंचीला तितकेच असून रुंदी मात्र ५–५॥ आहे. दक्षिणोत्तर दरवाजाची उंची ७–५॥ व रुंदी ४-९ आहे. गाभाऱ्याची उंची अदमासें २५ फूट होईल. पूर्वाभिमुख दरवाजाबाहेर मोठा सभामंडप आहे. याची लांबी ६४–६॥ व रुंदी ३८–१० आणि उंची अदमासें १५ फूट होईल. ह्या सभामंडपास उत्तरेस पांच दक्षिणेस पांच व पूर्वेस तीन मिळून एकंदर तेरा कमानी आहेत. सर्व कमानीची उंची १० फूट व रुंदी ६–८ आहे. तेरा कमानींचे दहा मच्छ व सभा मंडपास आठ खांब आहेत. हें देवालय सर्व दगडी आहे. या गणपतीस—'ढोल्या गणपती' असेंही ह्मणतात. याचें बहुतेक कारण हेंच असावें कीं ढोला येवढें मोठें पोट असून श्री गजानन महाराजही फारच भव्य आहेत. या

देवालयाचें शिखर या क्षेत्रांतील सर्व शिखरापेक्षां फार मोठें व अतीशय उंच आहे. आदमासें उंची ७५ फूट होईल. हें देवालय पावसाळ्याचे दिवसांत बहुतेक पाण्यांत असतें, त्यावेळीं पाण्याला फार ओढ असते. जरी महापूर आला तरी देवालयास धक्का पोंचूं नये ह्मणून देवालयाचे मागें चांगला मजबूत कोन केला आहे. या कोनाचे योगानें पाणी कातरलें जातें.

श्री काशीविश्वेश्वर—हें देवालय पूर्वाभिमुख आहे. देवालयाचे सभोंवार मजबूत तट आहे. तटाची लांबी १६१—१ व रुंदी ९४—५ आहे. दक्षिण—उत्तर तटाचे भिंतीची रुंदी ४--३ व पूर्व तटाचे भिंतीची रुंदी ४--६ आणि पश्चिम तटाचे भिंतीची रुंदी ५--६ आहे. तटावरून फिरण्याकरितां रस्ता ३--६ रुंदीचा आहे तटाची उंची १४--७ आहे. या तटास पूर्वाभिमुख मुख्य दरवाजा आहे. याचे वर नगारखाना आहे. याला खाली तीन कमानी आहेत. या कमानींवरील नगारखान्यांत जाण्यास उत्तरेच्या बाजूनें पूर्वतटास लागून एकोणीस पायऱ्याचा जिना आहे. दक्षिण—उत्तर तटास मिळून दोन दरवाजे आहेत. आंत दक्षिण—उत्तर ओऱ्या आहेत. या ओऱ्या यती, ब्रह्मचारी व प्रपंच विरक्त असून कर्ममार्गी अशांना रहाण्याकरितां बांधिल्या आहेत. तटाचे आंत सर्व फरशी आहे. या फरशीवर ३ फूट आर्धा इंच उंच, ९०—११ लांब व २७--५॥ रुंद अशा चौथऱ्यावर गाभारा व सभामंडपासह देवालय आहे. गाभाऱ्याच्या दरवाजाची उंची ५—५ व रुंदी २—९ आहे. या दरवाज्याची भिंत चार फूट रुंद आहे. हा दरवाजा फारच नकशीदार आहे. गाभाऱ्यांत जाण्यास तींन पायऱ्या लागतात. गाभारा ११--५ चौरस आहे.

श्रीकाशीविश्वेश्वर बाणाचा व्यास ९--१॥ असून उंची आठ इंच आहे. गाभाऱ्याचे दक्षिणेस उजेडाकरितां दगडी जाळी आहे. जाळींत मोठ्या कुशलतेनें दोन नाग कोरले आहेत. हें एक कोडें आहे असें म्हणतात. गाभाऱ्याचे दरवाजास लागून घंटाश्वर आहे व घंटाघरास लागून सभामंडप आहे. घंटाघराची रुंदी ८--१॥ व लांबी ८--६॥ आहे. येथील घंटेचा व्यास ४--११ आहे या घंटे येवढी मोठी घंटा वाईत नाहीं. सभामंडप १७ फूट आर्धा इंच चोरस आहे. यांत चौफेर भिंतीत रेखलेल्या कमानीं आहेत या कमानींची रुंदी १४--९ आहे. दक्षिण—उत्तर दोन दगडी जाळ्या आहेत. सभामंडपाच्या दरवाजाची रुंदी ४--३॥ व उंची ६—१०॥ आहे. या दरवाजासमोर ८--११ लांबीवर नंदी आहे. २--२॥ उंचीचे, १२--४॥ चोरस चौथऱ्यावर अतीशय देखणा व बराच मोठा नंदी आहे. या नंदीइतका देखणा व मोठा दुसरा कोणताच नंदी नाहीं. हा नंदी चौफेर कमानींत आहे. कमानीची उंची ६--१॥ व रुंदी ४--११ आहे. नंदीची उंची ३--९ व लांबी ५—३ आणि पाठीची रुंदी ३ फूट आहे. बसलेल्या नंदीची ही उंची आहे. हाच नंदी जर उभा असतां तर ७—६ उंची असती. असो, या नंदीवर घातलेले अलंकार माळा, साखळ्या व घंटा पाठीवरील झूल तोंडाची मोरकी पायांतील साखळ्या वगैरे सर्व कोरीव असून फार सुंदर केले आहेत. हा नंदी इतका मोठा असून पायाचे खुरापासून ते शिंगापर्यंत सर्व अवयवें कशी बांधेसूद आहेत. या ठिकाणीं गंवड्यानें आपलें कसब पूर्ण दाखविलें आहे यांत बिलकूल शंका नाहीं. या नंदीला लागूनच '**कुंड मंडप**' आहे. हा कुंडमंडप ८ इंच उंचीचे ३२—८॥ चोरस

चौथऱ्यावर आहे. याला खांब १६ व कमानी २४ आहेत. खांबाची रुंदी १–६ चौरस आहे. मंडपाची उंची २२–९ आहे. याचे वरील गची ३२ फूट चौरस आहे. ईशान्येस व आग्नेयेस अश्वथ्थाचे पार आहेत. कुंडमंडपाचे दक्षिणेस व उत्तरेस दिपमाळी आष्टकोनी चौथऱ्यावर आहेत. अदमासें २३ फूट उंच असाव्यात. दक्षिण बाजूचे तटासही एक जिना आहे. या तटास लागूनच एक विहिर आहे. आंत उतरण्यास पायऱ्या आहेत. या देवालयास एकंदर शिखरें १४ आहेत. त्यांत सर्वांत मोठें काशीविश्वेराचे, यांचेहून लहान घंटा-घराचे व सभामंडपाचें. बाकीचीं सर्व अगदीं लहान आहेत. देवालयाचे मागें तुलसीवृंदावन आहे, उत्तरेस फरशीवर चंडीचा दगडी पुतळा आहे देवालयासह शिखराची उंची अदमासे ९०–९९ फूट होईल. तटाचे पूर्वाभीमुख दरवाजाबाहेर उत्तरेस एक सोपा आहे. तो १४–८ रुंद व ९७–७ लांब आहे. या सोप्यांत घाच्या उत्साहाचें सामान ठेवितात. या सोप्यास लागूनच पूर्व-पश्चिम रस्ता आहे. या सोप्याजवळ एक चौकोनी पार आहे. य आळींतील रस्ता ओलांडून या पाराजवळून घाटावर रस्ता गेला आहे. श्री काशीविश्वेश्वर व श्री गणपती हीं देवालयें गणपतराव भिकाजी रास्ते यांनीं बांधिली. गणपतराव भिकाजी यांनीं आपलें नांवें श्रीगणपतीची स्थापना केली. आणि आपले मुलाचें नांवें श्री काशीविश्वेराची स्थापना केली. ही दोन्हीं देवालयें काळ्या पाषाणाचीं आहेत. श्री काशीविश्वेश्वराचे देवालयासमोर जरा दक्षिणबाजूस सुरेख अष्टपैलु सहा पार आहेत. या आळींत जी सडक जाते तीचे आरंभास डावे हातास श्री मारुतीराज

आहेत आणि उजवे हातास " **गोविंदरामेश्वराचे** " देवालय आहे. हें देवालय पुर्वाभिमुख आहे. या देवालयाचे सभोंवार बरेंच मोकळें आवार आहे. हें देवालय या आळींतील गोविंदराव वेलणकर यांनीं बांधिलें असे समजतें, देवालय सर्व दगडी आहे. गाभारा, सभामंडप व लहानशी दिपमाळ आहे. आनंराव भिकाजी रास्ते यांचे वाड्यापासून जवळच " **श्री मुरलीधराचें** " देऊळ आहे हे पश्चिमाभिमुख आहे. फक्त गाभारा दगडी असून लांकडी सहा खणाचा सभामंडप आहे. समोर गरूड असून गरूडाचे उजवे बाजूस तुलसीवृंदावन आहे. श्री मुरलीधराची मूर्ती अदमासें दोन फूट उंच असून संगमरवरी पाषाणाची आहे. याची पुजा, नैवेद्य वगैरे सर्व व्यवस्था चालू आहे.

या आळीचे शेवटांस आपटे यांचें श्री दत्तमंदिर आहे. हें तुळसीवृंदावनासारखें असून चिरेबंदी आहे. याचे जवळच औदुंबर आहे. या ठिकाणीं मौनस्वामीं रहात असत. यांना आम्हीं पाहिलें आहे. हे ज्या सालीं येथें प्लेग झाला त्यांच सालीं कोणीकडे जे गेले त्याचा अद्यापी पत्ता नाहीं. हे स्वामी बोलत नसत म्हणून मौनस्वामी असें नांव पडलें. या आळींत पाटणकराचा बोळ आहे. या बोळांतील पाटणकर घराण्याचा मूळ पुरुष, ज्याच्या पासून या घराण्याचा उदय झाला. तो श्रीमंत पेशवे यांचा गुरु होता. म्हणून ह्या गुरु घराण्यास श्रीमंत पेशवे यांनीं बाराशें रुपयांचे वंशपरंपर इनाम करून दिलें. तें इनाम हल्ली चालत आहे. ह्या घराण्यांतील राव. शंकर महादेव पाटणकर हे डिस्ट्रिक्ट प्लीडर असून हल्लीं म्युनिसिपालिटीचे प्रेसिडेंट आहेत.



"धर्मपुरीच्या घाटाचा देखावा."

दुसरे रा. नारायण गणेश पाटणकर बी. ए. एल् एल् बी हे इसला-पूर येथें वकीली करीत आहेत.

धर्मपुरीची माहिती—या घाटावर या आळींतील भार्गवराव माधवराव उर्फ बाळासाहेब साठे. यांचे पूर्वजांनीं, श्रीरामेश्वराचे देऊळ, समोरील नंदी, बाजूची दोन्हीं कुंडें, बदामी कुंडाचे जवळील थोरलें चौकोनी कुंड, देवालयाचे पश्चिमेस आदमासें ८० फूटावर दक्षिण उत्तर असलेला बांध या बांधापासून, देवालयाचे मागे व थोरले कुंडांत आणून सोडलेला मोऱ्या (नळ्या) देवालयासमोरील, सिंहासनापर्यंतचें पटांगण, श्रीकृष्णाबाईचें देवळास लागून असलेला मोठा अश्वथ्याचा पार व यालालागूनच दिपमाळ (दिपमाळीचा फक्त चौथरा कायम आहे) इत्यादि-कामें फार मजबूत केलीं आहेत. याला खर्च सुमारें तीस हजार रुपये लागला असावा. श्रीरामेश्वराचें देवालय, ३—२॥उंच, २३-११ लांब व २०—१ रुंद अशा चौथऱ्यावर आहे. देवालय पूर्वाभिमुख आहे. चौथऱ्यास पांच पायऱ्या आहेत. दर्शनी तीन कमानीची पडवी आहे. कमानीची उंची ७---११ व रुंदी ३-३ आहे. तिन्ही कमानी सारख्याच आहेत. गाभाऱ्याचा दरवाजा ५--२ उंच ३--३॥ रुंद आहे. गाभाऱ्यांत उतरण्यास दोन पायऱ्या आहेत. गाभारा९--५॥ चौरस आहे. गाभाऱ्यास दक्षिण-उत्तर जाळ्या दगडी आहेत देवालयासमोर ३--३॥ उंचीचे ८-८॥ चौरस चौथऱ्यावर चौफेर कमानींत नंदी आहे. ६---९॥ कमानींची उंची आहे. या चौथऱ्यास तीन पायऱ्या आहेत या देवा लयास लागून दक्षिण आंगास " एक बदामी कुंड आहे. हें कुंड व यांत आणून सोडलेली मोरी (नळी) प्रसिद्ध मेराळ यांनीं बां-

धिल्यांचें समजतें. " वाडेश्वरासमोरील कुंड, मधलेंकुंड, बदामी-कुंड, बदामीकुंडाचे पूर्वेस दोन कुंडें व नंदीचे उत्तरेकडील कुंड मिळून एकंदर कुंडें सहा आहेत. श्रीरामेश्वराचे उत्तरेस मढचा-मारुतीचा घाट व देऊळ आहे. घाट ४१ फूट लांब व ३२-५॥ रुंद आहे. दक्षिण खेरीज तिन्ही बाजूस ६--३। उंचीचा तट आहे. या घाटास चार पायऱ्या आहेत. तटास दोन बुरुज आ-हेत. श्री मारुतीचें देऊळ लहान आहे. हें पूर्वाभिमुख आहे. श्री-रामेश्वरापुढील साठे यांचे ६० फूट लांबीचे पटांगणांस लागून सिंहासन आहे. या घाटाची एकंदर लांबी २८२—८ व रुंदी ६२ फूट आहे. सिंहासनाचे मागें श्री कृष्णाबाईचें देऊळ २ फूट उंचीच्या ८ फूट चोरस चौथऱ्यावर आहे. याची उंची ७--३ आहे. या देवळाचे मागें दोन पार आहेत. पैकीं मोठा साठे यांचा व धाकटा गोकटे यांचा आहे. श्री कृष्णाबाईचें सिंहासन २--१० उंच, २४—६॥ लांब व २० फूट रुंद असें आहे. या सिंहास-नावर लहानसें सिंहासन आहे हें दोन फूट उंच, ३—५ लांब व २—१० रुंद आहे. यावर उत्साहांत श्री कृष्णाबाईची मूर्ती बसते. या सिंहासनासमोरील पटांगण ७७ फूट लांब व ४७—४ रुंद आहे. या सिंहासनाचे उत्तरेस दगडी धर्मशाळा व दक्षिणेस श्री त्रिशूलेश्वराचें देऊळ आहे. दगडी-धर्मशाळा, श्री त्रिशूलेश्वर व नर-हरीचा पार हे सर्व मर्ढे येथील गोळे यांनीं बांधिले. दगडी धर्मशाळा १३ फूट उंच व ५७--९ लांब आहे. हिला दक्षिणाभिमुख सात कमानी आहेत. पश्चिमेकडील पहिले कमानींत पूर्वाभिमुख श्री गजानन महा-राज आहेत. दोन कमानीस लोखंडी गजाच्या जाळ्या असून पूर्वाभि-मुख दार आहे. श्रीगजाननापुढें पूर्वी कारंजा असावा असें वाटतें.

श्री त्रिशूलेश्वराचे देवालयाची लांबी २८ फूट व रुंदी २६--१० आहे. दर्शनीं तीन कमानी, उंची ८--१० व रुंदी ४--५॥आहे. गाभाऱ्याचे दरवाजाची उंची ५--७ व रुंदी २--७॥ आहे. देवालय पूर्वाभिमुख आहे. पडवीस दक्षिण--उत्तर दरवाजे आहेत. गाभाऱ्यांत उतरण्यास दोन पायऱ्या लागतात. गाभारा ११--६॥ चौरस आहे. दक्षिण--उत्तर दगडी जाळ्या आहेत. येथें तीन शाळुंका आहेत. हें स्थान स्वयंभू आहे. गाभाऱ्या समोर एक लहानसा नंदी आहे. नंदीचे मागें एक लहानसें शंकराचें देऊळ आहे. या शंकराचा बाण १--३ उंच असून व्यास २--८। आहे. एवढा मोठा बाण सर्व वाईत कोठेंच नाहीं. या देवळास लागूनच नरहरीचा पार आहे. या पारास आठ पायऱ्या आहेत. पार सुद्धां अष्टपैलु आहे. नंदीचे जवळील खडकावर स्वयंभू गणपतीच्या आकृती आहेत. यास अष्टविनायक म्हणतात. यावरूनच पूर्वी या घाटास रविधुंडीचा घाट असें म्हणत होते. पाराजवळच एक दिपमाळ आहे. या पारापासून थोड्या अंतरावर दक्षिण--उत्तर आठ कमानींचा पूल इंग्रजी अमदानींत झालेला आहे. या घाटाचे उत्तरेस साठे यांची धर्मशाळा, श्री हरिहरेश्वराचें व श्री दत्तात्रयाचें अशीं दोन देवळें आहेत. साठे यांची धर्मशाळा ९९--९ लांब व ८६--७ रुंद आहे. पुर्वाभिमुख व उत्तराभिमुख असे दोन दरवाजे आहेत. तिसरा दरवाजा दक्षिणाभिमुख आहे. हाच दरवाजा मोठा व मुख्य आहे, या दरवाजावर दुमजला आहे. या धर्मशाळेच्या भिंती व पायऱ्या तांबुस दगडाच्या आहेत. **श्री हरिहरेश्वर**--हें देवालय पुर्वाभिमुख आहे, सभोंवार मजबूत तट आहे; १२८--७ लांब; व

९०—७ रुंद व १९--६ उंच असा तट आहे, आंतील फरशी-वर ३--४॥ उंच, ४०--६॥ लांब व १९--३ रुंद अशा चौथऱ्यावर गाभारा व नंदीसह सभामंडप आहे, गाभारा १०--७ चौरस आहे, शाळुंकेवरील बाण बराच मोठा आहे, गाभाऱ्यास दक्षिण बाजूस एक दगडी जाळी आहे. गाभाऱ्याचा दरवाजा ४—३ उंच व २—२ रुंद आहे. ह्या दरवाजापासून सभामंडप १६—१ रुंद व २१ फूट लांब आहे. याची उंची ७—७॥ आहे. सहा खांब आहेत व मधोमध एक घंटा आहे. ही घंटा, श्री काशीविश्वेश्वराच्या घंटेपेक्षां जरा लहान आहे. सभामंडपास दोन कट्टे आहेत. कट्ट्यास लागून नंदी आहे. नंदीची उंची ४—२, लांबी ४—१० व रुंदी २—८ आहे. हा नंदी श्री काशीविश्वेश्वराचे नंदीप्रमाणें जरी नसला तरी साधारण बरा आहे. या नंदीला लागूनच लांकडी सभामंडप आहे. देवालयाचे सभोंवार ओऱ्या आहेत. दक्षिण बाजूस श्री विठ्ठल-रखुमाई आहेत. सभोंवतालच्या ओऱ्या यती व ब्रह्मचारी लोकांस राहण्याकरितां केल्या आहेत. किंवा प्रपंचाचे उपाधी-पासून अलिप्त असून योग्य स्नानसंधेशील लोकांकरितांच आहेत. लाकडी सभामंडप ४०—१० लांब व २४—७ रुंद आहे. नैऋत्येस अश्वथ्याचा पार आहे. आग्नेस दिपमाळ, वडाचा पार व तुलसीवृंदावन आहे. पूर्वेच्या ओऱ्यांतून श्रीकृष्णाबाईच्या उत्सवाचें सामान असतें. दोन तुलसी वृंदावनें व एक समाधी आहे. बेल, चाफा, बकुल इत्यादि झाडें आहेत. दक्षिण—उत्तर दोन दरवाजे असून, तिसरा मुख्य दरवाजा पूर्वाभिमुख आहे. या दरवाजावर नगारखान्याची जागा आहे. या दरवाज्यास तीन पायऱ्या आहेत. ह्या देवालयाची पूजा नैवेद्य व उत्साह रास्ते

करितात. "हे रास्ते, भिकाजी नाइकांचे चुलते हरबाजी नाईक यांचेच वंशज होत या देवालयास बाराशें रुपयांचें उत्पन्न आहे."

श्रीदत्तात्रेयाचें देवालय—हें देवालय उत्तराभिमुख आहे. ९६–९ लांब, २२–७ रुंद व १९–८ उंच असून शिवाय शिखर अदमासे ३० फूट उंच आहे. गाभारा दक्षिण-उत्तर ६–९ व पूर्व--पश्चिम ७--९ आहे. १–७॥ उंचीचे सिंहासनावर दुसरें साडे दहाइंच उंचीचे सिंहासन आहे. त्यावर श्री दत्तात्रेयाची तीन मुखी काळ्या पाषाणाची मूर्ती २---९॥ उंचीची आहे. गाभाऱ्यास पूर्व--पश्चिम दगडी जाळ्या आहेत. गाभाऱ्याचा दरवाजा ५ फूट उंच व २---६ रुंद आहे. गाभाऱ्याची उंची १०–३॥ आहे. १–२॥ उंच, १९ फूट लांब व ११–१० रुंद अशा चौथऱ्यावर गाभारा व पडवी आहे. पडवीस तीन कमानी आहेत. पैकीं मधील कमानींत श्रीच्या पादुका आहेत. यापुढें सभामंडप आहे. याला दहा कमानी व आठ खांब आहेत. कमानीची उंची ८ फूट अर्धा इंच आहे. व रुंदी ४ फूट अर्धा इंच आहे. सर्व कमानी सारख्या आहेत. प्रदक्षणेचे वाटेवर दक्षिणेस दोन जाळ्या आहेत व पश्चिमेसही दोन जाळ्या आहेत. सभामंडपास पूर्व–पश्चिम दरवाजे आहेत. यापेक्षां उत्तराभिमुख दरवाजा मोठा आहे. हा दरवाजा ६--३ उंच व ३--१ रुंद असा आहे. या दरवाज्याचे दगडी चौकटीस पितळी पत्रा ठोकला आहे. दर्शनी तीन कमानीची पडवी आहे. या पडवीस लांबलचक चार पायऱ्या आहेत. देवालयांत पादुकांसमोर २--११ उंचीचा लाकडी कठडा आहे. हें देवालय सर्व दगडी असून शिखर वगैरे काम चांगलें मजबूत आहे. यास खर्च अजमासें चा-

ळीस हजार रुपये लागला असावा. या देवाची पूजा वगैरे सर्व व्यवस्था या देवालयाचे मालक विश्वनाथ काशिनाथ बापट यांचेकडेसच आहे. हे देवालयास लागून असलेल्या घरांत रहातात. या देवास श्रीमंत कुरुंदवाडकर ज्युनियर यांचेकडून दहा रुपये वर्षासन आहे. तसेंच श्री. सचीव सरकारकडून तीन रुपये दत्तजयंतीकरितां वर्षासन आहे. पश्चिमदारास नऊ पायऱ्या आहेत. या पायऱ्यासमोर थोड्या अंतरावर '**श्री नागोबा**' लहानसे चौथऱ्यावर आहे. नागोबाची उंची ३--६॥ व रुंदी २--३॥ आहे. हा नाग रास्ते यांनीं स्थापन केल्याचें समजतें. या नागापासून जवळच दक्षिणेस दगडी धर्मशाळेस लागून पूर्वाभिमुख एका लहानसे कमानीत पंचमुखी मारुती आहे.

श्रीदत्तात्रेयाचें देवालय व श्री हरिहरेश्वराचें देवालय या मधून घाटावर वाट जाते. श्रीदत्तात्रेयाचे देवालया समोर जी वाट जाते, ती वाट रथाजवळ थोरल्या रस्त्यात मिळते. या वाटेवर बरेच पार आहेत. रथाजवळून पूर्वेस जो रस्ता जातो, तो ब्राह्मणशाईंत जातो. पश्चिमेस जो रस्ता जातो, तो गणपती आळींत जातो. उत्तरेस जो रस्ता जातो, तो धर्मपुरींत जातो, दक्षिणेस जो रस्ता जातो, तो पुलावरून मामलेदार कचेरीकडे जातो.

श्री व्यंकटेशमंदिर—हें मंदिर नरगुंदकरीण बाईनें बांधिलें. मंदिराजवळ पुजाऱ्यास घरहि बांधून दिलें आहे. या देवाचा नवरात्रांत उत्साह चांगला होतो. या देवाचे पुजारी खरे उपनावाचे आहेत. हल्लीं या देवालयाची सर्व व्यवस्था श्री० रामदुर्गकर सरकार यांचे मार्फत चालत आहे. पूजा, नैवेद्य व उत्साह व्यवस्थेशीर होत आहे. या देवळाचा गाभारा फक्त दगडी आहे,


बाकी सभामंडप लाकडी आहे. फक्त दगडी देऊळ ९–१० उंच, ११–२॥ लांब व ११ फूट रुंद असें आहे. हें व्यंकटेश मंदीर पूर्वाभिमुख आहे. दर्शनी तीन कमानींची पडवी आहे. पडवीस लागूनच सहा खणी लाकडी सभामंडप आहे. समोर गरूड आहे. मंदिराचे उत्तरेस पांच खणी सोपा आहे. त्यांत श्री गजानन महाराज आहेत. पूर्वाभिमुख मुख्य दरवाजा आहे. या दरवाजावर तीन लहान शिखरें आहेत. या मंदिरांत एक अश्वथ्थाचा पार आहे. हा अश्वथ्थ वृक्ष अतीशय जुनाट असावा असें वाटतें.

श्री राममंदिर—हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. पूर्वी या ठिकाणीं फक्त विठोबाच होता असें म्हणतात. हल्लीं येथील पुजारी जे आहेत तेच या मंदिराचे मालक आहेत. यांचे वंशांत परंपरा रामदासी पंथ चालत आला आहे. यांचे पूर्वजांनीं श्री विठोबाजवळ राममंदिर स्थापन केलें. त्यावेळच्या मूर्ती बऱ्याच लहान होत्या. या जुन्या मूर्तींपैकीं एक यांचे जवळ आहे. रामचंद्र भिकाजी रास्ते यांनीं ‘ राममंदिर ’ बांधण्याच्या हेतूनें, श्रीराम, लक्ष्मण, सीता व मारुती अशा मूर्ती आणविल्या. नंतर थोडेच दिवसांत रामचंद्र भिकाजी वारल्यामुळें, सदरहू मूर्ती रास्ते यांनीं वरील राममंदिरांतील पहिल्या मूर्ती भंगल्यामुळें त्या काढून या नव्या मूर्ती त्या ठिकाणी स्थापन केल्या. आणि या रामदासी पुजारी बुवास श्रीचे पूजा–नैवेद्याकरितां दरमहा वीस रुपये नेमणूक करून दिली. त्या वेळीं ३०-३५ खण इमला बांधला जाऊन पुढें लवकरच श्री विठोबाजवळ एक नवी रखमाई करून बसविली हें सर्व काम बापूभट बापट व कोणी त्यांचे स्नेही देशपांडे असे दोघांनीं मिळून या मंदिराची सर्व व्यवस्था

केली. असें समजतें हाल्लीं सरदार रास्ते यांचे कडून दरमहा वीस रुपये न मिळतां फक्त चार रुपये दरमहा मिळत असतात. असें समजतें. असो. हें राममंदिर सर्व लाकडी आहे, श्रीचा गाभारा ८--११ दक्षिण-उत्तर आहे. व पूर्व पश्चिम ६-५॥ आहे. १--१०रुंद व ३--११ उंच अशा दगडी सिंहासनावर श्रीराम, लक्ष्मण व सीता आहेत. श्रीरामाची उंची ३ फूट आहे. श्रीलक्ष्मणाची उंची २--८ आहे व श्री सीताबाईची उंची २--२॥ आहे. गाभाऱ्यापुढें थोडी लहानशी पडवी आहे. या गाभाऱ्याचे उत्तर बाजूस लागूनच श्री विठ्ठलाचा गाभारा दक्षिण—उत्तर ५ फूट व पूर्व—पश्चिम ६—७ आहे. श्री विठोबाची उंची ४—११ व श्री रखुमाईची उंची ३--५ आहे. गाभाऱ्यांत संगमरवरी फरशी केली आहे. श्री रामाचे पुढें श्रीमारुती २--५ उंचीचा आहे. मारुतीस लागूनच राई, रखुमाई व विठोबा व याला लागूनच शेंदुर चर्चित मारुती आहे. श्रीराम, लक्ष्मण, सीता व मारुती या मूर्ती संगमरवरी पाषाणाच्या आहेत. श्री विठोबा व रखुमाई काळ्या पाषाणाच्या आहेत.

श्री महालक्ष्मीचें देवालय—हें देवालय पश्चिमाभिमुख आहे. या देवालयाचे सभोंवार मजबूत चिरेबंदी तट आहे. तटाची उंची १८ फूट, लांबी १४५—६ व रुंदी १००—४ आहे. तटाचे भिंतीची रुंदी ५ फूट आहे. त्यांत २—४ रुंदीची वाट सभोंवार आहे. तटांतील फरशी ९४—११ लांब व ६२—३ रुंद आहे. या फरशीवर ३—२ उंच, ६८—९ लांब व ३५--११ रुंद अशा चौथऱ्यावर पडवी, सभामंडप व गाभारा आहे. या चौथऱ्यावर देवालयाचे सभोंवार १--५। रुंदीची वाट आहे. या चौथ-

ऱ्यावर जाण्यास तीन पायऱ्या आहेत. गाभारा १२ फूट चौरस आहे. दक्षिण उत्तर दगडी जाळ्या आहेत. सिंहासनाची उंची २–७ आहे. या सिंहासनावर ३–३ उंचीची श्रीलक्ष्मीची मूर्ती काळ्या पाषाणाची आहे. ही देवी चतुरभुजा आहे. गाभाऱ्याचा दरवाजा ५--४॥ उंच व २--७॥ रुंद आहे. या दरवाजासमोर सभामंडपाचे दुसरे कमानींत कारंजा आहे. तो २--१०॥ चौरस लहानसे हौदात आहे. सभामंडपाची लांबी ३६ फूट, रुंदी २४ फूट व उंची १३--१० आहे. सभामंडपास पडवीसह दाहा खांब व अठ्ठावीस कमानी आहेत. उत्तरेस दोन व दक्षिणेस दोन असे चार दरवाजे आहेत. पैकीं गाभाऱ्यास लागून जे दक्षिण--उत्तर दरवाजे आहेत. याना तीन तीन पायऱ्या आहेत. सभामंडपाचे रुंदी इतकीच याला लागून ११--६ लांबीची पडवी आहे. पडवीची उंची १५--१० आहे. दर्शनी तीन कमानी आहेत. कमानीची उंची १२--१ आहे. देवालयाची उंची २३--९ आहे. शिवाय शिखर अदमासे ५० फूट उंच आहे. या देवालयास दोन दरवाजे आहेत. एक उत्तर तटास व दुसरा पश्चिम तटास. पश्चिम तटाचा दरवाजा मुख्य आहे. याची उंची ७--१ व रुंदी ४--२ आहे. याला पांच पायऱ्या आहेत. श्री लक्ष्मीचें दर्शन रस्त्यावरून होतें. हें देवालय सुरेख काळ्या पाषाणाचें आहे. सरदार आनंदराव भिकाजी यांनीं हें देवालय बांधिलें या देवीची पूजा, नैवेद्य व उत्साह वगैरे खर्चाकरितां श्री० पेशवे सरकार यांनीं गुळुम हा गांव इनाम करून दिला आहे. श्रीदेवीचे पुजारी ओक उपनांवाचे आहेत. उत्साह वगैरे सर्व व्यवस्था सरदार आनंदराव भिकाजी यांचे वंशजाकडे आहे.



" श्री विष्णु व लक्ष्मी."

श्री महाविष्णुचें देवालय—हें देवालय पूर्वाभिमुख आहे. या देवालयाचे पश्चिमेस साधी भींत आहे. दक्षिणेस श्री राममंदिर आहे. उत्तरेस या देवाचे पुजारी दिवेकर यांचें घर आहे. पूर्वेस विटेची भिंत असून या भिंतीलाच मुख्य दरवाजा आहे. देवालयाचे पूर्व बाजूखेरीज बाकी सर्व बाजूस बरीच मोकळी जागा असून फुलझाडें, तुळशी व इतर तऱ्हतऱ्हेचें वृक्षही आहेत. देवालयाचें फरशीचे तिन्हीं बाजूस पक्क्या विटाचे अरुंद रस्ते आहेत. देवालयांतील फर्शीवर गाभारा, पडवी व सभामंडप आहे. फरशी ९७—१० लांब व ५१—११ रुंद आहे. या फरशीवर ३—१ उंच २८—७ लांब व १९—१० रुंद अशा चौथऱ्यावर देवालय आहे. गाभारा १०—८ चौरस आहे. ३—७ लांब व २--१ उंच अशा सिंहासनावर श्री महाविष्णु व लक्ष्मी आहेत. श्री विष्णूची उंची ३--३ व श्री लक्ष्मीची उंची १--११॥ आहे. दक्षिण बाजूस दगडी जाळी आहे. गाभाऱ्याचा दरवाचा ५--३॥ उंच व २--६॥ रुंद आहे. दरवाज्याची भिंत ४--७ रुंद आहे. दर्शनी तीन कमानीची पडवी आहे. कमानीची उंची ८--६ व रुंदी ४--८॥ आहे. सर्व कमानी सारख्याच आहेत. पडवीस तीन पायऱ्या आहेत. पडवीला लागूनच सभामंडप आहे. मूळ फरशीवर २॥। इंच उंच ५२--६॥ लांब व २७--३ रुंद अशा फरशीवर ११ कमानींचा दगडी सभामंडप आहे. पडवीचे पायऱ्या समोर सभामंडपांत कारंजा आहे कारंजा ३--२ चौरस हौदांत आहे. सभामंडपास दक्षिण-उत्तर पांच पांच कमानी आहेत. आणि पूर्वाभिमुख एकत्र जरा मोठी कमान आहे. कमानीची १२--७॥ उंची व रुंदी

६--८ आहे. कमानीचे मच्छ आठ आहेत. मच्छाची रुंदी २--१०, लांबी ४--३॥ व १४--२ परिघ आहे. पूर्वाभिमुख कमानीची उंची इतर कमानी इतकीच आहे. मात्र इतर कमानी पेक्षां रुंदी ११इंच जास्त आहे. या सभामंडपाची उंची १६-४॥ आहे. समोर गरूड आहे. ७ फूट उंचीचे ६॥ फूट चौरस चौथऱ्यावर गरूड आहे. तिन्ही बाजूस लांकडी जाळ्या असून गरूडाचें मागची बाजू बंद आहे. याला लहानसें शिखर आहे. सभामंडप व गरूड यांचें मध्यें तुलसीवृंदावन आहे. सभामंडपांतील पोकळी १८--२॥ रुंद व ४७--३ लांब आहे. याचे उत्तरेस एक औदुंबर आहे. ह्या औदुंबराचा पार वासुदेभटजी दिवेकर यांनीं शके १७६१ त बांधिला. ईशान्य कोंपऱ्यांत विहिर आहे. नैऋत्य कोंपऱ्यांत बापूदीक्षित जोग यांची समाधी आहे. जोग यांचे वंशज या आळींतच आहेत. पूर्वाभिमुख दरवाजा ६--८॥ रुंद व ९--१० उंच आहे. यांस तीन पायऱ्या आहेत. दोन्ही बाजूस कट्टे आहेत. या दरवाजासमोर थोड्या अंतरावर नगारखाना आहे. सभामंडपाचे गच्चीवर कारंजाचे पाण्याचा खजिना आहे. हें देवालय सरदार आनंदराव भिकाजी यांनीं बांधलें. या देवालयास पुजा, नैवेद्य व उत्साह वगैरे खर्चाकरितां श्रीमंत पेशवे सरकार यांनीं केंजळ हा गांव इनाम करून दिला आहे. या देवाचे पुजारी दिवेकर उपनांवाचे देवालयाचे उत्तरेस राहतात. देवालयाची सर्व व्यवस्था सरदार रास्ते यांचेच वंशजाकडे आहे.

धर्मपुरी वसविलेल्या जागेच्या खरेदी पत्राचा (सारांश)

" शके १६९३ आषाढ शुा द्वितिया ते दिवशीं आनंदराव भिकाजी रास्ते यांसी—खरेदी पत्र लिहून देणार शाहासुलहसन,

शाहामरिशहा, कासीमशहा, अहंमदशहा, लालशहा व हजरतशहा वा दाऊदशहा काजीप्रांत वाई व कुडाळ. आह्मी, कर्जेवाम बहुत झालें तें फेडण्याकरितां, आमचा शक्करबिबीचा बाग घेऊन कर्जमुक्त करावे, असें निवेदन केलें; ते तुम्ही मान्य केलें. बाग बिघे १९ यासी चतुःसिमा—पूर्वेस शहर वाई, पश्चिमेस सत्यनाथपूरी, उत्तरेस बागखतीपा व दक्षिणेस रस्ता व शिनगारवेश कबर शक्करबिबी येणेंप्रमाणें, आमचे वडीलांचे कबरस्थान वजा करून बाकी जमीन आंबराईसुद्धां रु० ५००० घेऊन खुष खेरदी दिली असे."

"शक्करबिबींची कबर श्रीराम मंदीरासमोर एका हालवायाचे दुकानांत आंतील बाजूस आहे. शिवाय काजी यांचे 'वडिलांचे कबरस्थान' पागेच्याजवळ आहे." या आळीतील घाणेकर व गोडबोले यांचे घरासमोरील रस्त्यावर दक्षिणेकडे तोंड करून उभे राहिले असतां समोर पुला पलीकलील 'ली' साहेबाचा बंगला दिसतो.

श्रीमंत आनंदराव रास्ते यांनीं काजी यांचे कडून पंधरा बिघे जमीन खेरदी घेऊन, श्रीमहाविष्णु व श्रीलक्ष्मी अशी देवालयें बांधिली. आणि ४८ घरें बांधून ब्राह्मणास दान दिली, धर्मपुरी असें नांव ठेविलें. म्हणून हिला धर्मपुरीची आळी असे म्हणतात.

श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांनीं धर्मपुरीतील
देव-ब्राह्मणांस सनद करून दिली त्याचा उतारा.

वे. शा. सं. रा. समस्त ब्राह्मण वास्तव्य धर्मपुरी क्षेत्र कसबे वाई संमत हवेली प्रांत मजकूर स्वामी गोसावी यांसीः—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुमातिसा सबेन-

मया व अलफ शके १७०० विलंबीनाम संवत्सरे राजश्री आनंदराव भिकाजी उपनाम गोखले गोत्र काश्यप सूत्र हिरंण्यकेशी वास्तव्य कसबे मजकूर यांणीं हुजुर किल्ले पुरंदर येथील मुक्कामी येऊन विनंती केली कीं, आपण कसबे मजकूर येथें कृष्णातीरी प्रांत मजकूरची काजीची इनाम जमीन होती ती त्याजपासून खुष खरेदी करून घेतली. आणि तेथें देवालय बांधोन श्री महाविष्णूची स्थापना केली व ब्राह्मणास घरें बांधोन देऊन नवीन धर्मपुरी केली आहे. त्यांस स्वामीनीं कृपाळू होऊन श्रीची पुजा, नैवेद्य, नंदादीप, उत्साह व ब्राह्मणास कुटुंबाचे योगक्षेमार्थ एक गांव सरकारांतून नूतन इनाम करार करून देऊन चालविला पाहिजे. म्हणोन त्याजवरून मनांस आणिता श्रीची पुजा नैवेद्य व तुम्ही स्नान संध्येयशील कुटुंब वत्सल ब्राह्मण आहा तरी तुमचे चालविल्यास राज्यास श्रेयस्कर हे जाणोन तुम्हावरी कृपाळू होऊन श्रीचे सदरहु खर्चास व तुम्हांस कुटुंबाचे योगक्षेमार्थ मौजे केंजळ संमत हवेली प्रांत मजकूर हा गांव व धामणा डोंगर कुरणा सुद्धां स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फा सरदेश-मुखी कुलबाब कुलकानु हल्ली पट्टी व पेस्तर पट्टी जल-तरू तृण-काष्ठ पाषाण निधि निक्षेप सहित खरेदी हक्कदार व इनामदार करून दरोबस्त सरकारातून नूतन इनाम करार करून दिला असे. तरी मौजे मजकूरचे ऐवजाची व सदरहु डोंगराचें कुरणाची नेमणूक श्रींकडे व तुम्हांस आनंदराव भिकाजी करून देतील, त्याप्रमाणें तुम्ही आपले दुमाला करून घेऊन तुम्ही तुमचे पुत्रपौत्रादी वंशपरंपरेनें इनाम अनुभवून सुखरूप राहणे जाणिजे. चंद्र ११ जिल्हेज.

वरील सनदेतलिच सारांषाचे एक पत्र श्रीमंत सवाई माधवराव

यांनीं, आनंदराव भिकाजी रास्ते यांस लिहिलें. मात्र त्यांत विशेष मजकूर जो आहे तो येणेंप्रयाणें " वरील सनदेत नमूद केल्याप्रमाणें केंजळ गांव व धामणा डोंगर--श्रीविष्णु व समस्त ब्राह्मण यांना नूतन करार करून भोगवटी यास आलाहिदा इनाम पत्रें करून देऊन हे सनद तुम्हास सादर केली असे. तरी इनाम पत्राप्रमाणें तुम्ही मौजे मजकूर ऐवजाची व सदरहु डोंगराचे कुरणाची नेमणूक श्रीकडे व समस्त ब्राम्हणांस करून याचे दुमाला करून देऊन चालवणे " जाणिजे छ. ११ जिल्हेज. हे पत्र सातारचे दप्तरी बुकास ५९६ नंबर नोंदिले ता० ९।८।१८९४ इ.

श्रीविष्णू प्रित्यर्थ दरसाल खर्चाचे टिपण.

तपशील.

२१३ ८=॥। पुजा साहित्य नैवेद्य वगैरे.
१२५ पुजारी याचे वेतन.
११३ देवास पोषाख चैत्र शुा १ देस रु. ६५ आणि देवीस अश्विन शुा १० स रु. ४८.
४५० ८-। तैनातीबद्दल.
१० अधिक मास्याबद्दल.

९११।'

यादी--धर्मपुरीतील समस्त ब्राह्मणांस प्रत्येक घरटी चाळीस रुपयेप्रमाणें:—दरसाल मिळत असत. एकंदर घरे ४६ आणि किता असाम्या दोन मिळून ४८ घरें आनंदराव भिकाजी यांनीं बांधवून, ब्राह्मणांस दान दिली.

नेमणूक जाबता मौजे गुळुंब समत हवेली प्रांत वाई हा गांव

श्रीमंतांनीं देवब्राह्मणांस धारादत्त धर्मादाय इनाम आग्राहार दिल्हा वहिवाट येणेंप्रमाणें—सुमासलास मयातैन व आलफ शालिवाहन शके १७२४ दुंदुभिनाम संवत्सरे मौजे मजकूर देहे १ एकूण चतुःसिमापूर्वक इदलशाई चावर ३० एकूण जिल्हे खालसा सरदेशमुखी पांडवगडची सनदी जमीन सुा कुलबाब कुलकानु गांव निसबत इनामदार खेरीजकरून हल्ली वहिवाट तर्फ जाधव दुतर्फा सादिलवार पट्टी होऊन गांव संबंधी खर्च जाऊन बाकी सरकारांत ऐवज देत ती बेरिज नक्त रुपये ३२०९।.

तपशील.

२०९९ जिल्हे निसबत.
१०३२।. पांडवगड निसबत.
१८ पाटिल रु.१२ व कुलकर्णी रु. ६.
६४ हक्कदार परभारे पाळतात ते
दरसाल देशमुख रु. ४४ व देशपांडे रु.२०

३२०९।.

१८ पाटिल १२ व कुलकर्णी ६.
९० सालीना कमाविसदार विठ्ठल गोपाळ क्षीरसागर.
२७। प्यादा हंगाम शीर.
६४ देशमुख रु. ४४ व देशपांडे रु. २०.

१९९।.

सदरहु वजा जाता बाकी देव–ब्राह्मणांकडे आग्रहार इनाम नेमणूक ३०१० रुपये—तपशील.

क्षेत्र वाई येथील श्रीमाहालक्ष्मीची पूजा, नैवेद्य, नंदादीप व उत्साह वगैरे खर्चास प्रतिवर्षी पांचशें रुपये.

श्रीकृष्णेचे उत्साहाकरितां सात घाटांस—श्रीभीमकुंड घाट १०० रु. श्रीरामडोह घाट १५० रु. श्रीचक्रेश्वर घाट १०० रु. श्रीत्रिशूलेश्वर घाट १०० रु. श्रीकाशीविश्वेश्वर घाट १०० रु. श्रीओंकारेश्वर घाट १०० रु. श्रीउमा–महेश्वर गंगापुरी घाट १०० रु. एकूण ७५० रुपये श्रीकृष्णाबाईचे उत्साहास ब्राह्मण करतील त्यांस देऊन पावती घेत जावी. प्रती घाटी ऐवज वेगळा पावता करावा.

वास्तव्य श्रीक्षेत्र वाईतील ब्राह्मणांस—घरें १७ वार्षिक दक्षणा गंगाधरभट महादेवभट खेर १०० रु. बाळंभट रामभट गोगटे १००रु. विनायकभट नारायणभट रानडे १०० रु. रघुनाथभट धोंडभट भिडे १०० रु. रामभट नारायणभट गद्रे २०० रु. रामचंद्र दी० आपा दी० करंदीकर १०० रु. गोविंदभट नागेशभट मोने १०० रु. गंगाधरभट जोतीभट शेंडे १०० रु. रंगभट अनंताचार्य अष्टपुत्रे १०० रु. जनार्दनभट शेषंभट वरखडे १०० रु. रघुनाथभट नारायणभट शेंडे १०० रु. शेषंभट नारायणभट ऐनापुरे १०० रु. केशवभट गोपाळभट चित्राव १०० रु. काशीनाथभट बाळंभट थिटे १०० रु. महादेवभट रंगनाथभट थिटे १०० रु. नागाचार्य अण्णाचार्य कळमकर १०० रु. खंड दी० मोर फाटक आयाचित १०० रु. एकूण १८०० रुपये.

गांवासंबंधीं उपसर्ग झाल्यास कमाविसदार व ब्राह्मण यांणीं एकत्र होऊन गांवास उपसर्ग न लागे ते करीत जावे. वेदमूर्ती गोविंदभट मोने व गंगाधरभट शेंडे व रंगभट अष्टपुत्रे याणीं लि-



"ब्राम्हणशाई व रामडोह आळीच्या घाटाचा देखावा."

हिल्या अन्वयें सर्वांस जमा करून बंदोबस्त करीत जावा. येणें-प्रमाणें करार जाणीजे छ. १९

ब्राह्मण शाईची माहिती—ब्राह्मणशाई पासून पूर्वेकडील सर्व वस्ती फार जुनी आहे. या सर्व वस्तीला जुनी वाईच म्हणतात. ब्राह्मण शाईचे पश्चिमेकडील सर्व वस्ती नवी आहे. ही नवी वाई सरदार रास्ते यांनींच वसविली. ब्राह्मणशाईचे घाटावरील देवळें—**श्री चक्रेश्वराचें** देऊळ पूर्वाभिमुख आहे. हें स्थान स्वयंभू आहे. २१–६ रुंद व २४--५ लांब अशा चौथऱ्यावर आहे. दर्शनी तीन कमानींची लाहानशी पडवी आहे. गाभारा ९--१० चौरस आहे. हें देवालय थिटे यांनीं बांधल्याचें समजतें. या देवालयाचे उत्तर बाजूस श्री मारुतीचें देऊळ आहे. चक्रेश्वर देवळाचे समोर **श्रीचिमणेश्वराचें**—देऊळ आहे. हें स्थान स्थापित आहे. हें देऊळ लहान आहे. हें ढवळेकर यांनीं बांधल्याचें समजतें. या देवळाचे समोर **श्रीकौंतेश्वर**—(कौंतेश्वर हें नांव कांहीं कारणानें पडलें असावें मूळ नांव 'हरिहरेश्वर' व येथें जवळच हरीहरतीर्थ आहे.) देऊळ पूर्वाभिमुख आहे. १६--९ रुंद व २१--१ लांब चौथऱ्यावर आहे. दर्शनी तीन कमानीची पडवी आहे. समोर एक लहानशी दिपमाळ आहे. हें स्थान स्वयंभू आहे.

या देवळासमोर **श्रीकाळेश्वराचें** देवालय आहे. देवालय पूर्वाभिमुख आहे. २४-४ रुंद व ४३-३ लांब अशा चौथऱ्यावर हें देवालय आहे. गाभारा ९-११ चौरस आहे. सहा-खांबी लहानसा सभामंडप आहे. सभामंडप १६-४ रुंद व २२-५ लांब असा आहे. सभामंडपास दक्षिण, उत्तर व पूर्व असे तीन दरवाजे आहेत. पूर्व दरवाजाजवळ लहानसा नंदी आहे. हें स्थान स्वयंभू आहे. हें दे-

वालय मेंगदे यांनीं बांधिल्याचें समजतें. या देवालयाचे उत्तरेस या आळीची वेश आहे. या आळींतील घाटास लागून दोन देवालयें आहेत. पैकीं **श्रीविठोबाचें**—देऊळ हें श्रीमंत पंत सचीव यांचें आहे. हें देऊळ पूर्वाभिमुख आहे. ब्राह्मण-शाईतील रस्ता या देवळावरून घाटावर गेला आहे. हें देऊळ १–१० उंच, २०–६ लांब व १८ फूट रुंद अशा चौथऱ्यावर आहे. गाभारा दक्षिण–उत्तर ९–३॥ व पूर्व–पश्चिम ९ फूट अर्धा इंच असा आहे. श्री विठोबा व रखुमाई या मूर्ती काळ्या पाषाणाच्या आहेत. दर्शनी तीन कमानींची पडवी आहे. पडवीला लागूनच ३५–६ लांब व २५–३ रुंद असा लाकडी सभामंडप आहे. सभामंडपासमोर गरुड आहे. देवालयाचे पूर्व बाजूखेरीज तिन्ही बाजूंस इमारत आहे. सभामंडपाचे दक्षिण बाजूस जो सोपा आहे तो विशेष चांगला आहे. श्री० सचीव वाईंत आले म्हणजे या देवालयांतच उतरतात. तेव्हां सदरहू सोप्यांतच श्री० सचीव यांचे वास्तव्य असतें. देवालयाची सभोंवार असलेल्या इमारतीसह लांबी १५९ फूट व रुंदी १३७–९ आहे. देवळास पश्चिमाभिमुख एक लहान दरवाजा आणि याहीपेक्षां एक मोठा उत्तराभिमुख दरवाजा आहे. या दरवाजापासून तेरा पायऱ्या उतरून खालीं आलें असतां, पूर्व अंगास एक शनीचा पार व ६–१ रुंदीचा लहान घाट पाण्यापर्यंतचा श्री० सचीव यांनीं बांधिला आहे. **श्री गणपतीचें** देवालय–हेंहि पूर्वाभिमुख आहे. हें देवालय सर्व दगडी आहे. फार जुनें देवालय असावें असें वाटतें. ४१–७ लांब व २६–८ रुंद अशा चौथऱ्यावर गाभारा व सभामंडप आहे. गाभारा दक्षिण–उत्तर १२

फूट व पूर्व–पश्चिम ११–३ आहे. सभामंडप १६–५॥ रुंद व १९–११ लांब असा आहे. खांब चार आहेत. हें स्थान फार जुनें आहे. श्री गणपतीचें ध्यान फारच सुरेख आहे. सभामंडपासमोर एक पार व तुलसीवृंदावन आहे. या देवालयावरून ब्राम्हण शाईत रस्ता जातो. या आळींत लहान लहान देवळें बरींच आहेत तीं येणेंप्रमाणें:—श्री काळभैरवेश्वर, श्री मारुती, श्री बिंदुमाधव, श्री काशीविश्वेश्वर, श्री कोटेश्वर व श्री भवानी इतकीं आहेत. या आळींत एक वटवृक्ष विस्तीर्ण असून फार जुना आहे.

रामडोह आळीची माहिती—या आळीचा घाट अगदीं लहान आहे. या घाटावर **श्रीरामेश्वराचें** देऊळ आहे. हें पूर्वाभिमुख असून स्वयंभूस्थान आहे. दर्शनी तीन कमानीची पडवी आहे. गाभाऱ्याचे दरवाजापासून सहा पायऱ्या आंत उतरून गाभाऱ्यांत जावें इतका गाभारा खोल आहे. या देवालयांत दर बारा वर्षांनीं ज्या दिवशीं कन्यागत लागतें; त्या दिवशीं भागीरथी येते. ज्या जागेंतून भागीरथी निघते, ती जागा चिरेबंदी शिवाय आहे. ती जागा ३–३ उंच व ३–१० रुंद अशी आहे. गाभारा ८–८ चौरस आहे. देवालयाची उंची साधारण आहे. या देवालयाचे दक्षिण अंगास **रामकुंड** आहे. या कुंडावर चिलावळी देवीचें लहानसें देऊळ आहे. श्रीरामेश्वराचे देवालयांत दर कन्यागतांत भागीरथी येते हें खरें किंवा खोटें हें पाहण्याच्या हेतूनें येथील ब्राह्मण शाईतील तात्यासाहेबपंत, गणपती आळींतील गोशाळेचे नानासाहेब रास्ते व यांचे बंधू अप्पासाहेब गोखले आणि माधवराव देशपांडे इत्यादि बरीच मंडळी शके १८२० च्या कन्यागतांत भागीरथी येण्याचे वेळीं ‘ सोव-

ळयानें ' देवालयांत साक्षात्कार पाहण्यास बसली होती. अगदीं ठरलेल्या वेळीं ' भागीरथी ' आली. तें पाहून सर्वांस आनंद झाला. वरील मंडळींपैकीं तात्यासाहेबपंत व माधवराव देशपांडे हल्लीं विद्यमान आहेत.

श्री बाणेश्वर—हें देवालय पश्चिमाभिमुख आहे. घाटावरून या देवालयाकडे जाणेचे रस्त्यावर प्रथम एक वेश लागते. या वेशींतून थोडा चढाव चढून जातांना मध्येंच उजवे हातास हें देऊळ आहे. सदरहु रस्ता पुढें रामडोह आळींत जातो. या देवळाचा गाभारा ८–८॥ चौरस आहे. पुढील सभामंडप चार खांबी असून दोहों बाजूस दोन कट्टे आहेत. प्रत्येक कट्ट्यावर लहान दोन दोन खांब आहेत सभामंडप १९–३ लांब व १४–१ रुंद असा आहे. समोर नंदी आहे. उत्तर बाजू शिवाय तिन्ही बाजूस मोकळी जागा आहे. दक्षिण दिशेस दिपमाळ आहे. याचे शिखराचें बांधकाम निराळ्या धर्तीचें आहे. देवास बाराशें रुपयांचें उत्पन्न आहे. पूजा, नैवेद्य व उत्साह वगैरे सर्व या आळींतील तात्यासाहेब पंत यांचे मार्फत होत असतो. या देवाचे उत्पन्नाचा खर्च करणें वगैरे सर्व वहिवाट वरील पंत यांचेच कडे आहे.

या आळींत एक लांकडी श्री म्हसकोबाचें मंदिर आहे. येथें एक दिपमाळ आहे.

रविवार पेठ—श्री भीमाशंकर हें देवालय श्री कृष्णाबाईचे कांठीं पश्चिमाभिमुख आहे. देऊळ बरेंच ठेंगणें आहे. या देवळाचे समोर ' **भीमकुंड** ' आहे. हें बरेंच मोठें आहे. श्री कृष्णाबाई भीमकुंडापासून जरा दक्षिणवाहिनी होऊन पुन्हां पूर्व-

वाहिनीच वाहते. देवळाचा गाभारा ८–६॥ रुंद व १०–२ लांब असा आहे. लहानसा अष्टकोनी ११–९ रुंद व १२–७॥ लांब असा सभामंडप आहे. यांत दक्षिणाभिमुख दोन मूर्ती आहेत. त्यांतील भैरवाची मूर्ती ३–६॥ उंच आहे. व दुसरी देवीची २–११ उंच आहे. उत्तराभिमुख श्री विष्णूची मूर्ती २–२ उंच आहे. हें देवालय सातारचे अष्टप्रधानांपैकीं सुमंत यांनीं बांधिल्याचें समजतें.

या देवालयाचे जरा दक्षिण बाजूस गांवचें स्मशान आहे व उत्तरेस लिंगायत लोकांच्या समाध्या चिरेबंदी तुलसीवृंदावनासारख्या बांधिलेल्या असून त्यांवर पऱ्याचें आच्छादन केलेलें आहे. या समाध्यांजवळून जो रस्ता रविवारामध्यें जातो, त्या रस्त्याचे आरंभीं उजवे बाजूस **श्री विठोबाचें** देऊळ आहे. पडवी व गाभारा मिळून १९--७॥ लांब व १९-९॥ रुंद आहे. देऊळ पूर्वाभिमुख आहे. पडवीस लागून सात खणाचा लाकडी सभामंडप आहे. या देवालयासमोर अश्वत्थाचा पार आहे या पारावर गरुड व मारुती आहेत. दोन तुलसी वृंदावनें आहेत. हें देवालय शिंपीलोकांचें असावेंसें वाटतें. परटाचे पाराजवळ चंवडे यांचें **विठ्ठलमंदिर** ’ लाकडी बांधिलें आहे, दाजीसाहेब रास्ते यांनीं श्री विष्णुलक्ष्मीचें मंदीर लांकडी बांधिलें आहे. या विष्णु-लक्ष्मीच्या मूर्ती अगदीं लहान आहेत. चावडी जवळ एक मारुतीचें लांकडी मंदिर आहे. याचेही पुढें जेथें चारी दिशेस रस्ते जातात तेथें दक्षिणाभिमुख मारुतीचें लांकडी मंदीर आहे. हे दोन्ही मारुती आदमासें चार फूट उंचीचे असावेत. दक्षिणाभिमुख मारुती पासून एक रस्ता उत्तरेस—मोतीबाग, सुलतानटेकडी, बोपर्डी व पालपेश्वर वगैरेकडे जातो. दक्षिणेकडे जो रस्ता जातो तो वाठारकडे जाणाऱ्या र-

स्त्यास नव्या मशीदीजवळ येऊन मिळतो. ब्राह्मणशाईतून, तात्यासाहेब पंत यांचे घरावरून आणि नव्या जुम्मामशीदीवरून जो रस्ता पूर्वेकडे (सरस्वती) ऊर्फ किचकिवरा पुलावरून जातो, तोच वाठारास जाणेचा रस्ता होय. रविवार पेठ किचकिवरापर्यंत आहे. किचकिवऱ्याचे पलीकडे एक घुमट आहे. यांत पिरमुबारकशहीचें कबरस्थान आहे. किचकिवऱ्याचे पुलावर पूर्वेकडे तोंडकरून उभें राहिलें असतां डावे बाजूस कमेटीचे नाकें व नाक्याचे पिछाडीस तिन्ही बाजूनें चिरेबंदी तट असून पश्चिम बाजूस मात्र तट नाहीं. या तटावरील जागेंत माणकशहा व रतनशहा यांचीं कबरस्थानें आहेत. शिवाय बरीच थडगीं आहेत. उजवे हातास दक्षिणेकडे जो रस्ता जातो, तो गुजर आळींतून भद्रेश्वराकडे जातो. या रस्त्याचें आरंभास एका उंचवट्यावर पिरमहीताद कबरस्थान असून इतर थडगीं पुष्कळ आहेत. जुम्मा मशीदीवरून पुलावर जातेवेळीं डावेबाजूस व उजवे बाजूस अशा दोन टेकड्या आहेत. डावे बाजूच्या टेकडीवर शेकमिरे यांचा तटबंदी वाडा आहे. हल्लीं दक्षिण व पूर्वबाजूचा तट साधारण असून पश्चिम व उत्तर बाजूचा तट सर्व पडला आहे. पश्चिमाभिमुख जुना दरवाजा मात्र आहे. वाड्याचा कांहीं भाग अवशिष्ट आहे. हल्लीं येथील मुख्य काजीसाहेब येथेंच रहात असतात. उजवे बाजूचे टेकडीवर पूर्वीं मोंगलांचा तळ होता असें समजतें. हल्लीं मोकळी जागा आहे. पुलापासून अजमासें एक मैलावर एक घुमट असून तेथें शहाबिबबरानीचें कबरस्थान आहे. याला शहाबाग असे म्हणतात.

रविवार पेठेंत जुम्मा मशीद आहे. मशीदीला पूर्वाभिमुख व

उत्तराभिमुख असे दोन दरवाजे आहेत. मशीद ४०—९ दक्षिण उत्तर, ३६—६ पूर्व-पश्चिम व १७—१॥ उंच अशी आहे. मुख्य दरवाजासमोर आंत भिंतीला एक कमान आहे. या कमानींत एक काळा पाषाण अदमासें एकवीत रुंद व दोन विती लांब असा बसविला आहे. हा दगड येथील मूळ मशीदीचा आहे. म्हणजे येथें जुनी मशीद होती तीचा जिर्णोद्धार केलेला आहे. जुन्या पैकीं तो दगड असून त्यावर मुसलमानी लिपींत "अल्ला व महंमद १३१० फसलीसन." असें आहे. या कमानीस लागून तीन पायऱ्याची पुराण सांगण्याची जागा केली आहे. या जागेस मुसलमानींत "मींवर" असें म्हणतात. आंतील पोकळी दक्षिण उत्तर ३६-७, पूर्व-पश्चिम २३—४ व उंची ११—१० आहे. पडवीला दर्शनी तीन कमानी आहेत. पायऱ्या तीन आहेत. खालीं थोडी फरशी आहे. येथें एक आड, आडाजवळ एक हौद व हौदाजवळ २।३ मोऱ्या आहेत. वाई येथील मुसलमानांची मुख्य मशीद हीच आहे.

श्री कृष्णानदीचे पलीकडील माहिती.

पुलावरून जो रस्ता दक्षिणेकडे जातो, तो (सोनगिरवाडी) उर्फ साकेवाडींतून—पोष्टावरून पश्चिमेकडे धांडेगरांवरून नहराकडे जातो. पुलाचे पलिकडे पुल संपतांच उजवे बाजूस एक लहानसें 'श्री गणपतीचें देऊळ' आहे. रस्त्याला लागुनच कमेटीचे नाकें आहे. या नाक्याजवळच एक नंबरची मराठी शाळा दगडी असून पत्र्यानें आच्छादित केली आहे. जरा पुढें गेलें असतां डावे बाजूस पोष्ट आफिस, धर्मशाळा, पोलिस लाईन व मामलेदारकचेरी आहे. मामलेदार कचेरीचे जरा पुढें गेलें म्हणजे दक्षिण व

उत्तर दोन रस्ते जातात. त्यांतील दक्षिणेकडील रस्ता कचेरीचे पिछाडीनें साताऱ्यास जातो. उत्तरेकडील रस्ता श्री रोकडोबा वरून श्री सिद्धेश्वर (सिद्धनाथ वाडी) उर्फ सिंनसवाडींतून पसरणीस जातो. हा उत्तर रस्ता नहराकडे जाण्याचे रस्त्या पासून जेथें फुटतो, तेथेंच अलिकडे इंजिनिअरचा बंगला आहे व पलिकडे दामोदर आश्रम आहे. दामोदर आश्रम मुंबईच्या एका भाटयांनीं बांधिला आहे. दामोदर आश्रमचे समोर मिशनऱ्यांचा मोठा बंगला आहे. या बंगल्याचे पुढें सरकारी रहदारी बंगला आहे. याचे समोर भेल कंट्राक्टरचा तबेला आहे. याचेही पुढें रस्त्याचे उजवे बाजूस पारशी कंट्राक्टरचा एक तबेला आहे. मामलेदार कचेरीसमोर आउटएजन्सिचें आफिस आहे. सातारा रस्त्याचे उजवे बाजूस सोनजाईचे डोंगराजवळ मिशनरी ली साहेबांचा बंगला आहे.

(सोनगिर वाडी) उर्फ साकेवाडीची सर्व मालकी धर्मपुरींतील प्रसिद्ध साठे यांचेकडे आहे. चक्रेश्वर व काळेश्वर याचे मधोमध नदीचे पलिकडील कांठावर श्री शांताश्रम स्वामींची समाधी आहे.

श्री शांताश्रम स्वामी हे यादव गोपाळ खटावकर यांचे गुरु होत. हे स्वामी श्री शाहू महाराज यांचेही गुरु होते असें समजतें. या समाधीच्या पहिल्या सोप्यावर जाण्यास चार पायऱ्या आहेत. तेथून जरा पुढें फरशीवर १०—२ चौरस १--११ उंचीचा चौथरा आहे. या चौथऱ्यावर चौकोनी समाधी आहे. या समाधिवर पूर्व बाजूस **॥ श्री मन्मंगलमूर्तयेनमः ॥ श्री सद्गुरुमेघःशामंभजे ॥** अशी लिपी आहे. तसेंच उत्तर बाजूस **॥ श्री महागणाधिपतयेनमः ॥ श्री शांताश्रम समाधीरीयं ॥**

शके १६४१ विकारी नाम संवत्सरे भाद्रपद बहुल प्रतिपदा सौम्ये ॥ याप्रमाणें लिहिलेलें आहे. यावरून या समाधीस १९१ वर्षें झालीं. इतकीं वर्षें जरी झालीं तरी समाधीचें काम नवें असल्यासारखें दिसतें. समाधी फारच सुरेख बांधिली आहे. या समाधीसारखी सुरेख दुसरी समाधी सर्व वाईत नाहीं.

यादव गोपाळ खटावकर हे श्री शाहू महाराजांचे खाजगी कारभारी होते. यांना बरीच जहागिरी होती. यांनीं सातारा येथें एक पेठ वसवली. या पेठेस यादव गोपाळ पेठ असें म्हणतात. ही यादव गोपाळपेठ हल्लीं प्रसिद्ध आहेच. यादव गोपाळ यांची जहागिरी नाना फडणवीस यांनीं कांहीं कारणांवरून जप्त केली. पुढें कांहीं खटपटीनें पांचगणीजवळ असलेला चिखली हा गांव इनाम करून दिला. तो गांव यांचे वंशजास हल्लीं चालू आहे. ‘ शांताश्रम स्वामींचे ’ समाधीची पूजा, नैवेद्य व पुण्यतीथीचा उत्साह वगैरे खर्चाकरितां श्री शाहू महाराज यांनीं इनाम जमीन दिली आहे. हल्लीं जमिनीचे उत्पन्न तीनशें रुपये होत आहे असें समजतें. यादव गोपाळ खटावकर यांचे वंशजाकडे समाधीची सर्व व्यवस्था आहे. याच वंशांतील रा. मार्तंड गणेश खटावकर वकील हे येथें ब्राह्मणशाईत रहात आहेत. साकेवाडीचे आज्ञेयेस धर्मपुरींतील ‘ बेडेकर आणि मंडळी ’ यांनीं पक्या विटाचें एक लहानसें पूर्वाभिमुख मारुतीचें देऊळ बांधिलें आहे. हा मारुती उघड्यावर उन्हा–पावसाळ्यांत पडला होता. त्याची छायेंत स्थापना केली. हेंच खरें पुण्यकारक कृत्य होय.

सिद्धनाथवाडी उर्फ सिन्नसवाडी—हें नांव ह्या गांवास पडण्याचें कारण श्री **सिद्धेश्वराचे** देवालयास हें गांव लागून

असल्यामुळें वरील नांव या वाडीस पडलें आहे. श्री सिद्धेश्वराचें देवालय पूर्वाभिमुख आहे. हें देवालय सर्व दगडी असून जुन्या पद्धतीचें आहे. ३८–६ लांब व २५–७ रुंद आणि २–८॥ उंच अशा चौथऱ्यावर हें देवालय आहे. गाभारा ९–९ चौरस आहे; सभामंडप सहा खांबी असून लांबी १८–६. रुंदी १५–८ आहे. व उंची ८–५ आहे. सभामंडपास लागूनच २५-७ लांब व १६-१० रुंद अशा चौथऱ्यावर चार खांबी छत्रींत नंदी आहे. देवालयाचे समोर जनार्दनपंत गाडगीळ यांनीं लहानशी इमारत बांधिली आहे. जनार्दनपंत गाडगीळ हे बडोद्यास वरिष्ठ कोर्टाचे जज्ज होते. यांनीं पेन्शन घेतल्यावर वरील इमारत बांधिली असें समजतें. या देवालयाचे सभोंवार तट आहे.. पूर्व-पश्चिम तट १२४–५ लांब आहे. दक्षिण–उत्तर तट १६८–४ लांब आहे. कोठें १७ फूट कोठें १४ फूट अशी उंची आहे. देवालयाचे पूर्वेस व उत्तरेस श्रीअश्वथ्थ पार आहेत. कांहीं समाध्या व इतर बरींच झाडें आहेत. देवालयाचे दक्षिणेस एक गुहा आहे. ही गुहा कोणत्या योगी बोवानें बांधिली तें समगत नाहीं. या गुहेचा दरवाजा उत्तराभिमुख असून २–७ उंच व १–५॥ रुंद आहे. या दरवाजांतून पांच पायऱ्या खालीं उतरलें असतां आणखी एक असाच लहान दरवाजा आहे. गुहेंतील उंची ४–११, दक्षिण–उत्तर लांबी १५–४॥. व पूर्व–पश्चिम लांबी १० फूट आर्धा इंच आहे. या गुहेच्या व देवालयाच्या मध्यें एक मोडकें घर आहे. देवालयाचे तटास तीन वाटा आहेत. पूर्व–पश्चिम दोन, व तिसरी वाट नदीवर जाते. ही उत्तर वाट एका कमानींतुन २१ पायऱ्या उतरून. घाटावर जाते. सिद्धेश्वर

देवालय ज्यांनीं बांधिलें त्यांनींच घाट बांधिला आहे. श्रीसिद्धेश्वराची सर्व व्यवस्था रविवारांतील वाकडे यांचेकडे आहे. वाकडे यांचे मूळ पुरुष रामाजी नाईक यांचा जुना वाडा रविवारांत द्रवीड यांचे वाड्याचे पिछाडीस होता. हल्लीं भोंवतालचा तट मात्र आहे. याला लागूनच यांची बाग आहे. रा. खंडेराव दत्तात्रय वाकडे हे ज्या वाड्यांत रहातात, तो वाडा मोठा व मजबूत आहे. यांचे आजे खंडो रामचंद्र यांनीं हा नवा वाडा उत्तराभिमुख बांधिला आहे. शिवाय यांनीं ब्राह्मण शाईचे घाटावर श्रीगणपती समोर, आपले गुरु ' सदानंद स्वामी ' यांची समाधी बांधिली आहे. रामडोह घाटावर दक्षिणाभिमुख सात खणाची धर्मशाळा बांधिली आहे. शाहू महाराज यांचे कडून इनाम मिळालेलें हल्लीं चालू आहे.

श्रीरोकडोबाः—हा रोकडोबा मारुती श्री समर्थ रामदास स्वामी यांनीं स्थापन केल्याचें समजतें. श्री मारुतीचें ध्यान फारच सुरेख आहे. गाभारा तेवढा दगडी असून सभामंडप लाकडी आहे. देवळाचे आवाड मोठें आहे. त्यांत एक अश्वथ्याचा पार आहे. मारुतीचे पुजारी पिटके हे कीर्तन करीत असत. हे पिटके बुवा अल्पवयांतच वारले. हल्ली पिटके बुवांचे कुटुंबाकडे श्री मारुतीची व्यवस्था आहे.

वाईजवळील देवालयांची माहिती.

क्षेत्र वाई पासून सुमारें एक मैलावर **श्री भद्रेश्वराचें** मूळ स्वयंभू स्थान आहे. म्हणजे मूळ स्वयंभू स्थान बरेंच खोल आहे. हल्लीं जें शिवलिंग दृगोचर होतें तें स्थापीत आहे. ज्यांनीं देवालय बांधिलें त्यांनींच अशी व्यवस्था केली असें दिसतें.

असें ऐकिवांत आहे कीं, ज्यांनीं हें देवालय बांधिलें त्यांना " देऊळ बांधूं नये " असा दृष्टांत झाला असतांही, ती आज्ञा न जुमानतां देऊळ बांधिलें परंतु त्याचा परिणाम ज्यांनीं देऊळ बांधिलें त्याचा निर्वंश ताबडतोब झाला. असो. गाभारा व सभामंडपासह लांबी ३९--६ याचे खालील चौथरा २६--६॥ रुंद व ४८--८ लांब असा आहे. गाभारा १०--४ चौरस आहे. गाभाऱ्याचा दरवाजा फार लहान आहे. सभामंडप ७--६ उंच, १४--७ रुंद व १६--९ लांब आहे. चार खांब आहेत. आणि दोन्ही बाजूस कट्टे आहेत. सभामंडपाचे समोर अश्वथ्याचा पार आहे. याचेवर लाकडी अष्टपैलू छत्री आहे. याला लागूनच नऊ खणी दुमजली इमारत आहे. माडीला दक्षिण बाजूस थोडी ग्यालरी आहे. देवालयापासून श्री कृष्णाबाईचें पात्र बरेंच खोल आहे. येथें लहानसा घाट आहे. याला २६ पायऱ्या आहेत. पायऱ्या उतरतांना एक पार लागतो, त्यावर बकुलाचें झाड आहे. देवालयाचे उत्तरेस पूर्वाभिमुख नऊ खण सोपा व पडवी आहे. तसेंच दक्षिणाभिमुख सात खण सोपा व पडवी आहे. पुढें आंगण व तुलसीवृंदावन आहे. हें देवालय पूर्वाभिमुख असून, फार रमणीय स्थान आहे. हें देवालय सर्व दगडी आहे.

श्रीवाकेश्वरः—हें स्वयंभू स्थान वाईपासून दोन मैलावर सातारा रस्त्याचे जवळ आहे. हें स्थान श्री कृष्णाबाईचे कांठीं आहे. देवालय पूर्वाभिमुख आहे. या देवालयाचे सभोंवार तट आहे. दक्षिण बाजूचा तट १८६ फूट आहे. पश्चिम बाजूचा तट २०४–४ आहे. उत्तर बाजूचा तट १८६–९ आहे. व

पूर्वेकडील तट १७१–८ आहे. तटाची रुंदी ३–९ आहे. मुख्य दरवाजा पूर्व–तटास आहे. उंची ७–६॥ व रुंदी ९–७ आहे. ह्या दरवाजासमोर अदमासें दोनशें फुटावर एक वडाचा पार आहे. चौफेर तटाचे आंतील फरशी ७९ फूट लांब व ४९–८ रुंद आहे. या फरशीवर ३–१॥ उंच, ३७–१ लांब व २४ फूट रुंद अशा चौथऱ्यावर गाभारा व सभामंडपासह देवालय आहे. या चौथऱ्यास चार पायऱ्या आहेत. या चढून वर गेल्यावर सभा मंडप लागतो. सभामंडप १४–४॥ लांब व १३–१०॥ रुंद असा आहे. तिन्ही बाजूस कट्टे आहेत. या कट्ट्यावरील खांब वीस आहेत. सभामंडपांत चार खांब आहेत, उंची ७–१० आहे. गाभाऱ्याचा दरवाजा फार लहान आहे. गाभारा फार खोल आहे. हें देवालय प्राचीन पद्धतींचें आहे. सभामंडपासमोर ३ फूट उंचीचे ८–४ चौरस चौथऱ्यावर चौफेर कमानींत नंदी आहे. कमानीची उंची ७–२ व रुंदी ४–४॥ आहे. सभामंडपास लागूनच १० फूट चौरस चौथऱ्याखालीं एक लहानसें टाकें चांगलें बांधीव आहे. या टाक्यांत बहुतेक नेहमीं पाणी असतें. पूर्व बाजूनें लहानशा पायऱ्या आहेत. आणि उजेडाकरितां उत्तर बाजूस लहानशी कमान आहे. या टाक्यापासून उत्तर बाजूस एक लहानसें देऊळ आहे. नंदीचे मागें एक पार आहे. फरशीला लागून उत्तरेकडे घाटावर जाण्यास जो रस्ता आहे. तो फरशीचा आहे. या रस्त्याजवळच एक तुळशीवृंदावन आहे. उत्तर तटास जो दरवाजा आहे त्यांतून घाटावर जाणें. घाटास विषेश पायऱ्या नाहींत कारण श्री कृष्णाबाईचें पात्र उथळ आहे. घाटाची लांबी अदमासें ८० फूट असून रुंदी सुमारें ४०–९० फूट असावी.

तटाचे वायव्य कोंपऱ्यांत लहानसा बुरुज असून त्यांत एक गुहा आहे. ही गुहा लहान असून फार कोंदट आहे. या गुहेपेक्षां "श्री सिद्धेश्वर येथील गुहा" विशेष चांगली आहे. या देवालया-पासून बावधन हें गांव अदमासें दीड मैल असावें. बावधन येथील लोक याच घाटावर स्नानास येतात. या देवालयाजवळ वस्ती नसल्यामुळें, हें स्थान भयाण दिसतें.

श्री सोनेश्वर—हें स्वयंभू स्थान वाईपासून चार साडेचार मैलावर श्री कृष्णाबाईचे कांठीं आहे. हें देवालय पश्चिमाभिमुख असून सर्व दगडी आहे. देवालय २६—३ लांब, १९—६ रुंद व १०—६ उंच असें आहे. हें स्थान फार पुरातनचें असून, या स्थानासंबंधाचें महत्व-श्री कृष्णामहात्म्यामध्यें आहे. पूर्वीचें नांव 'हाटकेश्वर' हटक म्हणजे सोनें यावरून सोनेश्वर हें नांव पडलें असावें असें वाटतें. गाभारा १० फूट चौरस आहे. गाभाऱ्याला लागूनच लहानशी पडवी आहे. या देवालयासमोर २०—२२ फुटावर लहानशा चौथऱ्यावर चौफेर कमानींत नंदी आहे. नंदीचे मागें श्री मारुतीराज आहेत. या देवालयांत विश्वनाथबोवा कर्ना-टकी ब्राह्मणानें चाळीस दिवस उपोषित राहून देवाची प्रार्थना केली तेव्हां बुवांना दृष्टांत झाला कीं "या ठिकाणीं सेवा करून रहावें." विश्वनाथ बोवांनीं "श्री गुरुचरित्र" हातांनीं सुरेख लिहिलें आहे. ही हस्तलिखित प्रत देवालयांत आहे. श्री दत्त-जयंतीचा उत्साह करीत असत. बुवांचे म्हणण्यांत हें स्थान दत्त-स्वरूपी आहे. बुवांनीं या ठिकाणीं सुमारें पंचवीस वर्षें काढलीं. पुढें श्री क्षेत्र काशी येथें जाणेचें बुवांचे मनांत आलें. म्हणूनच बुवांनीं आपले शिष्य काशिनाथपंत केंजळकर यांना "श्री साने-

श्वराची " पूजा वगैरे सर्व व्यवस्था सांगून, आपण श्री क्षेत्र काशी येथें गेले. ते तिकडेच वारले. बुवांचे शिष्य काशीनाथपंत केंजळकर कुलकर्णी हे हल्लीं येथें आहेत. काशीनाथपंत यांनीं प्रपंच सोडून बुवांचें व्रत पुढें चालू ठेविले आहे. श्री सोनेश्वरचे देऊळ नदीपासून जरा उंचावर आहे.

केंजळ गांवचे हैबतराव जगताप यांनीं येथें लहानसा घाट व चिदंबरेश्वराचें देवालय बांधिले आहे. हे देवालय पूर्वाभिमुक आहे. अदमासें २७–११ लांब व १७-६ रुंद असे आहे. दर्शनीं तीन कमानीची पडवी आहे समोर नंदीचा चौथरा कायम आहे. नंदी मात्र पाण्यानें वाहून गेला असावा. देवालयासमोर एकामागें एक असे दोन मनोरे आहेत. एक अष्टकोनी व दुसरा चौकोनी आहे. हे मनोरें फारच सुरेख बांधिले आहेत. येथील घाटांवरून पूर्वेस चंदन वंदन किल्ले, व दक्षिणेस वैराटगड किल्ला वगैरे देखावा फार प्रेक्षणीय दिसतो. श्रीचिदंबराची पूजा वगैरेची व्यवस्था कांहीं नाहीं. येथील घाट, देवालय, व मनोरे याच्या योगानें हें सोनेश्वरस्थान विशेष रमणीय झालें आहे. श्रीसोनेश्वरापासून ओझर्डे हा गांव मैल सव्वा मैल आहे. श्रीसोनेश्वरापासून नदीपलीकडे कडेगांव आहे. हा गांव मात्र येथून अगदीं जवळ आहे. श्रीसोनेश्वराचे दक्षिणबाजूस एक कौलारु धर्मशाळा आहे, ही धर्मशाळा वाई येथील पूर्वींचे मोहनीराज मामलेदार यांनीं वर्गणी जमवून बांधिली.

बाईचे पश्चिमेस सुमारें एक दीडमैलांवर '**वेणवली**' नांवाचे लहानसे टुमदार गांव कृष्णा काठीं आहे. हे गांव श्रीमंत पेशवे यांचे मुख्य मुत्सद्दी " कार्य धुरंधुर मकुटमणी ना फडणवीस"

यांनीं बसविलें. यांनीं आपल्या वाड्याचें पश्चिमेस "**श्रीमेणवलेश्वर,** श्री **विष्णुमंदीर** व **घाट** इतकी कामें अती आकृतिम केली आहेत." घाट धनुष्याकृतीचा असून याचे उत्तर बाजूस पूर्व-पश्चिम चिरेबंदी मजबूत तट आहे. यातटा खालून गांवांतील नाला सोडिला आहे. घाट मोठा असून मजबूत बांधिला आहे. **श्री मेणवलेश्वराचे** देवालय पूर्वाभिमुख आहे. ३--८॥ उंच, ४६--७ लांब व २६--११ रूंद अशा चौथऱ्यावर दुसरा चौथरा २--११ उंच, ३४--११ लांब व २०--४॥ रूंदीचा आहे. यावर देवालय आहे. पहिल्या चौथऱ्यास चार पायऱ्या आहेत. व दुसऱ्या चौथऱ्यास तीन पायऱ्या आहेत. दर्शनी तीन कमानीची पडवी आहे कमानीची उंची ७--२ व रूंदी ३-३ आहे. कमानी नकशीदार आहेत. गाभाऱ्याचा दरवाजा ४--११ उंच व २--९॥ रुंद आहे. गाभारा फार खोल आहे. गाभाऱ्याचे बाहेर गाभाऱ्यांतील खोलीचेही वर पाणी असते. परंतु आंत पाणी शाळूंके शिवाय बिलकुल नसतें.

गाभाऱ्यास तळाशी मोऱ्या आहेत ह्या बंद ठेवितात, कारण जर मोकळ्या रहातील तर पाण्यानें गाभारा भरेल म्हणून बंद ठेवितात. ज्या वेळीं नदीला महापूर येतो तेव्हां गाभाऱ्याचे दरवाज्यांतून पाणी आंत जाते. गाभाऱ्यांत टाळी वाजवीली असतां, प्रतिध्वनी ४-५ वेळा चांगला होतो. " ह्याजवरून विजापूरचे **गोलघुमटाची** आठवण होते. गोलघुमटांत कोणी आवाज केला तर सात वेळ प्रतिध्वनी होतो." असो, या देवालयाचे पडवीस लागूनच ४-३॥ चौरस चौभऱ्यावर लहानसा नंदी आहे. या देवालयाचे मागें एक सुळका आहे. याचे कारण पाण्याच्या जो-

रानें देवालयास अपाय होऊं नये. या सुळक्याचे योगानें पाणी दुभंग होते. असो, नदीचे मार्गे थोड्या अंतरावर " **घंटाघर** ' आहे. ३-१ उंचीचे ११-११ चौरस चौथऱ्यावर चौफेर कमानीत मधोमध ही **विस्तीर्ण घंटा** आहे. कमानीची उंची ८-४ व रुंदी ६-२ आहे. या चौथऱ्यास चार पायऱ्या आहेत. ही घंटा फारच मोठी आहे. इकडे दक्षिण भागांत येवढी मोठी घंटा क्वचितच असेल. या घंटेवर " पोर्तुगीज लिपी लिहिलेली असून १७०७ असे आकडे आहेत " १७०७ हा पोर्तुगीज सन असला पाहिजे असें अनुमान होते. घंटेचा व्यास ९–८ व उंची ३–२ आहे. हिचा अवाज बराच लांबवर ऐकूं जातो.

श्रीविष्णुमंदीर—हे देवालय पूर्वाभिमुख आहे. सभोंवार साधारण तट आहे. पूर्व तटास मुख्य दरवाजा व पांच कमानीची धर्मशाळा आहे दुसरा दरवाजा उत्तर तटास आहे. या दरवाजांतून घाटावर जाणे. हे देवालय २७–२ लांब, १९ फूट रुंद व ३ फूट उंच अशा चौथऱ्यावर आहे. गाभाऱ्यांत **श्रीविष्णुची मूर्ती** काळ्या पाषाणाची आहे व श्रीलक्ष्मीची मूर्ती संगमरवरी पाषाणाची आहे. श्रीविष्णुची मूर्ती अदमासे तीन फूट आहे व श्रीलक्ष्मीची मूर्ती अदमासें दोन अडीच फूट आहे. गाभाऱ्याचा दरवाजा पांच फूट उंच व २--६ रुंद आहे. पडवीला दर्शनी तीन कमानी फारच सुरेख नकशीदार आहेत. पडवीला तीन पायऱ्या आहेत. पडवीला लागूनच तीन कमानीचा सभामंडप आहे. १९ फूट लांब व १२--६ रुंद आहे. पूर्वाभिमुख दरवाजावर गची आहे. गचीवर एक जिना आहे. येथें उभे राहिले असतां असमंतातील सर्व शोभा दृगोचर होते. या देवालयाची

मालकी फडणवीस यांचे वंशजाकडे आहे. हल्लींचे नानासाहेब फडणवीस पुण्यास रहातात. पुणे येथील " बेलबागेतील श्रीमहाविष्णू व लक्ष्मी यांची पुजा नैवेद्य वगैरे ज्याप्रमाणें हल्लीं व्यवस्थेशीर आहे, त्याप्रमाणें ' मेणवली ' येथील देवालयाची व्यवस्था नाहीं. मोठी आश्चर्याची गोष्ट आहे कीं, ज्यांना देवालयांची उत्तम व्यवस्था ह्मणजे " आरती, भुपारती नैवेद्य व पुजा " चौघडा वगैरे सर्व चालविण्याची शक्ती आहे. त्यांनीं सर्व अवव्स्था करणें हे त्यांना लांछनास्पद होय.

× INAM ×
A
COMMISSION

नकल.

श्री.

तर्जमा जाला असे.

" यादी रा. बळवंतराव माधवराव रास्ते सुा आर्बा सलासीन मयातैन व अलफ सन १२४३ फसली ता. १ माहे जून सन १८३३ इसवीचे खत पाठविले त्यांत हासील कीं, खानदानींची कैफियत पाठवावी म्हणोन पेशजी पत्र पाठविले होते परंतु आजपर्यंत पाठविली नाहीं. त्यास हल्लीं जलद कैफियत पाठविली पाहिजे, सरकारांत पाठविली जाईल म्हणोन लिहिले. ऐसी यासी आमचे वाडवडींल मौजे वेळणेश्वर ताा गुहागर तालुके अंजणवेल प्रांत कोंकण येथील वतन खोती व महाजन व इनामदार वि-

जापूर पादशाई कारकीर्दीपासून सावकारी व्यवहार करीत होते. कोंकण जिल्हेचे रसदेचा कारभार करीत होते. त्यासमयीं व्यवहार रास्ती असे सरकार विजापूर यांणीं मनांत आणून उपनाव गोखले मुळचें होतें. परंतु व्यवहारावरून रास्ते असें नांव चालविले. त्या दिवसापासून रास्ते असे नांव चालत आहे. पुढें श्री मंन्माहाराज शाहू राजे छत्रपती याजवळ सातारे मुक्कामी आमचे वडील चवथे पुरुष भिकाजी शामराज व सदाशीव शामराज हे उभयतां बंधू सरकारची कृपा संपादून एक विचारे होते. महाराजांनीं जातीस सरंजाम पांच हजार दोनशें रुपयांचा दिल्हा. तेव्हां सदाशिव शामराज यांस सातारे यास कामावर ठेऊन भिकाजी शामराज यांस वाईत वाडा बांधावयास जागा दिल्ही. तेथें वाडा बांधून राहिले. त्यांस प्रथम कन्या गोपिकाबाई जाहाली ती माहाराजांनीं श्रीमंत नानासाहेब पेशवे यांस देवविली वाईत लग्न जाहाले " भिकाजी शामराज यांस--दोन कन्या व सात पुत्र होते एक कन्या गोपिकाबाई श्रीमंत पेशवे यांना दिल्याचे वर नमुद केलेच आहे. दुसरी कन्या सगुणाबाई--आप्पाजी गाडगीळ यांस दिल्या होत्या. पुत्रसात--मल्हारराव, गणपतराव, आनंदराव, लक्ष्मणराव, गंगाधरराव, रामचद्रंराव व जि३नराव, भिकाजी नाईक यांचे चुलते हरबाजी नाईक होते. हरबाजी नाईक यांचे पैकी वंशज हल्ली कांहीं वाईत व कांहीं जमखिंडीत आहेत. यांना सावकारी व्यवहार संबंधी " नाईक " म्हणत असत. पुढें श्रीमंतांशीं शरीर संबंध झाल्या पासून " राव " असें म्हणू लागले.

'मल्हारराव भिकाजी पेशवे सरकारांत राहून कामकाज करीत असत. पेशवे यांनीं कर्नाटक प्रांतीं सावनूरकर नबाबवर स्वारी

केली. तेव्हां मल्हारराव बरोबर होते. त्यावेळीं बागलकोट किल्ला घेऊन मल्हारराव यांचे स्वाधीन केला. व बंडाईचा बंदोबस्त करण्यास सांगितलें. मल्हारराव यांनीं फौज, पायदळ व तोफखाना बाळगून बंडाई मोडिली आणि आल्हींखानचा " बदामी " किल्ला कारस्थानें घेऊन सरकार अम्मल बसविला. सबब पेशवे यानीं तीन हजार फौजेची सरदारी करून दिली. ते वेळीं मल्हारराव यांनीं आपणांस व आपले बंधूस तैनाती करून घेतल्या व दौलतशिक्का मिळविला. तैनाती कापड बाबसह मल्हारराव यांस–एकविसहजार दोनशें रुपये, आनंदराव व लक्ष्मणराव प्रत्येकीं दहा हजार चारशें.

मल्हारराव मृत्यु पावले. संतान नाहीं म्हणून पाटचे बंधू गणपतराव यांचे नांवें सरदारी व्हावी, परंतु आनंदराव यांचे कर्तृत्वावर पेशवे यांची मेहेर होऊन सरदारी आनंदराव यांसच मिळाली. पुढें गणपराव यांचें बोलणें श्रीमंतापाशीं होऊन, श्रीमंतांनीं अलाहिदा सरदारी गणपतराव भिकाजी यांस दिली.

आनंदराव भिकाजी यांस–जातीस तैनात ९६४५०; कितागांव १५४८८॥; फौजेस सरंजाम १००००००; इनाम गांव व जमिनी संसारखर्चाकडे वगैरे १७२१०।≡।।।; गणपतराव भिकाजी यांस १९३२५०; एकूण १३२२३९८॥।≡।।। सरंजाम व दसऱ्यास पोशाख साडेतीन सनगे होती. शिवाय खास तैनाती लक्ष्मणराव भिकाजी यांस--२०८००; गंगाधरराव यांस २५००० रामचंद्रराव यांस १००००; आणि जिवनराव यांस यांचे चुलते सदाशिव शामराज यांना शाहूमाहाराज यांनीं जी तैनात दिली होती. तीच तैनात पेशवे यांनीं जिवनराव यांस दिली. आनंदराव भिकाजी यांचे कन्येचे पुत्र रामचंद्रराव आप्पाजी साठे यांसही

श्रीमंतांकडून ९३९० तैनात होती. शिवाय रास्ते यांना पांच हत्तींचे खर्चाबद्दल ९००० तैनात होती.

[श्रीमंत पेशवे यांचेकडून देव–ब्राह्मणांस एकंदर इनाम ११४४०|||=]

पैकीं ९७७९|||= श्री क्षेत्र वाईतील देव–ब्राह्मणांस–खालीं लिहिल्याप्रमाणें—

" ३९३७|| मौजे केंजळ प्रांत वाई हा गांव देव–ब्राह्मणांस इनाम.

३४४२|= मौजे गुळुंब प्रांत वाई हा गांव श्री महालक्ष्मी व श्री कृष्णेचे उत्साहाबद्दल व गंगापुरी येथील श्री उमामहेश्वर पंचायतन देवाकडे व वाईतील ब्राह्मणांकडे.

१५०० कसबे बावधन प्रांत वाई येथील जमीन दीड हजार रुपये आकाराची, श्री काशी विश्वेश्वर क्षेत्र वाई पुजा, नैवेद्य, उत्साह व ब्राह्मण भोजनाबद्दल.

५३६ श्री गंगा रामेश्वर क्षेत्र वाई पुजा नैवेद्याबद्दल.

जमिनी ३०० कसबे वाघोली प्रांत वाई.
,, २०० मौजे कणुर प्रांत वाई.
,, ३६ कसबे बावधन जमीन विठ्ठल येशवंत खासनीस याणीं आपलें इनाम पैकीं करून दिली.

———

५३६

३०० मौजे मनगोळी पैकीं उकळी प्रांत विजापूर येथील जमीन वाईतील श्री थोरल्या गणपतीकडे पुजा नैवेद्याबद्दल.

४५० तालीकोट येथील जमीनदाराकडून श्री उमामहेश्वराकडे व गंगापुरीतील देव–ब्राम्हणांकडे.

बकी १६६५ इतर ठिकाणीं खालीं लिहिल्याप्रमाणें:–

पंढरपूर येथील श्री पंढरीनाथास पुजा नैवेद्यास ४५० मौजे निंबोणी परगणे करजगी प्रांत विजापूर.

२५ मौजे गोपाळपूर नजीक पंढरपूर श्री देवाकडे फुलें तुळशीबद्दल.

१२०० श्री पंचवटी नाशिक येथील श्रीदेवाकडे.

वाई येथील काजी यांची इनाम जमीन खुष खरेदी घेऊन देवालये श्री विष्णु व श्री लक्ष्मीचे बांधिली व ब्राह्मणास घरें बांधून देऊन धर्मपुरीं पेठ नवी बसविली. सोमवारचा बाजार भरवून ते उत्पन्न श्रीं देवाकडे नेमून दिले.

गंगापुरी नवी बसविली. देवालय व वाडा बांधिला कांहीं जमीन खरेदीं व कांहीं मोबदला देऊन वसाहत केली. दुकानाचा हशील श्रीकडे नेमून दिला.

कुरणे ब्राह्मणाकडे (डोंगर धामणा सदरहु केंजळ गांवचे सनदेत आहे.)

मौजे कणुर येथील कुरण श्री काशीविश्वेश्वराकडील देवाच्या गाई व ब्राह्मणाकडे.

वाडा धर्मपुरी रामचंद्रराव साठे यांस दिला. धर्मपुरी पागा.

पुणे—जुना वाडा पेठशनवार सरकारचे वाड्यानजीक. पेठ शिवपुरी नवा वाडा व पागा वाड्या नजीक व पेठेत घरें. पुणे पेठ शिवपुरी व बुधवार, शुक्रवार व शनवार येथें कर्जाऊ ऐवजांत घरें चालत आहेत.

मौजे भाववडे येथें वाडा होता तो मोडला. जागा आहे. नाशिक पंचवटीस वाडा व त्र्यंबकेश्वरास वाडा, सातार्‍यास वाडा, तासगांव वाडा, अनंतपूर किल्ला व वाडा, अथणीत वतनी वाडा, क्षेत्रपंढरपुरी वाडा, तालीकोट वाडा, मौजे वाल्हे तर्फ निरथडी वाडा, पागा मौजे दिंगेरी, मौजे कळवडे घर, आंबेगांव बंगला, मौजे मांडवगण पागा. "

लक्ष्मण शामराव रास्ते यांनीं ता० १४ जुलई सन, १८९२ इसवी अर्ज केला वरून, इनाम कमिशन कडूल ' ए ' ह्या शिक्याची जुन्या जहागिरीची नक्कल, ता० १७ जानेवारी सन १८९३ इसवी देण्यांत आली.

सदरहु नक्कल मधील मजकूर अवतर्ण चिन्हांत असलेला तोच होय.

हल्लीं माधवराव आनंदराव उर्फ रावसाहेब रास्ते हे अज्ञान आहेत. बहुतेक पुणे मुक्कामी आपले वाड्यांत रहातात. हल्लीं उत्पन्न अदमासे वीस हजार असून हे फर्स्टक्लास सरदार आहेत. यांचा वाडा वाई येथें गणपती आळीत आहे. " या वाड्याची अशी हकीकत आहे कीं, आनंदराव भिकाजी यांनीं गाडगीळ यांचे कडून वाडा बांधण्यास जागा घेतली व या जागेचे मोबदला मोती बागेजवळील जागा दिली. वाडा बांधून झाल्यावर आनंदराव यांनीं आपला पहिला वाडा साठे यांना देऊन, आपण या नव्या वाड्यांत राहिले "
श्रीमहाविष्णु व श्रीलक्ष्मी या देवस्थानाची व धर्मपुरीतील समस्त ब्राह्मण वृंदाचीं वर्षासनें वगैरे व्यवस्था वरील फर्स्टक्लास सरदार रास्ते यांचे कडेच आहे.

गणदतराव भिकाजी यांचे--वंशज आपले वाड्यांत (गोशाळेंत) असतात यांचे नांव कृष्णराव गोविंदराव उर्फ बाळासाहेब रास्ते हे ही अज्ञान आहेत. याना अदमासें पांच--सहा हजारांचे उत्पन्न असावे असें वाटतें श्री थोरला गणपती व श्री काशीविश्वेश्वर या देवस्थानाची सर्व व्यवस्था यांचेच कडे आहे.

श्रीमंत साठे यांची माहिती.

ह्या घराण्याचे मूळ पुरुष जि. रत्नागिरी ता. संगमेश्वर मु. बुरबार येथें रहात असत. माहादेव जिवाजी साठे हे तेथील महाजन होते. यांना सुमारे ३०० रुपायांचे उत्पन्न होतें. यांना भाऊबंदानीं मंत्रप्रयोगानें मारिले अशी तोंडी माहिती मिळते. यांस दोन मुलगे आप्पा व विनायक; आप्पाजी महादेव यांचा जन्म शके १६७० यांचे वडील वारल्यानंतर या बंधूद्वयास घऊन यांच्या मातोश्री, जि. रत्नागिरी, ता. खेड, मु. सुसरी येथें येऊन गरिबींत काल क्रमण करीत होत्या. पुढें आनंदराव भिकाजी रास्ते यांनीं आपली मुलगी आप्पा यांस दिली. या मुलींचे सासरचे नांव गोपिकाबाई असें होतें. रास्ते यांचे उत्पन्न कर्नाटकांत होतें, तिकडे आप्पा सुरसुभे झाले ते वेळीं सालिना तनखा ३००० रु. मिळत असे. त्याचप्रमाणें यांचे बंधू विनायकराव यांसही २००० रुपये तनखा मिळत होता. रास्ते यांनीं आपल्या मुलीस आंदण दाखल, सुसेरीजवळ खार नांवाचा गांव आंदण दिला. त्याचे उत्पन्न सालिना ४०० रुपये येत असें. सदरहु गांव अद्यापी सांठे यांचे कडे चालत आहे. आप्पाजी यांनीं सुसेरीची खोती श्री. माधवराव बल्लाल पेशवे यांचे कडून शके १६९७ त संपादिली. यांनींच सुसेरीस व

खेडास वाडे बांधिले. हे मोठे कार्यदक्ष व व्यवहार चतूर होते हे अथणीहून—सुसेरीस जात असतां वाटेतच मृत्यू पावले. अद-मासें शके १७०९; यांचे चिरंजीव रामचंद्र आप्पाजी उर्फ बाबा-साहेब यांचा जन्म शके १६९८, आप्पाजी मृत्यू पावल्या नंतर रास्ते यांनीं रांमचंद्रराव यांस वाईस आणविले. पुढें कर्नाट-कांतील कोकटनूर हा गांव शके १७३२ पर्यंत चालत होता. खर्ड्यांचे लढाई नंतर श्री० सवाई माधवराव पेशवे यांनीं२००० चा सरंजाम साडेतीन वस्त्रें, शिरपेंच राव हा किताब व पालखीचा मान दिला. पुढें श्री० बाजीराव रघुनाथ यांनींही आंबेगांवी २३९० रु. जास्त नेमणूक करून दिली. सरदार रास्ते यांनीं आपला राहता वाडा रामचंद्रराव यांस दिला आणि स्वतःचे शिवपंचायतन व त्याचे व्यवस्थे करितां वाई येथेंच अडीचशें रुपयांचें उत्पन्न करून दिलें. रामचंद्रराव यांनीं या वाड्यास लागूनच वाडा बांधिला. खर्च २९००० रु. लागला. रावबाजीच्या दुर्वर्तनास यांनीं मदत न केल्यामुळें, यांना व यांचे मामा माधवराव रास्ते, यांना कैद करण्यास धरणें आले तों सरदार रास्ते पळून गेले. त्यांचा वाडा जप्त केला. तेळीं बळवंतराव रास्ते, शामराव रास्ते आणि रामचंद्रराव उर्फ बाबासाहेब साठे या-सर्वांस कैद केलें होतें. शके १७२३–२४ मध्यें. तेव्हां यांचा सर्व सरंजाम जप्त केला. यांनीं वाई येथें घाटावर श्री रामेश्वराचें देऊळ, देवळाचे समोरील दोन कुंडें, सभोंवतालच्या नळ्या, म-धले मोठें कुंड, वरील बांध, बांधापासून दोन मोठ्या (नळ्या) एक थोरले कुंडांत सोडिली व दुसरी देवालयाचे मागें सोडिली आहे. नंदी व नंदीचे मागिल पटांगण थोरले सिंहासनापर्यंत,

श्री कृष्णाबाईचे देवळामागील अश्वत्थाचा पार, या पारावर पक्या विटांचें कुंपण केलें आहे. शिवाय दिपमाळ, हल्लीं दिपमाळीचा फक्त चौथराच कायम आहे. हें सर्व रामचंद्रराव ऊर्फ बाबासाहेब साठे यांनींच शके १७७१ त बांधिलें यांस खर्च अदमासें तीस हजार रुपये लागला असावा. यांनीं कोटीहोम केला होता. यांचे पहिले कुटुंबास नारायणराव, येसूबाई व बहिणाबाई अशीं तीन आपत्यें होतीं. येसूबाई सरंजामे याजकडे दिल्याहोत्या व बहिणाबाई सातारचे कान्हेरे यांजकडे दिल्या होत्या. यांचें दुसरें कुटुंब वेलणकर लेले यांजकडील होतें. बाबासाहेबांचा नियमितपणाबद्दल फार लौकिक होता. शिवाय हे शूर असून मोठे चाणाक्ष होते. यांचे मरण समयीं एकंदर उत्पन्न कोंकणांतील २००० रु. व वाई येथील १५०० रु. इतके असून शिवाय दागदागिने वगैरे सर्व इष्टेट मिळून सुमारे तीन लाखांपेक्षां जास्त इष्टेट होती. हे शके १७७३ त मृत्यू पावले. यांचे पुत्र नारायणराव शके १७२६ त जन्मले होते. बाबासाहेब वारल्यावर सर्व मालकी यांचेकडे होती. परंतु यांचे मातृ भक्तीचा व भोळेपणाचा फायदा घेऊन यांच्या सावत्र मोतोश्रीनीं सर्व इष्टेट नाहींशीं केली. ज्यांचे ज्यांचे जवळ दागदागीनें वगैरे माहेरी पोंचते करण्यास दिले होते, त्या सर्वांनीं ते मधल्यामध्येंच गिळंकृत केलें. यामुळें यांच्या घराण्यावर मातबर झालेले लोक येथें आहेत. नारायणराव यांचे वेळेस बरीच अन्नशांती झाल्याबद्दल महशूर आहे. यांनीं धर्मपुरीचे घाटावर शके १७७४ त धर्मशाळा बांधिली त्यास खर्च १०००० रु. लागला. यांचे पहिले कुटुंब मर्ढेकर गोळे याजकडील होते. ह्या वेड्या झाल्यामुळें, दुसरे लग्न

केलें. परंतु हे कुटुंब लौकरच वारलें म्हणून तिसरें कुटुंब बाळकृष्णपंत तात्या लवाटे यांची मुलगी केली. या कुटुंबास मुलें झाली परंतु जगलीं नाहींत म्हणून, यांनीं कुटुंबाचे बंधू आप्पाजी बाळकृष्ण लवाटे यांचा मुलगा विष्णु यास दत्तक घेतला याची मुंज यांनींच केली. नांव माधवराव असें ठेविले पुढें लवकरच नारायणराव हे अर्धांगाचे विकारानें शके १७९९ त वारले. मरण समयीं स्थावर इष्टेटीशिवाय जंगम इष्टेट थोडीच शिल्लक होती. शके १७८३ त माधवराव यांचा जन्म झाला हे अज्ञान असल्यामुळें यांची सर्व व्यवस्था मातोश्री व आप्पाजी बाळकृष्ण लवाटे हे पाहत होते. पुढें यांचे कारकीर्दींत बेरेंच बखेडे उत्पन्न झाले. यांनीं आपले खोतीचे गांवची वाटणी केली हे येथील म्युनिसिपालिटींचे चेअरमन होते. पहिले कुटुंब वारल्यामुळें दुसरे कुटुंब पुण्याचे भिकाजी गोविंद जोगळेकर यांची मुलगी केली. दुसरे कुटुंबापासून यांना आपत्यें तीन झाली. भार्गवराम, अंबुताई व भिमाबाई. यांना शके १८२२ त वाताचे विकारानें एकाएकी देवाज्ञा झाली. यांचे चिरंजीव भार्गवराम उर्फ बाळासाहेब यांचा जन्म शके १८१३ त झाला. म्हणजे बाळासाहेब यांचे वय हल्लीं १९ वर्षांचे आहे. यांचे शिक्षण थोडें इंग्रजी झाले आहे. हे धर्माभिमानीं असून मोठे करारी आहेत. हे बहुतेक येथेंच असतात. हल्लीं यांचे उत्पन्नः—सुसेरी खोती गांव १९०० रु. खार इनाम गांवचे ४०० रु. वाई येथील रास्ते याजकडील २५० व इतर १२०० मिळून ३३५० रुपयांचे आहे.

श्रीमंत गाडगीळ यांची माहिती.

ह्या घराण्याचा मूळ पुरुष रामाजी दामोदर मूळ गांव वेळ-

णेश्वर प्रांत कोंकण. वेळणेश्वर येथें " श्री वेळणेश्वराचे " देवालय आहे. रामाजी दामोदर हे ' वेळणेश्वराचे ' भक्त होते. यांची परंपरा जोशीपणाची वृत्ती होती. रामाजी दामोदर चतुर व पराक्रमी असल्यामुळें जोशीपणाचे वृत्तीला कंटाळून सातारा येथें आले. अशी म्हण आहे कीं, " भाग्योदय होण्याची वेळ आली म्हणजे युक्ती सुचतें " आपले मूळगांव सोडते वेळीं ' श्रीवेळणेश्वराची ' प्रार्थना करून म्हणाले कीं, मी देशावर जात आहे, आपले कृपेकरून माझा उत्कर्ष झाल्यास " देवालयाचा जिर्णोद्धार करीन. "

रामाजी दामोदर खांद्यावर पडशी टाकून साताऱ्यास आले त्या वेळीं श्रीछत्रपती शाहू महाराज यांची कारकीर्द सुरु होती. रामाजींनीं प्रथम कारकूनी करितां करितां पुढें हुजुरचें सान्निध्य राहिले. एके वेळीं शाहू महाराज वाई मुक्कामी महापरवणींचे दिवशीं स्नानानिमित्य आले. त्या वेळीं रामाजी दामोदर हे बरोबर होतेच. स्नानाचे वेळीं शाहू महाराज यांचे मनांत एक चाहूर जमीन ब्राह्मणास दान द्यावी असें आलें. महाराजांचा हा मानस जाणून, रामाजी दामोदर यांनीं दाम घेण्याची आपली इच्छा दर्शविली; तेव्हां रामभट गाडगीळ यांचे हातावर एक चाहूर जमीनीचे दान (उदक) सोडले. ती जमीन कृष्णा तटाकची दिली. हल्लीं या जमिनींत दोन आळ्यांचा म्हणजे मधली आळी व गणपती आळीचा समावेश होतो. या दोन्ही आळ्यांचे मिळून पूर्वीचे नांव **सत्यनाथपुरी** होते. या जमिनींत कोणी एक ' सत्यनाथ ' नांवाचा बैरागी रहात होता. त्यावरून रामाजींनीं ' सत्यनाथ-

पुरी ' हे नांव प्रसिद्ध केलें. या जमिनींची चतुःसिमा—पूर्वेस घाट दक्षिणेस कृष्णाबाई, पश्चिमेस गंगापुरीतील नाला, व उत्तरेस इतर जमिनी आहेत.

रामाजी दामोदर गाडगीळ यांनीं शाहूमहाराज यांचे सान्निध्य राहून मोठ्या हुशारीनें कारस्थानें करून अक्कलकोटची दिवाणगिरी संपादिली. अशा रीतीनें आपला उत्कर्ष झाला हे जाणून पूर्वस्थिति मनांत आणितां एकदम वेळणेश्वर मुक्कामीं केलेल्या नवसाची आठवण झाली. तेव्हां श्रीवेळणेश्वर देवालयाचा जिर्णोद्धार केला. यानंतर हे कांहीं दिवसांनीं वारले. पुढें यांचे चिरंजीव आप्पाजी हे दिवाणगिरीचें काम करूं लागले. आप्पाजीराम यांना भिकाजी शामजी यांनीं आपली मुलगी सगुणाबाई दिली. अर्थात आप्पाजीराम हे श्रीमंत नानासाहेब यांचे साडू झाले. आप्पाजीराम यांनीं पुणें येथें शनवारांत मारुतीजवळ असलेला वाडा बांधिला. वाईचे दक्षिणेस गोडवली येथील "श्रीतपनेश्वराचे देवालय बांधिलें, आणि गणपती आळीचे घाटावरील श्रीगंगारामेश्वर व बगीचे पटांगण याचे मधील ११२—९ लांब व ३७—७ रुंद असे जें पटांगण आहे तेंहीं आप्पाजीराम यांनीं बांधिलें. तपनेश्वराचे स्थान फार जुनें असल्याचें श्रीकृष्णामहात्म्यावरून सिद्ध होत आहे. आप्पाजीराम व अक्कलकोटकर यांचे कांहीं कारणानें वितुष्ट आल्यामुळें, आप्पाजीराम पुणें येथें आपले वाड्यांत राहिले. ही हकीगत श्रीमंतांना समजली. तेव्हां श्रीमंतांनीं अक्कलकोटकर व आप्पाजीराम यांचा समेट केला. पुढें कांहीं वर्षांनंतर प्रकृति अस्वस्थ झाल्यामुळें आप्पाजीराम पुणें मुक्कामीं येऊन राहिले. प्रकृती जास्त बिघडल्यामुळें शके १६९६ त आपले वाड्यांतच

वारले. तेव्हां यांचें कुटुंब सगुणाबाई ह्या सती गेल्या. यांचे पुत्र काशीराव हे पुढें दिवाणगिरी करूं लागले. परंतु अक्कलकोटकर यांना दिवाणांचे सल्यानें वागण्याचा कंटाळा आल्यामुळें, दिवाणगिरी सोडण्याविषयीं काशीराव यांस अक्कलकोटकर बोलेल. तेव्हां काशीराव यांनीं आम्हीं आपला हक्क सोडणार नाहीं असें उत्तर दिलें. हें प्रकरण श्रीमंतापर्यंत गेले तेव्हां श्रीमंत पेशवे सरकार यांनीं, काशीराव यांना दिवाणगिरीचा हक्क सोडण्याबद्दल वंशपरंपरेचे इनाम देवविलें. तेव्हां काशीराव यांनीं दिवाणगिरीचा हक्क सोडला.

दिवाणगिरी सोडल्यावर काशीराव वाई मुकामी राहूं लागले. त्यावेळीं जवळ जवळ वीस पंचवीस हजारांचे उत्पन्न होतें. यांचे पुत्र अमृतराव. पुढें अमृतराव यांचे पुत्र दोन; आप्पाजीराव व गणपतराव. आप्पाजीराव यांस पुत्र दोन; गंगाधरराव व रामचंद्रराव. आणि गणपतराव यांस पुत्र पांच अमृतराव, सितारामपंत, विनायकराव, नारायणराव व दत्तोपंत.

काशीराव यांचेच वेळीं, श्रीमंत बाजीराव यांचे कारकीर्दींत बरेंचसे उत्पन्न जप्त झाले असें समजतें. यांचेकडे माजिस्ट्रेटचा अधिकार होता. तो अधिकार आप्पाजीराव अमृत यांचे पर्यंत चालत होता. गाडगीळ यांचे,मधले आळीत एक गणपतीचे लहानसे देऊळ आहे. शके १८०२ मध्यें यांचे पहिलें घर जळाले. त्यावेळीं यांची फार नुकसानी झाली. हे तर खरेंच; परंतु इतिहास दृष्ट्या ऐतिहासिक माहितींची फार नुकसानी झाली. कारण यांचे जवळ कागदपत्र पुष्कळ होते. हल्लीं जुन्या वाड्या पैकीं फक्त दरवजा तेवढा शिलक आहे. आंतील सर्व वाडा नवा

बांधिला आहे. हल्लीं यांचे उत्पन्न इनामी व सावकारी वगैरे सर्व ७।८ हजारांचे असावें असें वाटतें.

श्रीमंत तात्यासाहेबपंत यांची माहिती.

जिवाजीपंत देशपांडे हे मूळ पुरुष वारल्यावर यांचे चिरंचीव मोरो हे अज्ञान असल्यामुळें देशपांडेपण भाऊबंदाकडे गेले. मोरो जिवाजी हे आपल्या वयाचे १६ वें वर्षीं पुण्यास गेले. त्यावेळीं श्री शिवाजी महाराज तेथें होते. रामचंद्र निळकंठ यांस भेटून महाराजाजवळ चाकरी मिळविली. पुढें सन १६७८ त मोरो जिवाजी यांनीं चंदनगडची फडणविसी व वैराट गडाची सबनिसी संपादन केली. १५० होन नेमणूक होती. यानंतर श्री शिवाजी महाराज वारले. नंतर संभाजी महाराज यास औरंगजेब यानें धरून हाल हाल करून मारिले. कांहीं वर्षांनंतर श्री शाहू महाराज दिल्लीहून सुटून आल्यावर साताऱ्यास गादीवर बसले. त्या वेळीं मोरो जिवाजी यांनीं किल्ल्यांचा बंदोबस्त चांगला ठेविला होता. ह्मणून वाई प्रांताचे देशपांडेपण व बंदोबस्ताचे काम दिले. या विषयींचे पत्र १७२० सालचे आहे. याच सालीं मौजे बिचुकले संमत वाघोली हा गांव इनाम पालखीचे खर्चास दिला याजबद्दल राजपत्रें आहेत. पुढें सोनके हा गांव सन १७२७ त इनाम दिल्याची राजपत्रें आहेत. राजाज्ञापद प्राप्त झाले. वाईची मामलत व तीन हजार नेमणूक सन १७३८ त मिळाल्या विषयीं राजपत्रें आहेत पुढें मोरो जिवाजी हे वारले. यांचे चिरंजीव हरीपंत व भवानीशंकर यांनाही देणग्या वगैरे पूर्ववत चालू होत्या. भवानीशंकर यांनीं श्री बाणेश्वराचे देवालय सन १७४२ त बांधिलें. यांनीं बरींच गांवें व जहागिरी

मिळविली. परंतु पेशवे यांनीं फक्त दहा हजारांचें उत्पन्न ठेवून बाकी सर्व सरंजाम जप्त केला. मात्र वाई प्रांताची मामलती नेमणूक चालविली. ही नेमणूक सन १८०४ दुसरे बाजीरावाचे कारकीर्दीपर्यंत चालली. पुढें भवानी शंकर वारले. पुढें यांचे चिरंजीव हैबतराव यांनाही वरील जहागिरी मिळाली. याप्रमाणें पुढें चालली. मूळ मोरो जिवाजीपासूनचे आठवे पुरुष विनायकराव अमृतराव उर्फ तात्यासाहेब पंत देशपांडे हे हल्लीं येथें आहेत यांचें घर रामडोह आळींत आहे. यांना दहा हजारांची जहागीर आहे. श्री बाणेश्वराचा उत्साह वगैरे सर्व व्यवस्था यांचेच कडे आहे. यांना एकच पुत्र आहेत. त्यास खंडेराव विनायक ऊर्फ रावसाहेब असें म्हणतात. तात्यासाहेब यांची प्रकृती गेल्यावर्षीं फारच बिघडली होती. परंतु श्रीच्या कृपेनें हल्लीं प्रकृती चांगली झाली आहे. यांचा स्वभाव विनोदी असून व्यवहारदक्ष आहेत.

श्रीमंत शेखमिरे यांची माहिती.

शेख मिरा वाईकर हा वाई येथील शेखमिरे या घराण्याचा मूळ पुरुष होय. शेखमिरा हा सातारा येथील महाराज सरकार यांचे फौजेतील पायदळावरील लहानसा अम्मलदार होता. शाहू महाराज औरंगजेब याचे कैदेतून सुटून परत आल्यावर शेखमिरा यानें शाहू महाराज यांची बाजू स्विकारली. याबद्दल शाहू महाराज यांनीं शेखमिरे यांस पसरणी गांव इनाम दिला. शिवाय दरमहा १८०० शे रुपयांचा सरंजाम सुरू करून साठ स्वारांची मनसबदारी दिली, व त्याचे खर्चाकरितां ४००००रुपयांची नेमणूक करून दिली.

इ. स. १७०९ मध्यें शेखमिरा यांस पसरणी गांव इनाम

व दुसऱ्या नऊ गांवचा मोकासा मिळाला. इ. स. १७१९ मध्यें शेखमिरे यांचे एकंदर उत्पन्नांत पसरणी गांव, वाई येथील जमिनी, एरंडोल व दर्यापूर या महालाचा मोकासा याचा समावेश होता. इ. स. १७३२ पर्यंत यांत कांहीं फेरबदल झाला नाहीं. इ. स. १७३४ मध्यें शेंदुरजणे गांवी पंधरा बिघे जमीन देवस्थान इनाम ह्मणून मिळविली. शेखमिरा हा इ. स. १७५४ चे सुमारास वारला असावा. याचा दत्तक मुलगा खानमहंमद यांजकडे सर्व इनाम गांव व मोकासा अम्मल चालूं झाला.

इ. स. १७६३ सालच्या श्रीमंत पेशवे सरकारच्या डायरीवरून ह्या वरील देणग्या खानमहंमदकडे चालू ठेवण्याबद्दल हुकूम गेल्याचे दिसून येते. इ. स. १७८९ चे सुमारास खानमहंमद वारला असावा. याचा मुलगा शेखमिरा याजकडे पूर्वीं प्रमाणें वरील इनाम व सरंजाम सुरूं ठेवण्याबद्दल श्रीमंत सरकार कडून हुकूम गेल्याचे त्या सालचे डायरी वरून दिसते.

इ. स. १८०६ मध्यें शेखमिरें यांचें इनामांत करजखोप येथील कांहीं जमिनीचा समावेश झाला होता. इ. स. १८१८ मध्यें इंग्रजी अम्मल सुरूं झाला. त्यावेळीं मुंबईचे पहिले गव्हर्नर "माउन्टस स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनीं असें ठरविलें होते कीं, निजाम सरकारच्या हद्दीतील जहागिरी खेरीज शेखमिरे यांच्या जहागिरी वंशपरंपरेच्या असाव्यांत.

इ. स. १८२० मध्यें कंपनी सरकार बरोबर तहनामा होऊन या जहागिरी कायम झाल्या. इ. स. १८२८ साली शेखमिरा वारला. त्यावेळीं सातारा येथील रेसिडेंट साहेबांनीं मुंबई सरकारास खालील आशयाचा मजकूर कळविला होता. "शेखमिरे

यांना खानदेश जिल्ह्यांतील एरंडोल महालाचा मोकासा अम्मल जहागिर असून त्यांनीं लहानशा घोडेस्वारांच्या पतकानिशीं सातारचे माहाराज यांची नोकरी केली आहे. ह्या शेकमिरे यांस खानमहमद व अब्दुल उर्फ गुलाम कादर असे दोन मुलगे आहेत. पैकी वडील खानमहंमद हा जहागिरीचा वारस आहे. सातारचे महाराज यांनीं खानमहंमद कडे जहागिरी सुरू केली. " ही गोष्ट मुंबई सरकारास पसंत झालीं. या प्रमाणें खानमहंमद हा इंग्रजी अम्मलांतील व सातारचे माहाराज यांचे अम्मलांतलि आपल्या सर्व जहागिरीचीं वहिवाट करूं लागला.

खानमहंमद हा १८३९ चे सुमारास अतीशय कर्ज बाजारी झाला. एरंडोलचा सरंजाम सरकारनें जप्त केला. ग्रॅांटडफ साहेबांनीं कांहीं सावकारांची व्यवस्था वगैरे करून हमी घेतली होती. सातारा अम्मलांतील वसुलांतून त्यांना पोंच होत असें परंतु तो वसूल स्वारांच्या खर्चाकडे जाऊं लागल्यामुळें खानमहंमह वर सावकारांनीं फिर्यादी लाविल्या. आणि एरंडोल वरील जप्ती खुली झाल्या बरोबर सावकारांच्या टांचा त्यावर बसल्या. शेवटी सरकारनीं सावकाराचे देण्याची व्यवस्था करून खानमहंमद व त्याचे भावास नेमणूक करून दिली.

खानमहंमद व गुलामकादर याजमध्यें वाटणीचा दावा बरेंच वर्षं चालून शेवटीं इ. स. १८६१ मध्यें गुलाम कादर यांस बऱ्यांच मिळकती पैकीं वाटणी मिळाली. इ. स. १८५४ त खानमहंमद यानें जवळ केलेला एक मुलगा सुलतान सानी म्हणून होता. त्याचे नांव खानमहंमद यानें आपलें जागीं जहागिरीवर दडपून दिलें. व आपण मक्केला गेला. परंतु ही फसवेगिरी १८५७ सालीं सरकारच्या

नजरेस आली. खान महंमदाचें नांव सरदाराचे यादींतून कमी केलें, व वंशपरंपरेचे सरंजाम तहाहयात ठरविण्यांत आले. पुढें खान महंमदचें नांव सरदारचे यादींत पुन्हां घालण्यांत आले. गुलाम कादर याची मुलगी बिसमिल्ला बेगम इला शेख अजीमोद्दिन शेखमिरा व शेख गुलाम जिलाणीसाहेब असे दोन मुलगे झाले पैकीं हल्लीं, वडील मुलगा मयत असल्यामुळें लहान मुलगाच सर्व जहागिरीचा मालक आहे. हे बहुतेक पुण्यासच रहात असतात यांचा जुना वाडा वाई येथें आहे. यांना नबाब गुलाम जिलाणी साहेब जहागिरदार वाईकर असें म्हणतात. यांना वीस–बावीस हजारांची जहागीर असावी असें वाटतें.

वाईतील इतर सर्व माहिती.

येथें मामलेदार कचेरी, मुनसफ कोर्ट, फौजदार कचेरी, म्युनिसिपल ऑफिस, दवाखाना व सहा शाळा आहेत. पैकीं मुलींच्या दोन व मुलांच्या चार आहेत. मुलींच्या शाळा–मधले आळींत वैद्य यांचे वाड्यांत एक व दुसरी रविवार पेठेंत वाकडे यांचे वाड्यांत. मुलांच्या शाळा--१ नंबरीची–पुला पलीकडे आहे. दोन नंबरची–धर्मपुरींत नानासाहेब रास्ते यांचे वाड्यांत. तीन नंबरची–उर्दु जिम्मा मशीदीजवळ. चार नंबरची–मधले आळींत नातूंचे वाड्यांत. दवाखाना मधले आळींत फडके यांचे वाड्यांत. म्युनिसिपल ऑफिस–गणपती आळीत व चावडी रविवार पेठेत आहे. धर्मपुरीतील साठे यांचे दुसरें वाड्यांत एक इंग्रजी शाळा आहे. हिला ग्रँट मिळत आहे. म्युनिसिपल ऑफिसाजवळ ने. ज. लायब्ररी आहे. छापखाने तीन आहेत—श्रीकृष्ण मुद्रणालय यांत वे. शा. सं. काशीनाथ शास्त्री लेले यांचे 'धर्म'

निघते. हा छापखाना सरदार रास्ते यांचे वाड्यांत आहे. मोद-वृत्त छापखाना मधले आळीत आहे. यांत मोदवृत्तपत्र व पुराण-ग्रंथ निघतात. तिसरा विराजवैभव छापखाना हा मधले आळीत आहे. यांत ' वृत्तसार ' पत्र निघते. आणि मकरंद या नांवाचे एक मासिक पुस्तक मोदवृत्त छापखान्यांत रा. न. ना. पटवर्धन हे काढित असतात.

येथील म्युनिसिपालिटीचे १९०९ ते १० सालाचे उत्पन्न १४९८७८१४ खर्च १४३९२८८८१ कमेटीनें गांवाचे सहा भाग केले आहेत याला वार्ड असें म्हणतात. नंबर १ वार्ड—नांव्याची वाडी व गंगापुरी. नंबर २ वार्ड—मधली आळी व गणपती आळी. नंबर ३ वार्ड—धर्मपुरी. नंबर ४ वार्ड—रविवार पेठ. नंबर ५ वार्ड—रामडोह आळी व ब्राह्मणशाई. नंबर ६ वार्ड—साके-वाडी व सिन्नसवाडी. गांवची लोक संख्या गेल्या १९०१ चे खाने-सुमारींत १३९०७ होती. हल्लीं लोक संख्या अदमासें आठ हजार होईल. प्रेसिडेंन्ट निवडून देण्याचा हक्क यांचसाली मिळाला आहे. येथें दर सोमवारीं बाजार भरतो. बाजारांस पंचक्रोशींतील लोक येतात.

श्रीकृष्णाबाईचा उत्साह प्रत्येक घाटावर होतो, परंतु ब्राह्मण-शाई घाट, रामडोहघाट व भीमकुंडघाट हे तीन उत्साह नियमित होत नाहींत. फक्त धर्मपुरी, गणपती आळी, मधली आळी व गंगापुरी या चार घाटावर मात्र श्रीकृष्णाबाईचे उत्साह दरवर्षीं नियमितवेळीं होतात. त्यांत धर्मपुरीचे घाटावर श्रीची मूर्ति माघ शु॥ १० ला बसते. मंत्रजागर व किर्तनें होऊन माघ शु॥ १४ ला मुक्तद्वार होतें. पौर्णिमेस रथोत्साह होऊन माघ वद्य प्रतिपदेस

ळित होतें. **गणपती**आळीचे घाटावर माघ व॥ प्रतिपदेला श्रीची मूर्ति बसते. मंत्रजागर व कीर्तनें होऊन माघ व॥ ९ ला मुक्तद्वार होतें. नंतर छबिना वगैरे होतो. **मधल्या** आळीचे घाटावर माघ शु॥ ९ ला श्रीची मूर्ति बसते. मंत्रजागर व कीर्तनें होऊन माघ शु॥ ८ ला मुक्तद्वार होतें. **गंगापुरीचे** घाटावर फाल्गुन शु॥ ६ ला श्रीची मूर्ति बसते. मंत्रजागर व कीर्तनें होऊन माघ शु॥ १० ला मुक्तद्वार होतें. आणि माघ शु॥ १२ छबिना होतो.

रामडोह आळीचा, धर्मपुरीच्या घाटाचा व श्री व्यंकोबाचा असें तीन रथ आहेत. इतर आळीत नाहींत. शिवाय श्री वाईचे दक्षिण बाजूस जो डोंगर आहे त्यावर सोनजाई–भोनजाई देवीचे स्थान आहे. या देवीचे दर्शनास वाईतील अबालवृद्ध " नवरात्रांत " जातात.

येथें कार्तिक पौर्णिमेस बाणांची लढाई फारच प्रेक्षणीय होते. या लढाईत किती एक लोक भाजतात परंतु श्री कृष्णाबाईचे कृपेनें कोणी दगावत नाहींत. धर्मपुरीतील श्री व्यंकोबाचा नवरात्रांत उत्साह होतो, तेव्हां श्रीव्यंकोबास निरनिराळी वाहनें देतात ती पाहण्यासारखी असतात. धर्मपुरींत श्री महाविष्णू व श्री लक्ष्मी या दोन्ही देवळापुढील रस्ता फरशीचा होता. हल्लीं फरशीवर खडी वगैरे घातल्यामुळें मूळ फरशी दिसत नाहीं. मात्र (फरसावर) हा अपभ्रंश शब्द परिपाठांत राहिला आहे. या फरसावर सराफ व सोनार यांची दुकानें आहेत.फरसावर दर मंगळवारी लुगड्यांचा बाजार भरतो.या आळींत कापडाची दुकानें, भांड्यांची दुकानें, किराणे जिन्नसांचीं दुकानें, जिनगर, कासार, पटवेकरी व स्टेशनरी वगैरे सर्व दुकानें आहेत. शिवाय श्री रामाचे मंदिरा-

पासून ते श्री कृष्णाबाईचे रथापर्यंत बहुतेक हलवायांचींच दुकानें आहेत. सर्व मालांचीं दुकानें आळींत असल्यामुळें इतर सर्व आळ्यापेक्षां या आळींत दिवसभर माणसांची रहदारी जास्त असते. मामलेदारकचेरी, फौजदारकचेरी, पोष्ट ऑफिस व एक नंबरची शाळा वगैरे पुलाचे पलीकडे असल्यामुळें आणि माहाबळेश्वराकडून वाटारकडे जाण्याचा रस्ताही पुलावरील असल्यामुळें पुलावरून माणसांची व गाड्यांची रहदारी सारखी असते. त्यांत विशेषतः मे व आक्टोबर महिन्यांत—गव्हरनर साहेब, मोठमोठे अधिकारी, संस्थानिक, व्यापारी व सुखवस्तु वगैरे लोक महाबळेश्वरी हवा खाण्याकरितां जातात. त्या वेळीं या पुलावरून माणसें व गाड्या रात्रंदिवस जात असतात. या पुलावर पश्चिमेकडे तोंड करून उभें राहिलें असतां समोर सह्याद्रीची रांग, कमळगड व उत्तरेस पांडवगड वगैरे उत्तम दिसतात. तसेंच पूर्वेस तोंड करून उभें राहिलें असतां समोरील डोंगराच्या रांगेचे शेवटीं जरा दक्षिण बाजूस चंदन वंदन व दक्षिण दिशेस असलेला वैराटगड हे किल्लें दिसतात.

येथून मोतीबाग १ मैल आहे. येथें सरदार रास्ते यांनीं एक प्रशस्त व हवाशीर बंगला बांधला आहे. याचे काम प्रेक्षणीय आहे. याच्या पुढें कारंजी असून तीं फार उंच उडतात येथें खजिन्याची विहीर फार भयंकर आहे. हा मोतीबाग ह्मणजे सरदार रास्ते यांचे विलासमंदिरच होतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

मोतीबागेपासून पुढें १ मैलावर बोपर्डी येथें श्रीभीमाशंकराचे स्थान आहे. हे देवालय लहान असून त्याचे पुढें दोन कुंडे आहेत.

व गाभाऱ्यांत पिंडीच्या जवळ एक लहानसे कुंड—तांब्या भरून काढण्याजोगे आहे. या कुंडांत उन्हाळ्याच्या दिवसांशिवाय इतर दिवसांत फार चांगले पाणी असतें.

वाईचे उत्तरेस जी सुलतान टेकडी आहे. ती जमिनीचे सपाटीपासून अदमासें २०० फूट उंच आहे. या टेंकडीवर एक मुसलमानाची मशीद आहे त्या मशिदीचे पुढें शहासरीफ-कुरताल यांचे कबरस्थान आहे.

आतां येथील कांहीं प्रसिद्ध झालेल्या व्यक्तींची त्रोटक माहिती देतोः—

याच क्षेत्रांतील जगद्गुरु पीठावर तीन आचार्य बसले. संकेश्वर पीठावर गिजरे या आडनांवाचे व हल्ली विद्यमान असलेलें वे. रामभटजी शेंडे असे दोन आचार्य बसले व मध्वाचार्यांचे गादीवर सामक या आडनांवाचे आचार्य बसलें होतें.

सिद्धपुरुष अप्पा दीक्षित करंदीकर हे कर्ममार्गी व सर्वविद्या पारंगत असून मोठे भगवद्भक्त होते. यांनीं अग्निहोत्र घेतलें होतें. या ब्राह्मणाची योग्यता जाणून श्रीमंताकडून प्रतीवर्षी १२०० रुपयांची संभावना होत असे. यांच्या तपःसामर्थ्याच्या गोष्टी पुष्कळ आहेत. परंतु त्यांतील एक अबालवृद्धास माहित असलेली येथें देतोंः—सरदार रास्ते यांचे घराण्यांतील एका मुलाचें लग्न त्यांच्या बरोबरीच्या घराण्याशीं होइना. याचें कारण मुलाचे पायावर कोड होतें. असो, या मुलाचे वडिलांनीं, अप्पा दीक्षित यांना मुलबिद्दल मागणी केली. तेव्हां अप्पा दीक्षित म्हणाले कीं, आपण गृहस्थ व आम्ही भिक्षुक असून गरीब आहोंत. तेव्हां आह्मांला हें खरें वाटत नाहीं. त्यांनीं फारच आग्रह केला तेव्हां

मागणीं कबूल केली हीं हकीकत अप्पांचे कुटुंबास व शिष्यांस समजतांच त्यांनीं मुलाचा दोष सांगून ही मागणी नाकारण्याबद्दल आग्रह केला. परंतु एकदा होय म्हटल्यावर पुन्हां नाहीं असें खोटें बोलणें आमचेकडून होणार नाहीं असें अप्पांनीं सांगितलें. ठरल्याप्रमाणें लग्नाचे तयारीस सर्व लागले. रात्रौ सिमांतपूजन समयीं वराचे पाय धुतल्यावर अप्पांनीं आपलें आंगवस्त्रानें वराचे पाय पुसून वस्त्र काढलें तों पायाचें कोड एकदम नाहींसें झालेलें सर्वांच्या दृष्टीस पडलें. यांचे पट्टशिष्य बाबुकाका लेले व काशीनाथ नाना अभ्यंकर हे मोठे विद्वान् होते. बाबूकाका लेले यांचे पणतू येथील प्रसिद्ध भाऊशास्त्री लेले हे होत. काशीनाथ नाना अभ्यंकर यांचे पणतू येथें जगदीश शास्त्री या नांवानें प्रसिद्ध होते. अप्पा दीक्षित यांचें घर गणपती आळींत आहे. यांचे वंशज वे. दिनकर दीक्षित करंदीकर येथें आहेत.

वे. शा. सं. महादेवभट बिन रामभट गद्रे यांचा जन्म शके १७५३ हे लहानपणापासून खोडकर वगैरे नसल्यामुळें यांचे वडीलांनीं पांचवे वर्षीं यांचे उपनयन केलें. हें थोडक्याच काळांत सर्व वेदांनीं परिपूर्ण झालें. नंतर यांचा विवाह झाला. हे मोठे बुद्धिमान असल्यामुळें व्याकरशास्त्र, वैद्यशास्त्र, सभाष्य, प्रतिशाख्य, नवशिक्षा व ज्योतिषशास्त्र इतकें आध्ययन केलें. यांनींच भाष्यानुसारिणी लक्षणचंद्रिका नांवाचा ग्रंथ केला. या ग्रंथाचें महात्म्य काशीसारख्या क्षेत्रांतही वाढलें असें ह्मणतात. यांनींच हौत्रज्योत्स्ना नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. यांत हौत्राबद्दलचा सर्व विचार आहे. या प्रमाणें तीस वर्षाचे आंतच हें सर्वांग परिपूर्ण झालें. यांस नानासाहेब पंतसचीव भोरकर व येथील प्रसिद्ध अ-

प्पासाहेब साठे यांनीं सन्मान पूर्वक शालजोड्या दिल्या. यांस येथील प्रसिद्ध भाऊसाहेब दीक्षित पटवर्धन यांचा आश्रय होता.

ब्रह्मीभूत कृष्णंभट बिन भीमभट लेले यांस तरुणपणींच अर्धांगाचा विकार झाला होता. परंतु ते पुढें चांगले बरे झाले. असें असून यानीं ब्रम्हचर्य आश्रमांत दिवस घालविण्याचा निश्चय केला. हे आपला बहुतेक वेळ स्नानसंध्येंत व अध्यापनांत घालवीत. यांचे विद्यार्थी वे. बापूभट रानडे, अपाभट रानडे व भाऊ शास्त्री लेले यासारखे आहेत. शके १८२३ त यांनीं संन्यास आश्रम घेतला. यांची समाधी सिद्धेश्वराजवळ आहे. यांनीं कधीही प्रतिग्रह केला नाहीं. हे विद्येविषयीं मोठी कळकळ बाळगणारे होते. यांचे पट्ट शिष्य वे. शा. सं. काशीनाथ वामन उर्फ भाऊशास्त्री लेले संपादक ‘ धर्म ’ यांना, द्वारकेचे श्रीमत् शंकराचार्य यांनीं, “ श्रौतस्मार्त धर्म मार्तंड ” ही पदवी दिली आहे.

वे. शा. सं. बाळंभट बिन रामभट रानडे, यांचा जन्म शके १७६३ यांचे नांव विष्णु असे ठेविले परंतु पुढें बाळभट या नामेंच प्रसिद्ध आहेत. यांनीं अध्ययन वे. कृष्णंभटजी रानडे यांजपाशीं केलें. नंतर वे. शा, सं महादेव भटजी गद्रे यांजपाशीं काव्य, जटादीविकृती. प्रतिशाख्य व शिक्षा यांचे परिशीलन केलें. नंतर यांनीं श्रौताचे अध्ययन केलें. प्रसिद्ध वे. शा. सं. गंगाधर शास्त्री दातार याजपाशीं धर्म शास्त्राचे अध्ययन केले. यांचा भाऊसाहेब विवलकर यांनीं चांगला सत्कार केला. प्रत्येक ठिकाणीं यज्ञ समारंभास यांना अमंत्रण असतें. यांचे घरीं वेद पाठशाळा आहे. ती चांगली चालली आहे. यांचा बहुतेक काल धार्मिक व्या-

संगांतच जातो हे बरेंच थकले आहेत. यांचे मुलगेही विद्वान आहेत.

रामशास्त्री कवीश्वर उर्फ भारतीबोवा—हे मूळ राहणार वाईचे, यांचे घर ब्राह्मणशाईत आहे. हे यजुःशाखेचे होत. मोठे विद्वान असून अग्निहोत्री होते. यांनीं संस्थान कुरुंदवाड येथें " अग्निष्ट होम " यज्ञ मोठ्या समारंभानें केला. हे पुराण सांगण्यांत फारच प्रवीण असून सर्व शास्त्रांत पारंगत होते. इंदूर संस्थानांतून यांना चांगला आश्रय होता. ह्याना कुटुंबे दोन होती. हल्लीं विद्यमान असलेले, चि० गणेश शास्त्री हे पहिल्या कुटुंबाचे होत. भारती बोवा यांना पैसा पुष्कळ मिळाला परंतु त्याचा व्यय सर्व धर्म कृत्याकडे झाला. हे नरसिंहवाडी येथे शके १८१९ माघ शु॥ द्वितीया रोजी मृत्यु पावले. यांचे चिरंजीव गणेश शास्त्री हेही अग्निहोत्री आहेत. शिवाय पुराण सांगण्यांतही प्रवीण आहेत.

मार्तंड बापूजी वाईकर यांची माहिती—मोरेश्वर रामचंद्र उर्फ बापूजी वाईकर उपनांव साळवेकर वृत्ती भिक्षुक घर ब्राह्मणशाईत. हे आपले वयाचे १८ वें वर्षी नागपूरास गेले. त्या वेळीं नागपूर येथें भोसलें यांचे वर्चस्व होते. नागपूर येथें भिक्षुकी करून, दाजीसाहेब राजोपाध्ये यांच्या आश्रयानें रहात होते. राजोपाध्ये यांचे आश्रयानें, भोसले सरकारचाही यांना आश्रय मिळाला होता. येथील वेदशाळेचे मूळ उत्पादक हेच होत. पूर्वीचे काळची भिक्षुकी ! मग काय विचारतां ! भिक्षुकी वृत्तीला १७।१८ वर्षे होतात न होतात तों बापूजी थोडीशी सावकारी करूं लागले. यांना पांच मुलगे व तीन मुली. पैकीं मार्तंडराव हे हल्लीं आहेत. यांचा जन्म शके १७८२ त झाला. बापूजी हे आपले

वयाचे ७४ वे वर्षी कार्तिक शुा ३ शके १८१९ त मृत्यु पावले. ह्यांचीं वागणूक बालबोध असून धार्मिकही होती. यांचे चिरंजीव मार्तंडराव हे कांहीं दिवस वकीली करीत होते. परंतु हल्लीं वकीली सोडली आहे. फक्त सावकारी करीत असतात. विशेष लिहिण्याचे महत्व हे कीं मार्तंडराव यांचे वडील अल्पवयांत एका लोट्यासह नागपूरास गेले होते; असें असतां हल्लीं मार्तंडराव पूर्व पुण्याईमुळें जवळ जवळ एक लाख रुपयांची असामी होऊन बसली आहे. मार्तंडराव याना पहिल्या कुटुंबास चार व दुसऱ्या कुटुंबास चार असे आठ पुत्र आहेत यांची हायकोर्ट वकीलीची परिक्षा १८८६ सालांत झाली होती.

ज्यांनीं कुरुंदवाड येथें यज्ञ केला होतां ते " भारती बोवा " यांचे गुरु होत. यांनीं महामहो पाध्याय भटजी शास्त्री घाटे यांचे जवळ व्याकरण, कौमुदी व काव्यालंकारदी अध्ययन केलें आहे. हे जुन्या पद्धतीचे असून स्वधर्माचरणी आहेत.

ह. भ. प. गोविंद बुवा पटवर्धन उर्फ लाखेबुवा ही एक प्रसिद्ध व्यक्ती होऊन गेली. यांनीं काशी पासून रामेश्वरपर्यंत एक लाख कीर्तनें केली. त्यामुळें यांना (लाख्याकथेकरी) हें नांव मिळालें होते.

गंगापुरी वर्णनांत स्वा. वेणीमाधव यांच्या बद्दल उल्लेख आलाच आहे. यांचे आश्रमांचे नांव रामानंद असें होतें. यांचे शिष्य ब्रह्मानंद स्वामी यांची समाधी क्षेत्र माहुली येथें आहे. यांचे शिष्य प्रज्ञानंद (परांजपे) स्वामी यांची समाधी श्री उमामहेश्वराचें मागें आहे. यांचे शिष्य वे. शा. सं. नारायण शास्त्री मराठे हें हल्लीं येथें आहेत.

हिरण्यकेशीय शाखेची पाठशाळा वे. शा. सं. बाळंभटजी रानडे यांचें येथें आहे. ऋग्वेदी शाखेची पाठशाळा वे. महादेव भट गाडगीळ यांचे येथें आहे. व संस्कृत शाळा वे. शा. सं. त्रिंबक शास्त्री लेले यांचेकडे आहे. आणि वे. शा. सं. नारायण शास्त्री मराठे यांचे कडेही आहे. या क्षेत्रांत ४।९ अग्नि-होत्री आहेत.

येथून पूर्वेस १९ मैल वाटार स्टेशन. दक्षिणेस २१ मैल सातारा. पश्चिमेस २० मैल महाबळेश्वर व उत्तरेस ९६ मैल पुणें शहर आहे. मोटारचा नवीन रस्ता शहाबागेपासून श्री भद्रेश्वराजवळ लहानपूल बांधून सातारा रस्त्यास जोडला आहे.

येथील सरदार रास्ते यांचे देवालयांची व घाटांची मोजणी दिलीच आहे. परंतु देवालयांचे व घाटांचे खर्चाचे आंकडे मिळावे ह्मणून सरदार रास्ते यांचे वाई येथील कारभारी व हल्लीं वाई म्युनिसिपालिटींत व्हाईस प्रेसिडेंटचे काम करीत असलेले रा. बळवंतराव बोपर्डीकर यांजकडे आम्ही बरेच हेलपाटे घातले; परंतु त्याचा कांहींहि उपयोग न होता उलट त्यांनीं संभावितपणाचा नकार दर्शविल्यामुळें आमचें फारसें नुकसान न होतां आम्ही वेळींच सावध झालों. या त्यांच्या थोरपणाबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों. असो. नंतर ज्यांचे कडून आम्ही माहिती मिळविली त्यांचे कडून देवालयांचे व घाटांचे खर्चाचें आंकडे मिळणें अशक्य झाले. या बद्दल वाचक क्षमा करितीलच. सातारा येथील इतिहाससंग्रह व सातारा ग्याझिटियर यां मध्यें देवालयांच्या खर्चाचे जे आंकडे दिले आहेत ते विश्वसनीय नसावेत अशी माझी पूर्ण समजूत आहे. अनेक वर्षें महापुरांत टिकलेल्या प्रचंड

व सुंदर अशा इमारतीस लाख दीड लाख रुपयेच खर्च लागला असें ह्मणणें ह्मणजे हास्यास्पद आहे.

सरदार रास्ते यांच्या शब्दास मान देऊन पूज्य बुद्धीनें, श्रीमंत माधवराव बल्लाळ पेशवे यांनीं जीं गांवें देव–ब्राह्मणांस इनाम दिली. त्या गांवांची व्यवस्था सरदार रास्ते यांनींच पहावी वगैरे मागील (इनाम कमिशन ए) या शिक्याचे अस्सल कागदावरून सिद्ध होत आहे. ज्या सरदार रास्ते यांना खास खर्चास मोठी जहागीर आहे; त्यांचें कडून सदरहु देव–ब्राह्मणांच्या इनाम गांवांचे उत्पन्न व्यवस्थेशीर दरसाल देव–ब्राह्मणांच्याच कार्यीं खर्च करणे हे मुख्य कर्तव्य होय. असें असतां अलिकडे बरींच वर्षें घाटाची वर्षासनें, धर्मपुरीतील ब्राह्मणांची वर्षासनें, इतर ब्राह्मणांच्या वार्षिक देणग्या व देवस्थानाचा खर्च सनदेंत नमूद केल्याप्रमाणें होत नाहीं. प्रत्येक घाटास श्रीकृष्णाबाईचे उत्साहाकरितां पूर्वी शंभर रुपये मिळत, तर हल्लीं पंधरा, वीस रुपयेच मिळणें म्हणजे आश्चर्य नव्हे काय? धर्मपुरीतील ब्राह्मणांस घरटीं ४० रु. वर्षासन मिळत होतें. हल्लीं तर कांहींना मिळतें तेही पूर्ण मिळत नाहीं. तेव्हां याचे कारण काय ते समजत नाहीं. असो आमचे कृपाळु इंग्रज सरकारांनीं उदार अंतःकरणानें पूर्वींच्या देणग्या चालू ठेविल्या आहेत याबद्दल सरकारची स्तुती करावी तितकी थोडीच होईल. मला असें वाटतें कीं, जर आमचे दयाळु सरकार, सदरहु देव–ब्राह्मणांची इनाम गांवें आपलें ताब्यांत घेऊन (इनाम कमिशन ए) च्या सनदेप्रमाणें गांवांची व्यवस्था योग्य ती आपल्या देखरेखीखालीं ठेवितील तर सर्व व्यवस्था उत्तम राहील असें मला वाटतें.

श्रीक्षेत्र वाई हे गांव पुराणकालीन जितकें सुंदर होतें. त्याहीपेक्षां इतिहासकालीं फार सुंदर दिसूं लागले. याचे कारण पुराण कालापेक्षां इतिहास कालांत हे गांव दुप्पट वाढलें. हे गांव इतिहास कालीन इतकें मोठें व सुंदर होण्याचें मुख्य कारण येथील विस्तीर्ण देवालयें, घाट व वाडे हे होय. आतां येथील देवालयें, घाट, वाडे व धर्मपुरी वगैरे ज्यांनीं लाखों रुपये खर्च करून तयार केली, व ज्यांनीं अशा रीतीनें आपल्या घराण्याची कीर्ति यावत्चंद्र कायम ठेविली. ते सरदार आनंदराव भिकाजी रास्ते महापुण्यवान् होते यांत शंकाच नाहीं. या वाई क्षेत्रासारखे सुंदर व प्रेक्षणीय क्षेत्र दक्षिण महाराष्ट्रांत दुसरें क्वचितच असेल. नैसर्गिक देखावे व शिल्पशास्त्र प्रवीण कारागिरांच्या हस्तकौशल्याची कामें या वाई क्षेत्रांखेरीज इतरत्र कोठेंही दृष्टीस पडत नाहींत म्हणून प्रत्यक्ष पहाणाऱ्यास वाटल्यावांचून रहाणार नाहीं. असो:—

शेवटीं मी. आपल्या वाचक वृंदास अशी नम्र विनंती करितो कीं या लहानशा पुस्तकांतील गुणांचें हंसक्षीर या न्यायानें त्यांनीं सेवन करून कांहीं दोष असल्यास त्याबद्दल क्षमा करितील अशी मला पूर्ण उमेद आहे.

ज्या जगच्चालकानें श्री क्षेत्र वाई सारख्या पवित्र स्थळाचें वर्णन लिहिण्यास व तें प्रसिद्ध करण्यास मला स्फूर्ति दिली त्या सर्वसाक्षी प्रभूस मी अनन्यभावे शरण जाऊन हें अल्पसें वर्णन येथें पुरें करितों.